# परिचित सातारा.

निवेदक

**पुरुषोत्तम पांडुरंग गोखले,**
बी. ए.

किंमत ५ आणे.

पु. १. ६५०.

# परिचित सातारा.


निवेदक

**पुरुषोत्तम पांडुरंग गोखले,**
बी. ए.

सातारा जिल्हा लोकसेवासंघाचे कार्यकर्ते, कऱ्हाड.


अभ्यासू समाजसेवकांस
सादर समर्पण.
पु. पां. गोखले.

माघ व॥ ९ मी ] * [ शके १८६१.

# अनुक्रमणिका.


| ठोकताळा | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | षष्ठी प्रत्ययाचा ' अर्थसंबंध ' नको. | १ |
| २ | संबंधाचा प्रत्यय हवा. | ६ |
| ३ | हें काय कृष्णेचें खोरें. | १० |
| ४ | जीवनाचें किरण–चित्र. | १४ |
| ५ | जिल्ह्याची शेती. | २३ |
| ६ | जिल्ह्याचा व्यापार–व्यवहार. | ३२ |
| ७ | उत्सव नि उत्साह. | ३८ |
| ८ | सोयी–बिनसोयी. | ५१ |
| ९ | लालन–पालन. | ६४ |
| १० | इतिहासाचा अभिमान व अभिमानाचा इतिहास. | ७० |

**श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले** यांच्यासारख्या लोकसेवकांकडे आम्ही



धांव घेतली. तिचा उपयोग होऊन सदर पुस्तक वाचकांस सादर करणें आम्हांस शक्य झालें. अभ्युदयाला त्या-बद्दल आनंद होतो. आमच्याकडे अशाच आपुलकीनें बघणारे मित्र आहेत म्हणून आम्ही गेलीं बारा वर्षे कांहीं सेवा करूं शकलों. अशा प्रसंगीं अभ्युदयाच्या आरंभीच्या काळांत आमचे बंधु **कै. बाळकुअण्णा कोल्हापुरे**



यांनीं अभ्युदयाला जें बाळसें आणलें त्याचें कृतज्ञतेनें स्मरण होतें. आजचा अभ्युदय पाहून त्यांना खास समाधान वाटलें असतें. **आर्थिक अगर पक्ष-विषयक पाठबळ कोठूनही नसतां अभ्युदयाला सतत बारा वर्षे भरीव सेवा करतां आली,** " परिचित सातारा " या सारखें लोकशिक्षणोपयोगी पुस्तक नव्या तेराव्या वर्षाच्या मुहूर्तानें वाचकांचे हातीं देतां आलें व त्याला श्री. बापुराव सोमणासारख्यांची प्रस्तावना मिळवतां आली हें केवळ जन-तेच्या प्रेमावरच होय. त्या जनतेलाच अभिवादन करून रजा घेतों.

ता. ८-४-१९४०. —प्रकाशक.

परिस्थिती कळत नाहीं. ती समजण्यास जिल्ह्यातील खेडी नि खेडूत यांचेच यथार्थ ज्ञान अवश्य आहे. ते या पुस्तकात श्री. गोखले यानी चटकदार नि उद्बोधक पद्धतीनें ग्रथित केले आहे. कोष्टके नि आकडे पाहताच पुस्तक हातावेगळे करणाऱ्या वाचकांनाही या पुस्तकांतील श्री. गोखले यांच्या भाषाशैलीने नि विषयमांडणीच्या नव्या रीतीमुळें तीच कोष्टके मनोरंजक नि तेच आकडे बोलके वाटतील अशी माझी खात्री आहे. पुस्तकांतील कोष्टकांचा भराचसा भर अनुमानावर असल्यामुळे; अगदी काटेकोर शास्त्रीय पध्दतीनें अगर सरकारी अर्थशास्त्रज्ञांच्या मतानें कांहीं किरकोळ फेरबदल आढळल्यास तो मुद्दा गौण समजावा लागेल. कारण मूळ आकड्यापेक्षां त्यामागें असलेली भावना लक्षात घेऊनच आपण कोणताही प्रश्न सोडविला पाहिजे. ' परिचित सातारा ' यासारखे पुस्तक इतर जिल्ह्यासंबंधी झालेले माझ्या पाहण्यात नाहीं. अशा रीतीने जिल्हानिहाय पाहणी करून परीक्षणात्मक पुस्तके ग्रामोध्दार कार्यकर्त्यांनीं प्रसिद्ध केल्यास भावी राष्ट्रोन्नतीस त्यांचा अत्यंत उपयोग होईल असे मला वाटते.

( ३ ) ग्रामोद्धाराचे कार्य आजकाल अत्यंत महत्वाचे मानले जाते. खेडी नि खेडूत यांची आमूलाग्र सुधारणा केल्याखेरीज, केवळ शहरीं वैभवात कितीही भर पडली तरी देशाला त्याचा प्रत्यक्ष फायदा फारच थोडा होतो. ह्मणून देशांतील सर्व पक्षोपपक्षांचे सध्या ग्रामोद्धाराकडे लक्ष वेधून राहिले आहे. कॉंग्रेसनें तर आपलीं वार्षिक अधिवेशनें मुद्दाम खेडूतांची सुधारणा व्हावी म्हणून खेडयातच भरविण्याची नवी प्रथा सुरू केली आहे. महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमांचा मुख्य आधार ह्मणजे खेडोपाडीच आहेत. कम्युनिस्ट; सोशॅलिस्ट; महासभानुयायी नि प्रागतिक सर्व एकमताने खेडयापाडयातून राहणारे शेतकरी नि त्यांचे भाऊबंद शहरी कामकरी यांची सुधारणा कशी होईल या एकमेव कार्याला वाहिलेले दिसून येतात. कोणत्याही लोकशाहीप्रधान राष्ट्रात मतदार हेच पर्यायाने ' राज्य-

व्यासंगी नि अभ्यासी वृत्तीने, शेतकरी-कामकरी वर्गाला उपयुक्त होतील अशी ' भिकाऱ्यांचा प्रश्न, ' ' रूढीचे पाश, ' 'ऋणविमोचन,' ' सुधारलेली शेती ' इ. ग्रामीण विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध करून, आपल्या अनुभवांचा फायदा जनतेला देतील अशी मला आशा आहे.

शेवटीं डॉ. ना. पां. कोल्हापुरे, L. C. P. S. संपादक, अभ्युदय, यांनी आपल्या पाक्षिकाच्या तेराव्या वाढदिवसानिमित्त मामुली वहिवाटीप्रमाणें एकादा विशेषांक न काढता अभ्यासू कार्यकर्त्यांना उपयोगी पडेल असा हा परिचित सातारा आपल्या वाचकांना दिला या त्यांच्या लोकसेवेबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

मु. वडद (रत्नागिरी)<br>
श्रीदासनवमी<br>
शके १८६१.

ग. गो. सोमण.

# परिचित सातारा.

## ठोकताळा १ :

### षष्ठीप्रत्ययाचा 'अर्थ संबंध' नको

मी अमुक ठिकाणचा नि अमुक ठिकाण माझें, असें म्हटल्यानें दोघेही परस्परांना परिचित असा शब्दबोध होतो. पण वस्तुस्थिती तशी असतेच असें नाहीं. पूर्वीं पंचक्रोशींतील, दशक्रोशींतील खडान्‌खडा माहिती प्रत्येक समंजस खेडकराला असे. पण आतां त्याच्या गांवचीं तरी माहिती त्याला भरपूर आहे कां म्हणून पहावयास जावें, तों घोटाभरच पाणी आढळतें. याला कारणें अनेक आहेत. आधुनिक यंत्रयुगांतील सुधारणांनीं जग हें एक कानाडोळ्यांच्या आटोक्यांतील वस्तु करून सोडली आहे. त्यामुळें त्याच्या तारीखतागायत अंगोपांगांची माहिती ठेवण्याच्या नादांत मनुष्य आपलेपणच विसरतो. इतकें कीं जगाच्या अन्य भूप्रदेशावर काय काय आहे व काय काय चालतें, हें त्याला एक वेळ बिनचुक सांगतां येतें. पण स्वतांच्या गांवीं काय आहे, काय चालतें हें त्याच्या गांवींहीं नसते.

पण मनुष्य जर अशी ' स्वतांचीच जागा चुकत गेला, ' तर त्याला जगांत धरही लागत नाहीं. असाच आजचा अनुभव आहे. म्हणून नुसत्या ' षष्ठीच्या प्रत्ययाचा संबंध' सांगून कोणाशीं अगर कोण्या स्थळाशीं आपुलकी अगर परिचय शाबीत करूं शकत नाहीं. ही आपुलकी अथवा परिचय पटवावयास कांहीं खुणेच्या गोष्टींची तरी खातरजमा करून द्यावी लागेल.

त्या दृष्टीनें सातारा जिल्ह्यासंबंधीं बोलावयाचें तर (२३ टक्के मुलेंबाळें, म्हातारकोतारी आणि लुळेदुबळे वजा जातां ) ६८ टक्के लोक

शेतीचा धंदा करतात नि ९ टक्के लोक दुसरा कांहीं व्यवसाय करतात असें चटकन कोणी ह्मणेल. पण जिल्ह्याचा प्रमुख धंदा जो शेती त्यांत राबणारे सारेच लोक शेतीचे मालक तर नाहींतच, पण जी रयतवारी पद्धति जिल्ह्यांत चालूं आहे तिच्याप्रमाणें कित्येक तर ' वरिष्ट धारण करणार 'ही नाहींत. शेतींत राबणारांच्या संख्येशीं पिकाखालील जमिनीचा ताळाच बसवला तर माणशीं २·९ एकर पडतील न पडतील. यापैकींच ०·०५एकरच काय ती पाणस्थळ जमीन सांपडेल. अलिकडे अलिकडे कांहीं लोक गिरण्या, कारखाने, वीजपुरवठा, विणकाम, तंबाकूचा व्यापार, फराळांचीं दुकानें, वाहतुकीचीं साधनें यांच्या कामांत पडूं लागले आहेत आणि कांहीं अर्थातच राज्ययंत्राचीं चक्रेंही फिरवीत आहेत.

पण हें कांहीं केवळ सातारा जिल्ह्याचेंच वैशिष्टय होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें जर असें कोणी म्हणाला कीं, वेडपे, बहिरे, मुके, आंधळे नि महारोग्यासारखे पीडित सोडून धडधाकट जनतेकडेच पाहिलें तर जिल्ह्यांतील पुरुषांचें सरासरीनें वयोमान २३·२ वर्षें व स्त्रियांचें सरासरीनें वयोमान २२·८ वर्षें आहे, तर तीही कांहीं खुणेची गोष्ट नव्हे. सर हेन्री रिस्ले यांनीं सांगितल्याप्रमाणें तुर्की, इराणी, इन्डोआर्यन, सीथोद्रवीडियन, आर्यद्रवीड, मंगोलोद्रवीडियन, साधे मंगोलियन किंवा शुद्ध द्रवीड या भारतीय मानव-वंशाचे औषधापुरते नमुने जिल्ह्यांत खास आहेत, असें कोणी आग्रहपूर्वक सांगू लागला तरी ती 'न पटणारी गोष्ट' म्हणूनच सोडून द्यावी लागेल. कारण अपवाद वा नमुने ह्मणजे नियम नव्हे. आतां, जिल्ह्यांतील बहुतेक लोक सिथोद्रवीडियन वंशांतील आहेत; मग ते कुणबी असोत नाहीं तर ब्राह्मण असोत, असें कोणी ह्मणाला तर मात्र जरा विचार करावा लागेल खरा. मध्यम बांधा, मोठें डोकें, उठावदार पण छोटेखानी नाक हीं वंशचिन्हें कशीं नाकारतां येतील ? तथापि महाराष्ट्र नि पश्चिम घाट—कूर्ग वगैरेस लागूं पडणाऱ्या लक्षणांस तरी सातारा जिल्ह्याचेंच वैशिष्टय कसें ह्मणतां येईल ?

' परवळीचा शद्ब ' ह्मणून आणखीही एका गोष्टीची किंमत नाहीं. ती गोष्ट ह्मणजे लोकव्यवहार. बारा पैचा एक आणा, सोळा आण्यांचा एक रुपाया अशा नाण्यांनीं लोक आपले व्यवहार करतात; इतकेंच नव्हे तर रुपयाचें जितके हाल इंग्रजी अमदानींत झाले, तितके लोकांनीं पाहिले व चालू दिले, असें विधान केल्यानें सर्वसामान्य हिंदी लोकांपेक्षां यांत वेगळे तें काय ? असा प्रश्न उभा राहतोच. होय, १६५ ग्रेन चांदी असलेला रुपाया १८७३ पर्यंत सोन्याच्या तोलानें १⁄१० पौंड होता. पण पुढें १८९३ मध्यें टांकसाळींत रुपये पाडून देण्याचें बंद करून १५ रुपयांचा बदला 'पौंड' प्रचलित करण्यांत आला. फिरून १९२०च्या फेब्रुवारींत रुपयांचे हाल मांडून इंग्लंडची सोनेरी भरही करण्यांत आली. ती सातारा जिल्ह्यानें उघडया डोळ्यांनीं पाहिली. पण हें कांहीं आमच्याच जिल्ह्याचें निरुपायत्व नव्हे. फार काय, एका रुपयास अमुक जिन्नस अमुक शेर मिळतो अशी भाषा सातारकर करतो. फलाण्या जिनसाच्या ठराविक मापाला अमुक पैसे पडतात अशी त्याची व्यवहारी भाषा सहसा नसते. ह्मणजे रिवाजांत रुपाया हा ' गुण्या; ' त्याच्या दोरींत वस्तूंचा व्यवहार व्हावयाचा. पण ही साधारण भारतीय रीतीच आहे.

इथें हेंही सांगणें आवश्यक आहे कीं सातारा जिल्ह्यांत हिंदुस्थान-प्रमाणेंच बंगाली, मद्रासी, देशी सर्व तऱ्हेचे वजनी मण चालू होते आणि बारुली नि सोळुली मापेंही चालू होतीं. पण १९३२ च्या मुंबई सरकारच्या कायद्यानें वजनामापांची समानता सर्वत्र पसरली आहे. ह्मणजे १८० ग्रेनांचा एक तोळा, ८० तोळ्यांचा एक शेर नि ४० शेरांचा एक मण हें मोज मुक्रर होऊन बसले आहे. पण जें लक्षण साऱ्याच इलाख्याला लागू तें एकटया साताराजिल्ह्याचेंच ' खुणेचें ' लक्षण कसें ह्मणतां येईल.

जी गोष्ट वजनामापांची, तीच तऱ्हा वेळेची. " जाते घडि ही अपुली साधा. करा काय तें अतां करा. " हें अगर असलीं साधु वचनें

समाजाच्या तळापर्यंत नुसत्या कानावरच आहेत असें नाहीं; तर समाजाच्या क्वचित् तोंडीं तोंडींही आहेत. पण व्यवहार बरीक असा आढळतो कीं बेफिकीरीनें कशाची, उधळपट्टी होत असेल तर अमोल आयुष्याचीच ! 'स्वराज्याचा मूळवा' म्हणून सातारा जिल्हा प्रसिद्ध. श्रीशाहूराजांचा, राजा-राममहाराजांचा, रामदासस्वामींचा हा जिल्हा म्हणजे कर्मभूमी. इथें " यत्न तो देव जाणावा " याचें सामर्थ्य प्रतीत व्हावयास हवें. ' जिवंत माण-साला विश्रांति फक्त तिरडीवर ' या वचनाचें दृश्य इथें दिसावयास हवें, दिसतेंही. पण अगदींच विपरीत अर्थानें ! काळाचा मितव्यय नाहीं. मोजून योजून प्रत्येक काम नाहीं कीं त्याचा वेग नि काळ नाहीं. किंचित् शह-राळलेल्या लोकांच्या घरीं, मनगटावर, खिशांत घड्याळें येऊन बसलींत. पण पुष्कळ तीं मिजासीसाठीं. बहुजनसमाजांत तर 'खाटल्याबाजल्याच्या,' ' गुरु-शुक्राच्या, ' चंद्रासूर्याच्या नि सावल्यांच्या हालचालीवरच बहुधा सगळे व्यवहार हांकले जातात. त्यामुळें कांहीं सुमार वा इयत्ताच नाहीं. वाळूचीं घड्याळें पूर्वीं होतीं तीं काळाच्या ओघांत गडप झालीं; नि 'शुभ-मुहूर्त ' साधण्यासाठीं केव्हां केव्हां घटकापात्रें योजतात, पण तें एक तर दक्षिणा उपटण्याचें, परंपरेनें आलेल्या मनोवृत्तीच्या समाधानाचें अगर केवळ शोभेचें प्रदर्शन होऊन बसलें आहे, इतकेंच. बाकी, शाळाकचे-र्‍यांतून मुंबई अगर स्टँडर्ड टाइमप्रमाणें घड्याळाचे कांटे फिरतात व त्यांच्याकडे पाहून थोडे हातपाय हालतात.

ही कालवाचक नकारघंटा म्हणजे दर तिसर्‍या वर्षीं हमखास येणार्‍या दुष्काळाची बहीणच. एक वेळ सूर्य उगवायचा चुकेल, पण दुष्काळ तिसर्‍या वर्षीं झडप घालायला चुकायचा नाहीं. पण मुंबई इला-ख्याच्या दक्षिणभागावरच हा दैवाचा वरदहस्त पडलेला, तेथें तो सातारा जिल्ह्याचाच मक्ता आहे, असें कसें म्हणतां येईल ?

अशा तऱ्हेनें ज्याचें नांव घ्यावें, त्यानें जिल्ह्याचा परिचय निश्चित असल्याचें नांवही काढूं देऊं नये; असें झालें तर नुसत्या " षष्ठीच्या प्रत्ययाचा अर्थ संबंध " असें सांगण्यांत नि मी सातारा जिल्ह्याचा व माझा सातारा जिल्हा म्हणून मिरवण्यांत काय भूषण ? असला परिचय हा नामधारी होतो, पण नांवापुरतासुद्धां खरोखर नसतो. बरें, जिल्ह्यांतील माणसांचीं कांहीं नांवें विशिष्ट आहेत, असें ह्मणावें तर तसेंही नाहीं. माने, कुलकर्णी, देशपांडे, देशमुख, चिटणीस, पाटील वगैरे आडनांवें ऐतिहासिक कालांतील नौकरीचें वा कर्तृत्वाचें कौतुक म्हणून नांदतात. कित्येक गांवाच्या पुढें ' कर ' जोडून हीं कित्येक आडनांवें राहिलीं आहेत. कांहीं नांवें तर एकाद्याच्या विशेष कर्तृत्वानें, विद्वत्तेनें, धंद्यानें अगर धार्मिक स्थानानें त्याच्या कुटुंबास कायमची बिलगलीं आहेत. पंत, रास्ते, जोशी, आचार्य, भट, नाईक, उपाध्ये, काजी, कागदी, चौगुले, गुरव अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. काळाच्या ओघांतदेखील या आडनांवांच्या आड कोणी येतोसे दिसत नाहीं. व्यक्तिविषयक नांवांची प्रथा बरीक मुरडून मुरडून ठेवण्याचा सपाटा चाललेला आढळतो. राम=आल्हाददायक, लक्ष्मण=भाग्यशाली, अन् सावित्री=प्रकाशिका, अगर राधा=भरभराट आणि रुक्मिणी=सुवर्णभूषणा अशीं नांवें मागें पडत जाऊन आतां वसंत–विनता, सुभाष–सुलोचना, रमेश–रमणी अशीं लुसलुशित ललित नांवें प्रचलित होऊं पहात आहेत. पण हा हौशीचा प्रकार फक्त पांढरपेशांतच आढळतो. बिचाऱ्या बहुजनसमाजांत आपल्या बापजाद्यांच्या स्मृतिसाठीं, देवादिकांच्या नि निसर्गशक्तीच्या उपासनेसाठीं जीं मुलांचीं नांवें ठेवण्याची चाल आहे ती चालूं आहेच. तिथें रंगी-चंद्रीपासून दगडू-धोंडूपर्यंत नांवें जुन्या काळाप्रमाणेंच ठेवण्यांत कांहींच चलबिचल होत नाहीं. पण या गोष्टींत तरी काय एकट्या सातारा जिल्ह्यालाच नांव सांगतां येईल ? नांव नको अगदीं !

## ठोकताळा २ :

# " संबंधाचा प्रत्यय हवा. "

सातारा जिल्हा माझा व मी जिल्ह्याचा असें ह्मणणारा जर नुसतेंच असें म्हणूं लागला कीं, शेतकऱ्यांचें सरासरी निव्वळ वार्षिक उत्पन्न माणशीं फक्त बारा रुपयेच आहे, तर त्याला उत्तरही असेंच मिळेल कीं खरें आहे बाबा ! पण ही कांहीं खुणेची गोष्ट नव्हे.

त्याचप्रमाणें, समजा, तो म्हणाला कीं सातारा जिल्ह्यांत ' काळ्या-वेताळ्या'पासून 'मणिलाल-मदना'पर्यंत सार्थपणा नांवाला आणतील अशा चेहऱ्यामोहऱ्याचे लोक आहेत, तर आपण त्याला वरीलसारखेंच उत्तर देऊं. अन् वर सांगूं, गृहस्था या असल्या गोष्टी आपुलकीच्या अन् खुणेच्या ह्मणून कशाला सांगतोस ? असेंच कांहीं बोलावयाचें असेल तर आज-कालचा एकादा विमानांतून उडत जाणारा प्रवाशीदेखील म्हणेल कीं—

" सातारा जिल्ह्यांत ना ? हिंदूचा अगदीं साध्यांतसाधा व सुटसुटीत पोशाख ह्मणजे एक लंगोटी. ती लंगोटीसुद्धां मोह अगर चैन मानणाऱ्या योग्याबैराग्याची गोष्ट सोडूनच द्या, समाजांतली रूढी अन् पोलिशी कायदा यांचा खराखोटा धाक नसता तर माण-पाटण-जावली-शिराळें भागांतील अनेक शेतकऱ्यांनींदेखील त्या लंगोटीला रजा दिली असती. मुसल-मानाचा हाच साधा पोशाख नाहीं. तो निदान गुडघ्याइतकी अन् कमरेला एक वेढा तरी देणारी कमींत कमी लुंगी लावेल. छे, छे, मिळाली तर पहि-ल्यानें विजार वापरील. उलट ' चाईपाण्या'इतपत तरी जिथें ' सुधारणा ' शिरली आहे, तिथेंसुद्धां जर रस्त्यांतून उघडींनागडीं मुलें वावरतांना अजून आढळतात, तर सुधारणा जिथून चार पावलें दूर आहे, तिथें तसें दृश्य असलें तर नवल कसलें ? ' सुधारलेलीं ' पोरें बरीक चड्डी-परकरांत आढ-

ळतात. यांच्या पुढचा पोशाखाचा प्रकार ह्मणजे पंचे-पंजी-धोतरांचा. सभ्यांचा पोशाख ह्मणजे सदरा-बंडी-शर्ट-कोट व त्याच्यावर गोखले-कर्वे-टिळक धर्तीचें उपरणें. आचाऱ्याच्या सोदन्याप्रमाणें, शास्त्र्याच्या शालजोडीप्रमाणें अगर हरदासी खाकेंतील चुणलेल्या बोळ्याप्रमाणेंही कोणीकोणी उपरणीं वापरतात. थंडीवाऱ्याच्यावेळीं टापशीसारखा अगर प्रसंगवशात् शिरस्त्राण ह्मणूनही उपरण्याचा उपयोग करणारी मंडळी कमी नाहींत. सूत्रधारी वा हरदासी अंगरखा अन् सरदारी तुमानी मधूनमधून लक्ष वेधतात. कोट-शर्ट-धोतरांची नेसणीं गबाळग्रंथी-पोकळ कासोटयापासून-तंग-दुभंग 'काचा'पर्यंत सगळ्या तऱ्हेचीं बघणारांच्या डोळ्यांत भरतात. या सगळ्या 'तऱ्हातऱ्हांत' हिंदु-मुसलमान ऐक्य असून फरक असलाच तर मुसलमान डावीकडे व हिंदु उजवीकडे आपल्या 'डबलब्रेस्ट' कोटाची बटणें अगर बंडीचे बंद बांधण्यांत भूषण मानतो, इतकाच आहे. शिरस्त्राणें मात्र नजरेसरशीं निदान सत्तर तरी आढळतील. अन् या सत्तर प्रकारांच्या कोन-कोकी-विस्तार-उभार यावरून जातींपोटजाती करायचे मनांत आणलें तर मुंबई इलाख्यांत पांचशें जातींची जी नोंद मुंबई सरकारनें माणसांबाबत केली आहे, ती माणसांच्या डोक्यावर बसणाऱ्या वस्तूंसंबंधीं किसमिसचा पाला समजावा लागेल. याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं सातारा जिल्ह्यांत कोणी 'बोडका' नाहींच. जुने भिकारी-संन्याशी-रामदासी-फकीर तर आहेतच. पण अगदीं बायकांत बसणारे उठणारे उजळमाथ्याचे भाईही आहेत. इतक्या सर्वसामान्य जमान्यांत 'सुटलेल्या पोत्यासारखे पायजमे चढविणारे, आपल्या उंच व धिप्पाड शरीरावर सैल सदरा नि टाचकें जाकीट घालून, दोन्ही कानावर पट्ट्या सोडून, डोक्याला नागाच्या वेटोळ्यासारखें गुंडाळलेल्या पटक्यांत अणुकुचीदार उंचच उंच टोपी घालून, हातांत सोटा घेऊन, खैबरघाटी बूट वापरणारे पठाण सावकार दिसल्यावर माणूस सहजच गपकन् डोळे फिरवतो.

तसें फिरवलेले डोळे जरा सौम्यदर्शनासाठीं अर्थात्‌च उत्सुक असतात. मायजातीच्या दर्शनानें त्या उत्सुकतेची तृप्ति होते. सातारा जिल्ह्यांत मायजातीचा सर्वसाधारण पोशाख म्हणजे लुगडें—चोळी. अलिकडच्या भाषेंत बोलावयाचें तर हें गोलनेसणं असतें. पण झपाटयासरशीं कास करतां येऊन ‘ मर्दानी ’ अवसानही धरतां येतें, असें तें बळकट असतें. “ ओचा-कासोटयाचें ” ब्राह्मणी नेसणंही लक्ष वेधण्याइतकें व्यापक आहे. चोळयांच्या जोडीला पोलकीं-जाकिटेंही अन् कोट-झंपर स्त्रिया झराझर हृदयाशीं बाळगूं लागलेल्या आढळतात. गोषाचें प्रस्थ मुसलमानांत फार. पडदापद्धतीबरोबर मुसलमानांप्रमाणेंच सरदारी खाक्याच्या मिजासखोर हिंदूंतही आहे. वेणीफणी करून भांग पाडण्याची चाल बहुतेक नीटनेटक्या संसारी स्त्रियांत आहे. पांढरपेशांतील ‘ बाहेरचा विटाळ करून ’ घेण्याची विधवांची पध्दत झपाटयानें लोपत असून, हिंदुकुटुंबांतील तें एक वेळचें आर. सी. ( रेडक्रॉस ) अगर भू. द. ( भूतदया ) संघाचें सामर्थ्य स्मृतीच्या अजबखान्यांत राखून ठेवण्याइतकें वृत्तीनेंही दुर्मिळ होत आहे.

सौंदर्यप्रसाधनाकडे यानंतर निरखून पाहिलें तर असें आढळून येईल कीं असोल्या नारळासारखा आपला चेहरा ( क्वचित् भुवई-मिशीचा अपवाद करून ) करण्याचा हिंदूचा परिपाठ आणि दक्षिण हिंदुस्थानसारखी खालीं दाढी राखून वर सारी गंगायमुनाचीं मऊसूत पठारें करण्याचा मुसलमानी रिवाज आतां फक्त झाल्यागेल्या पिढींत व दाबांत राहणाऱ्या पोरांत दृग्गोचर होतो. नव्या पिढींत ‘ माथेरान ’ ची मिजास सर्रास झाली असून केशकर्तनाचे चोचले युरोपीयन राष्ट्रांच्या धोरणातोरणांप्रमाणेंच वळणावळणाचे आहेत. खालीं कान धरून केसांची झडती अशी होते कीं चेहऱ्याची आरास अगदीं जन्माला आल्यावेळची. वरच्या ओठावर नाकाखालीं मिशांना पूर्णविराम मिळाला नसला तर स्वल्पविराम-अर्धविराम तरी खास मिळतो. इतका कीं कित्येक वेळां त्याला अनुस्वाराचें

अगर दशांशचिन्हाचें स्वरूप येतें. जिवणीला झांकण, गाळणें, मेहरपीकंस करणाऱ्या मिशांची भेट जुन्या अगर रूढिप्रिय वा साध्या लोकांत तेवढी होते. गोपच्छी, बदामी, चंद्राकार घेरेही तसेच. शेंडीच्या जटा, बटा, सटा यांनींही तीच वाट धरली आहे. मात्र हरळीच्या मुळीसारखी ती नव्या पिढींत खास आढळते, किंवा धार्मिक संस्कारसमारंभाच्या वेळीं तरी उमटते. सौंदर्यप्रसाधनाचें हें केवळ स्वतांच्या हातांतील अगर अल्पमोली तंत्र साधु-संन्यासी-बैरागी भिकाऱ्यांतदेखील पसरलें आहे, हें सांगितलें ह्मणजे अधिक तोंडसुख नको.

स्त्रियांमधील नटण्यामुरडण्याची हौस होती तशीच आहे. कवडयांच्या दागिन्यापासून सोन्यामोत्यांच्या दागिन्यापर्यंत आणि त्यांच्या अभावीं बनावट मणिपितळतांब्यांच्या खिडुकमिडूकांपर्यंत सर्व तऱ्हेचे दागिने पायांपासून डोक्यापर्यंत आढळतात. मात्र नाक, कान टोंचण्याचा सपाटा दारिद्र्यामुळें वरच्या वर्गांतून बंद झाला असून व्रतापुरताच तो प्रकार राहिला आहे. मात्र सुधारणा ह्मणजे ' मुळाला ' सुंदर करण्यापेक्षां झांकून टाकण्याचें काम अशी कल्पना या जाहिरातीच्या युगांत झाल्यामुळेंच कीं काय जातीच्या ' चिचुंद्र्या ' देखील ' चंद्रिका ' असल्याचा आभास बाजारी ' मुखले-पनां ' च्या जोरावर करतात. ' सुधारलेल्यांचा ' हा वारिष्ठ वर्गीय मृदंग सोडून दिला तर बहुजनसमाजांत ' साधेपणीं चारुता ' साधण्याचाच उपक्रम दिसतो. "

अशा तऱ्हेची ही विमानवावदूक कोणी केली तर तो खात्रीनें सातारा जिल्ह्याच्याच परिचयाचा प्रत्यय देतो, असें कोणी विचारवंत ह्मणेल काय ? हें उघडया डोळ्यानें जग बघणाराचें सर्वसाधारण मराठी समाजाचें वर्णन आहे, असाच शेरा परीक्षक देईल. आतां, असें जर कोणी म्हणाला कीं सातारा जिल्हा म्हणजे ' कृष्णानदीचें खोरें ' आहे, तर ती बरीक परिचयाची, संबंधाची, खुणेची गोष्ट होईल खरी.

## ठोकताळा ३ :

# हें काय कृष्णेचें खोरें ?

सातारा जिल्हा कृष्णानदीचें खोरें म्हणावयाचें, तरी देखील दोनदां विचारच केला पाहिजे. जिल्ह्याचा आकार चौकोनी. पुणें जिल्ह्याच्या पायाशीं पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहात जाणारी नीरा नदी ही ज्याची उत्तर सीमा; कोल्हापूर संस्थानच्या माथ्यावर पश्चिम-पूर्व वाहणारी वारणानदी ही ज्याची दक्षिण सीमा; रत्नागिरी (जिल्ह्या) ला पाठीशीं घालून ज्याच्या पश्चिमेस सह्याद्रीची रांग उभी; जत संस्थान नि सोलापूर (जिल्हा) ज्याच्या पूर्वेस आणि भोर संस्थान व कुलाबा (जिल्हा) ज्याच्या वायव्येस वास्तव्य करतात असा हा सरासरीनें दक्षिणोत्तर शंभर मैल लांबीचा व पूर्व-पश्चिम ऐंशी मैल रुंदीचा एक भूगोलाचा चौकोनी तुकडा ह्मणजे सातारा जिल्हा. याचें क्षेत्रफळ पाहिलें तर ४८९.७ पासून ४९१० चौरस मैलापर्यंत कसें तरी बसवलें तर बसेल. यांत एकटी कृष्णानदीच वाहती अगर आपल्या पाण-बहिणींसह वाहून जिल्ह्याला सुपीक करून सोडती तरी सातारा जिल्ह्याला कृष्णेचें खोरें ह्मणणें खास शोभलें असतें. पण आज तसें ह्मणणें ही सातारा जिल्ह्याची आणि कृष्णानदीची खरोखरच चेष्टा आहे. मात्र, दुसऱ्या एका अर्थानें ह्मणजे " ओढून-काढून नेण्याचें साधन " या अर्थानें कृष्णा ही सातारा जिल्ह्याचें खोरें आहे खरी. कारण सातारा जिल्ह्यांत कृष्णा ही सर्वांत मोठी नदी असून तींतून जिल्ह्यांत पडणारें पावसाचें पाणी वाहून जातें. उत्तर सरहद्दीवरील नीरा व माणपेटयांतील माणगंगा आपलें पाणी कृष्णार्पण करीत नाहींत हें खरें; पण त्यांनींही सातारा जिल्ह्याला ' पाणी ! पाणी ! ! ' च करावयास लावलें आहे.

पहा, पहा, सातारा जिल्ह्याचें एकदां तोंड तरी पहा, ह्मणजे आम्ही काय ह्मणतों त्याचें प्रत्यंतर येईल. जिल्ह्याच्या पश्चिम भागीं सह्याद्रीचा पट्टा

तर दक्षिणोत्तर पसरला आहे. हा डोंगराळ भाग १० ते १५ व क्वचित् २० ते २५ मैल रुंद असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची सुमारें पाऊण मैल आहे ना ? सदर सह्याद्रिपट्टयाचा उत्तर भाग ह्मणजेच जिल्ह्याचा वायव्य भाग सर्वांत उंच दिसतो ना ? यांतही जास्त उठावाचा जो भाग आहे तोच " महाबळेश्वर " बरें ! याच भागांत बऱ्याचशा नद्या उगम पावून त्या वायव्येकडून अग्नेयीकडे, उत्तरेकडून दक्षिणेकडे व पश्चिमेकडून पूर्वेकडे डोंगरांच्या ओळीमधून धांवत सुटलेल्या आढळतात. कारण नाहीं विचारलेंत ? अहो, हा भाग जसा खडकाळ तसाच चढ-उताराच्या पहिलवानी पेशाचा असून तांबडमातींत रंगलेला आहे नुसता !

पहिलवानी पेशाच्या पश्चिमेकडून असें मध्यविभागाकडे यावें, तों ठाकठीक २०-२२ मैल रुंदीचा बांधा लक्ष्यांत ठेवावा लागतो. तो समुद्रसपाटीपासून अर्धा मैल उंचीवर असल्याचें नजर सांगतेच. यानेंही आपल्या उत्तरेस डोंगरांचे मुकुट धारण केले आहेतच; त्या मानानें पुढील ३०-३५ मैल रुंदीच्या पूर्व भाग कमी, पण समुद्रसपाटीपासून उंच राहण्याच्या कामीं मध्यभागाला बरीक बिलकुल हार जाणारा नाहीं.

तात्पर्य, जिल्ह्याच्या उत्तरेला डोंगरानें नुसती ताणून दिली आहे. पूज्यभावानें त्यास शंभुमहादेवाचा डोंगर म्हणतात. त्याचा एक फांटा सह्य पर्वताशीं समांतर असा उत्तरेकडून दक्षिणेकडे जातांना दिसतो नाहीं ? हा, त्यास घाट ह्मणतात. हा घाट अन् पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश, सरासरी पहा, तीस मैल रुंदीचा प्रदेश आहे तो ! बस् ! त्या काळ्या जमीनीच्या प्रदेशाला घाटाखालील प्रदेश म्हणतात.

या काळ्या सपाट प्रदेशांतून " तूं चाल पुढें, तुला रे गड्या, भीति कशाची ? " असें मनाला ह्मणा कीं शंभुमहादेवाच्या डोंगराचा दुसरा फांटा तुमच्या डोळ्यावर आलाच म्हणून समजा. वायव्येकडून अग्नेयी-

कडे जातो तो. पहिल्या व या दुसऱ्या फाटयांत १० ते ३५ मैलांचा टापू बसतो नाहीं ? पहिल्या फांटयाच्या पूर्वेकडील या काळसर, क्वचित् तांबूस नि सपाट प्रदेशाला घाटावरील प्रदेश म्हणतात बरें कां ! अहो, याचा उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे, आहांत कुठें ?

आणि पुष्कळ माळरान जमिनीचा तो १० ते ३० मैल रुंदीचा, शंभु-महादेवाच्या दुसऱ्या फांटयाच्या पूर्वेचा तो प्रदेश कसा कांहीं ठिकाणीं पश्चिमेकडून पूर्वेकडे नि कांहीं ठिकाणीं उत्तरेकडून दक्षिणेकडे उताराचा आहे; नाहीं कां ? माणदेश म्हणतात तो तोच हो, तो.

एकंदरीनें काय, (१) पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश (२) घाटाखालील प्रदेश (३) घाटावरील प्रदेश (४) माणदेश; असे सातारा जिल्ह्याचे चार स्वाभाविक विभाग पडतात. पण कारभाराच्या, दळणवळणाच्या, खाण्यापिण्याच्या, तात्पर्य मनुष्यसोयींच्या दृष्टीनें सातारा जिल्ह्याचे कांहीं काल्पनिक नि राजकीय विभागही केले आहेत. सातारा जिल्ह्याच्या अंगभर जे रंग नकाशांत चितारले आहेत, त्यावरून पश्चिमेकडील डोंगराळ भागांत वाई-सातारा-कऱ्हाड तालुक्यांतील पश्चिम आघाडी व जावली नि पाटण तालुके व शिराळापेटा यांचा बहुतेक भाग मोडतांना आढळतो. पूर्वभागानें खटाव-खानापूर-तासगांव या तालुक्यांचा मध्य व पूर्वभाग, आणि फलटण संस्थान, माणपेटा, नि आटपाडी महाल यांच्यावर वरदहस्त ठेवलेला सांपडतो. अर्थात् वाई-सातारा-कऱ्हाड-वाळवे तालुक्यांचा पूर्वभाग, कोरेगांव तालुक्याचा सर्व भाग व खटाव-खानापूर-तासगांव तालुक्यांचा पश्चिमेकडील थोडासा भाग जिल्ह्याचा ‘ मध्य ’ साधून नांदतो, हें काय आणखी वेगळें सांगावयास हवें ?

एवंगुणविशिष्ट स्वाभाविक व कृत्रिम अशा जिल्ह्याच्या निरनिराळ्या विभागांतून आपलें पाणी दाखविणाऱ्या नद्यांवर जर नजर टाकली, तर

| नदी | उगम | मार्ग | मैल लांबी | मुख | कांठचीं गांवें | मिळणाऱ्या नद्या उजवीकडून | डावीकडून | वैशिष्टय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ कृष्णा | जिल्ह्याच्या वायव्येस म्हणजे जावली तालुक्याचे उत्तरेस महाबळेश्वरच्या डोंगरांत | वाई सातारा तालुक्यांतून पुढें सातारा-कोरेगांव तालुक्यांचे सीमेवरून कऱ्हाड - वाळवे-तासगांव तालुक्यांतून सांगली व मिरज संस्थानमधून अग्नेयेकडे बेळगांव जिल्ह्यांत जाते. | जिल्ह्यामध्यें १५० | अनेक जिल्ह्यांतून वहात जाऊन मच्छलीपट्टणजवळ बंगालच्या उपसागरास मिळते | महाबळेश्वर, जोर, परसवाडी, धोम, मेणवली, वाई, पांचवड, भुईंज, लिंब, माहुली, उंब्रज, खोडशी, कऱ्हाड, रेठरें बु॥, नरसिंहपूर, बहे, बोरगांव, रेठरें हरणाक्ष, ताकारी, वाळवें, भिलवडी, ब्रह्मनाळ, सांगली. | कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, उत्तरमांड, कोयना, दक्षिणमांड व वारणा. | वळकी, वसना, येरळा. | १ महाबळेश्वरास उगमापाशीं देऊळ आहे. येथून कृष्णा, कोयना, वेण्णा, सावित्री व गायत्री अशा पांच नद्यांचे पांच प्रवाह निर्माण होतात व देवळाच्या मध्यभागीं कुंडांत पडतात. नंतर गायमुखांतून पाणी खालीं पडतें. पुढें निराळ्या पांच नद्या होतात. पैकीं सावित्री व गायत्री कोंकणांत जातात २ खोडशीस धरण. ३ वाई, भुईंज, क्षेत्रमाहुली, कऱ्हाड, सांगली येथें पूल. |
| २ कोयना | कृष्णेजवळ महाबळेश्वरीं. | जावली, पाटण, कऱ्हाड या तालुक्यांतून. | ८० | कऱ्हाडास कृष्णेस मिळते. | जावली, तांबे, वेळें, बामणोली, हेळवाक पाटण, तांबवें, सुपनें, येरवळें, कऱ्हाड. | कांदाटी, मोरणा वांग, करा. | सोळशी, केरा. | १ सह्याद्रीच्या कडेनें प्रथम दक्षिणेस वहात येऊन हेळवाकजवळ पूर्वेस वळसा घेते नंतर कऱ्हाड तालुक्यांतील केसें गांवाजवळ उत्तरेस तोंड करते. २ कऱ्हाडास कृष्णेशीं प्रीतिसंगम साधते. |
| ३ येरळा (वेरळा) (घातकी) | शंभूमहादेवापैकीं ह्मसकोबाचे डोंगरांत. | खटाव, खानापूर, तासगांव तालुक्यांत | ७५ | ब्रह्मनाळजवळ कृष्णेस मिळते. | पुसेगांव, खातगुण, ललगूण, खटाव, ढवळी, नांद्रें, वडूज, चितळी, निमणी, ब्रह्मनाळ. | नान्नी | | नेर येथें तलाव आणि खातगूण व वाकेश्वर येथें धरणें. |
| ४ वारणा | सह्याद्रीवर, शिराळे पेट्यांत प्रचीतगडाजवळ. | वाळवें तालुक्याचे नैर्ऋत्य व दक्षिण हद्दीवरून वहाते. | ६० | हरीपुराजवळ कृष्णेस मिळते. | पेंटलोंड, अरळें, चरण, कोंकरूड, बिळाशी, सांगाव, मांगलें, समडोली, दुधगांव, हरीपूर. | मोरणा | | सातारा जिल्ह्याची दक्षिण सरहद्द. |
| ५ वेण्णा | महाबळेश्वरीं कृष्णेजवळच. | जावली व सातारा तालुक्यांतून. | ४० | संगम माहुलीस कृष्णेस मिळते. | केळघर, मेढें, वर्यें, वझरें, कण्हेर, माहुली | | | |
| ६ माणगंगा | शंभुमहादेवापैकीं सीतेच्या डोंगरांत. | माण पेट्यांतून व आटपाडी महालांतून सोलापूर जिल्ह्यांत उतरते. | ४० | | मलवडी, दहिवडी, गोंदवलें, ह्मसवड. | | | १ बिदाल येथें बंधारा घालून पिंगळीचे तलावांत पाणी सोडलें. २ ह्मसवडजवळ रांजवाडीला तलाव. |
| ७ तारळी | तारळखोऱ्यांत मुरूड गांवच्या पश्चिमेस परळी डोंगरांत. | पाटण व कराड तालुक्यांतून. | ३१ | उंब्रजजवळ कोर्टी येथें कृष्णेस मिळते. | पाल, शिरगांव, इंदोली. | | | पाणी पचण्यास कठीण. |
| ८ वांग (वाल्मिकी) | पाटण तालुक्यांत मालदनच्या पश्चिम डोंगरात. | पाटण व कराड तालुक्यांत | २२ | येरवळ्यास कोयनेस मिळते | पोतलें, कोळें. | | | |
| ९ उरमोडी | जावली तालुक्यांतील यवतेश्वरचे डोंगरांत ( कासजवळ ) | सातारा तालुक्यांतून | २० | कोपर्ड्यास कृष्णेस मिळते. | परळी, नागठाणें, अतीत, कोपर्डे. | | | १ कास येथें बंधारा घालून पाणी सातारा शहरांत आणलें आहे. २ पोटी फार खडक आहेत. |

| नदी | उगम | मार्ग | मैल लांबी | मुख | कांठचीं गांवें | मिळणाऱ्या नद्या उजवीकडून | डावीकडून | वैशिष्टय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० वसना | शंभुमहादेवा-पैकीं हरळीच्या डोंगरांत, कोरेगांव तालुक्यांतील सोळशी गांवाजवळ. | | २० | मंगळापुरजवळ कृष्णेस मिळते. | सोनकें, शिरढोण, पिंपोडे, रेवडी, पाडळी, ल्हासुर्णे. | वांगना | | रेवडी गांवाजवळ धरण धरून कोरेगांव तालुक्यांत शेतीस पाणी. |
| ११ दक्षिण मांड | कऱ्हाड तालुक्याच्या नैऋत्य कोपऱ्यांत गोटेवाडीचे डोंगरांत. | | १९ | रेठरे बु. जवळ कृष्णेस मिळते. | काले, ओंड, नांदगांव. | | | ओंडजवळ धरण. |
| १२ उत्तर-मांड. | पाटण तालुक्यांतील मेंढोशीचे डोंगरांत | पाटण कराड तालुक्यांत | १५ | शिवड्याजवळ कृष्णेस मिळते. | चाफळ, माजगांव, चरेगांव. | | | |
| १३ कुडाळी | पांचगणी डोंगरांत जावली तालुक्यांतील भिलार गांवाजवळ. | जावली-वाई तालुक्यांत | १५ | उडतऱ्यानजीक (खडकी येथें) कृष्णेस मिळते. | वेलोशी, हुमगांव, कुडाळ, उडतरे. | | | खोऱ्यांतील जमीन काळी |
| १४ आगरणा. (अघहरणा –अग्रण.) | बलवडीचे डोंगरांत | खानापूर तालुक्यांतील करंजे गांवाजवळून तासगांव तालुक्यांत. | | | सुलतानगादें, करंजे | | | येरळेपेक्षांही उथळ. |
| १५ नान्नी | | खटाव तालुक्यांतील औंधचे तळ्यांतून येऊन नैऋत्य भागांतून खानापूर तालुक्यांतून. | | शिवणी, वांगी गांवच्या रानांत येरळेस मिळते. | हिंगणगांव, चिखलीअमदापूर, पुसेसावळी, गोरेगांव. | | | १ चिखलीजवळ धरण. २ गोरेगांवजवळ तलाव. |
| १६ मोरणा | शिराळे पेठ्यांत वाकुर्ड्याचे डोंगरांत | शिराळे पेटा | | मांगल्याजवळ वारणेस मिळते | वाकुर्डे, गोरखनाथ, मांगलें | | | |
| १७ सोळशी | बिरवाडीचे डोंगरांत. | जावली तालुका | | | (तानाजीचे) मालुसर, सोनाट, गोगवे. | | | |
| १८ कांदाटी | महिमंडणगडचे डोंगरांत | जावली तालुका | | | कांदाट, उचाट. | | | |
| १९ वांगना | कुरवलीचे डोंगरांत | कोरेगांव तालुका | | ल्हासुर्ण्याजवळ वसनेस मिळते. | ह्विवरें; किन्हई; तडवळे | | | |
| २० वळकी | जांवली[वाई]चे पश्चिम डोंगरांत | वाई तालुका. | | धोम जवळ कृष्णेस मिळते. | जांवली, आसरें, वेलंग. | | | |
| २१ नीरा. | भोर संस्थानांत सह्याद्री डोंगरांत. | जिल्ह्याचे उत्तर सरहद्दीवरून. | | सोलापूर जिल्ह्यांत नरसि[illegible]वळ भीमेस मिळते. | शिरवळ; मोर; विंग; मुरुम; गोखळी; वाठार; पिंपरें. | फलटण संस्थानांतून बाणगंगा | | १ भाटघर येथें वळवंडी नदीस मोठा तलाव धरून पाणी नीरेंत आणून सोडलें आहे. व मध्यंतरी नीरेला बंधारा घालून दोन पाट काढलेत. |

तोंडाला पाणी सुटतें काय ? अगोदर, सह्याद्रींत उगम पावणाऱ्या व शंभु-महादेवावर धार धरणाऱ्या अशा दोन जाती नद्यांत आढळतील. हा जाती-भेद ज्यांना मान्य नसेल त्यांच्याकरतां दुसरा आहे. पश्चिमेकडे उंच भागांत उगम पावून पूर्वेकडे वा अग्नेयीकडे उगवत्या सूर्याला ' अर्घ्य ' देणाऱ्या कांहीं आहेत, तर उत्तरेकडील उंचीवरून उडी घेऊन दक्षिण-'दिशे' ला जाणाऱ्या कांहीं आहेत. आतां अशा भेदाकडे किंचित् कानाडोळा केला तरी हें दुर्लक्षून चालत नाहीं कीं सह्याद्रींतील नद्या पश्चिमेकडील डोंगराळ भागांतून व घाटाखालच्या प्रदेशांतून वाहतात; पश्चिम भागांत त्यांचें पाण्यास खळखळाट फार व घाटाखालच्या प्रदेशांत बराच संथपणा; आणि हिवाळ्यांत नि उन्हाळ्यांत त्यांच्या पाटाचें पाणी थोडेफार शेतीस उपयोगी येतें. शिवाय, सातारा जिल्ह्याला पाणीदार करणाऱ्या नद्यांपैकीं कोयना व वारणा या रुंद, सावकाश वाहणाऱ्या, पुष्कळ पाणी असणाऱ्या आणि बऱ्याच लांब जाणाऱ्या आहेत. वेरळाही लांब आहे. तरी ती उथळ. पाणी फार जोरानें वाहते नि लोंढयानें नुकसान करतें.

पण आतां असें सर्वसामान्य बोलण्याचें सोडून आपण प्रत्येक नदीचें पाणीच [पान १२ अ व १२ ब वर दिल्याप्रमाणें] पारखलें तर काय बिघडेल ?

## ठोकताळा ४ :

# जीवनाचें किरण-चित्र.

सातारा जिल्ह्याला कृष्णानदीचें खोरें ह्मणणें ह्मणजे जिल्ह्याच्या परिचयाची खूणगांठ नव्हें, हे एकदां लक्षांत आलें ह्मणजे मन हट्टाला पेटतें; अन् सांगतें कीं माझा परिचय सातारा जिल्ह्याच्या जीवनानेंच पटवण्यास मी तयार आहें. सातारा जिल्ह्याचें जीवन ह्मणजे पाऊस. त्याचा विचार केला तर असें खास खास ह्मणतां येतें कीं सह्याद्रीपासून अरबीसमुद्र जितका लांब त्याच्या २० पट बंगालचा उपसागर लांब. जून महिन्याच्या अखेरीस अरबीसमुद्रावरून नैॠत्येकडून ईशान्येकडे पावसाळी वारे वाहूं लागतात. हे सप्टेंबरअखेर जिल्ह्यांत येतात. हे आक्टोबरमध्यें वाहण्याचे बंद होतात. त्यामुळें पश्चिमेकडून येणारे झडीचे पाऊस पूर्वेकडे कमी कमी होत जातात. बंगालच्या उपसागरावरून आग्नेयीकडून वायव्येकडे वाहणारे वारे जिल्ह्यांत हस्तनक्षत्रापासून पुढचा पाऊस पाडतात. तो जिल्ह्याचें पूर्व भागांत जास्त. बोलून चालून तो वळीव. अशा प्रकारें स्थूल मानानें पाहतां

| | | |
|---|---|---|
| पूर्व भागांत | —(विशेषतां माणदेशांत) कमींत कमी १० व जास्तींत जास्त २० व क्वचित् २७ इंच पाऊस होतो. | कारण झाडी व डोंगर कमी व हवा उष्ण. |
| मध्य भागांत | — घाटाखालील प्रदेशांत २० ते २५ इंच व घाटावरलि प्रदेशांत सरासरीनें ३० ते ४० इंच पाऊस होतो. | कारण उंच प्रदेश, बरीच झाडी व हवा सम-शीतोष्ण. |
| पश्चिम भागांत | —सरासरीनें ५० ते ६० इंच. कमींत कमी ४० व अधूनमधून ८० इंचही. अगदीं पश्चिमेकडे १०० इंचाहून अधिक. महाबळेश्वरीं सरासरीनें १७० ते २०० इंच. वेळ-प्रसंगीं ३०० इंचही. | उंच डोंगर, दाट झाडी व जंगल नि हवा थंड म्हणून. |

तालुकावार जीवनदर्शन १४ अ वर पहा. ]

## तालुकावार जीवन-दर्शन.

| तालुका | विशेष पाऊस | सरासरी पाऊस | क्षेत्रफळ | लोकसंख्या १९३१ | वसूल रु. | गांवें खालसा | गांवें इनाम | पिकाऊ जमीन | मुख्य पिकें |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वाई | पश्चिम बाजूस | २५ ते ३५ इंच | ३२३ चौ. मैल | ८५१३३ | १९३८३४ | ८२ | २८ | कृष्णा कांठची | बाजरी, ज्वारी, नाचणी, हुलगा, गळिताची धान्यें, गहू, भात, तूर, हरबरा, उडीद. |
| २ सातारा | ,, | ४० ते ५० इंच | ३३९ चौ. मैल | १२४५३५ | २८८८५३ | ११० | ४१ | वेण्णाखोरे, परळीखोरें, उरमोडीखोरें, य पूर्वसरहद्दीवरील कृष्णाकांठचा प्रदेश | भात, नाचणी, बाजरी, ज्वारी, हरबरा, तूर, भुईमूग. |
| ३ खटाव | येरळेच्या पश्चिमेस. पूर्वेकडील पावसाचा प्रिय तालुका. | १७ ते २२ इंच | ५०५ चौ. मैल | ९२५४८ | १८६४६३ | ५४ | ३१ | येरळेच्या पश्चिमेकडील भाग | गहूं, बाजरी, मिरची, तंबाखू, आंबे, पेरू, केळीं, तांदूळ, विड्यांचीं पानें. |
| ४ माण | निश्चित नाहीं. | १० ते १५ इंच सरासरी ६.४७ | ६३४ ते ६३८चौ.मैल | ६८७६६ | १२५३६० | ७२ | ५ | वायव्येकडून अग्नेयीकडचा माण-गंगेकांठचा | बाजरी, मटकी, हुलगा, शाळू, हरबरा. खपली हुंडी, मका, मिरची, राताळी, डाळिंबें. |
| ५ खानापूर | पश्चिमेस पण वळिवाचा पूर्वेस. | २० ते २५ इंच | ४७६ ते ५०२ चौ.मै. | ८९५६१ | १९८९४८ | ६९ | २१ | येळावी-नाश्नी यांच्यामुळें पश्चिमभाग | बाजरी, डुकरी, गहू, भुइमूग, ऊस, हळद, मिरची, विड्याचीं पानें |
| ६ तासगांव | पश्चिमेकडून येणारा पश्चिमेकडेस | २५ ते ३० इंच | ३७४ चौ. मैल | ९७३६३ | २५३९८२ | ३७ | १२ | कृष्णाकांठ व येरळाकांठ | कापूस, तंबाखू, बाजरी, डुकरी, हळद, शाळू हरबरा, अरगड, करडई, तीळ, भुइमूग, गूळ |
| ७ जावली | सर्वच तालुका पावसाचें माहेरघर | १०० ते ३०० इंच सरासरी १७० इंच | ४२५ चौ. मैल | ७४१९२ | १४०३५६ | १८५ | ७१ | कृष्णा-कुडाळी-वेण्णा-कोयनाकांठची जमीन | भात, नाचणी, वरी, सावा, वाल, वाटाणा, घेवडा, पावटा, भुईमूग. |
| ८ पाटण | बहुतेक सर्व तालुक्यांत | ४० ते ५० इंच | ५०७ चौ. मैल | १२१३२२ | १७२८१० | ११५ | ८८ | तारळी-कोयना मोरणाकांठचा प्रदेश २ डोंगरांतील सखल. | ज्वारी, भुईमूग, ऊंस, भात, वरी, नाचणी, लसूण, कांदा, मिरची, तंबाखू. |
| ९ वाळवें | पश्चिम भाग | पश्चिमेस ३५ ते ५० पूर्वेस २५ ते ३० इं. | ५४९ चौ. मैल | १८८४४५ | ६१०४७२ | ९८ | ४२ | शिराळेपेट्याशिवाय कृष्णा-वारणा कांठची २ डोंगराळ भागांतील तांबूस व काळी. | भुइमूग, कापूस, तंबाखू, हळद, गूळ, मिरची, विड्याची पानें. |
| १० कोरेगांव | उत्तरेकडे | २५ ते ३५ इंच | ४१२ चौ. मैल | ९३८५५ | ३६१९५० | ७१ | १५ | वसनानदीमुळें बहुतेक तालुका | शाळू, तूर, बाजरी, भुईमूग, मिरची, कांदे, बटाटे. |
| ११ कऱ्हाड | येळगांव खोरें, कोळें-तळबीड-चोरे भाग | २५ ते ४० इंच सरासरी २७ इंच | ३७६ चौ. मैल | १४३९९२ | ४३४६९७ | ७४ | २८ | बहुतेक सर्व | भात, वरी नाचणी, शाळू, भुईमूग, पेरू, गूळ, हळद, तंबाखू, विड्याची पानें, मिरची |
| १२ सं. औंध | * | ३० इंच | ४४७ चौ. मैल | ६५१४६ | ३५०००० | * | २१ | * | हुंडी, मका, खपली, ज्वारी, बाजरी, हरबरा, डाळिंबे, ऊस. |
| १३ सं. फलटण | पावसाच्या गैरमर्जितील | * | ६९३ चौ. मै. | ६६३८३ | २००००० | * | ७४ | १ उत्तरेकडील सखल. २ नीराकनालमुळें मध्य भाग | ज्वारी, बाजरी, तूर, हरबरा, ऊस. |

स्थूलदर्शनांत पटतात त्या गोष्टी अशा कीं पश्चिम व पूर्वभागांत डोंगराळ व तांबूस जमीन आहे. पण पूर्वभाग सपाट नि माळरान. पश्चिम-भागांत जरी पाऊस 'मी' म्हणून पडतो, तरी डोंगराळ प्रदेशाला उतार फार असल्यामुळें माती नि पाणी वाहून जातात. म्हणून पावसाचा उपयोग होत नाहीं. मध्यभागांत मात्र काळी व कसदार जमीन आहे. कारण तेथें कृष्णा, कोयना, वारणा यांचे कांठ तर आहेतच, पण वर पावसाचें पाणी जमिनींत मुरतें. कऱ्हाड, कोरेगांव, वाळवें हे तालुके आणि तासगांवचा पश्चिमभाग तशा पाण्याचपाण्यामुळें पिकाऊ आहेत.

आणखी असें सांगतां येतें कीं पश्चिमभागांत उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे. जमीनीची खोली साधारणपणें एक हातापेक्षां कमी. तथापि डोंगर पुष्कळ, त्यामुळें पाऊस वेळेवर पुष्कळ म्हणून पीक मध्यम. पूर्वभागाची तर स्थिति डोळ्यांत पाणी उभें करणारी. कारण डोंगर कमी, नद्या थोडया, प्रदेश माळ. काळी जमीन मोठया मिनतवारीनें भेटणारी. म्हणून दुष्का-ळाला अडसर होण्याइतपतच इकडे पीक. तीच जिल्ह्याची मध्यपट्टी पहा. हाताच्या मधल्या बोटासारखी ती आपली उंच. इथें डोंगर कमी पण पाऊस पुरेसा. घाटाखालील प्रदेशांत जमीनीची खोली दोन हात नव्हे, थोडीशी वरच. जमीनीचा रंग काळाभोर असून चांगली पिकाऊ. त्यामानानें घाटा-वरील प्रदेशाच्या पश्चिमभागाची मध्यम प्रत लागेल. तिचा रंगही पण साधा-रणच काळा ! !

जिल्ह्याच्या जमीतींतील पीक-पाहणी प्रत्यय पटवते कीं साधारणपणें १/५ ज्वारीनें, १/१० बाजरीनें, १/२० भुईमुगानें; १/२० हरबरा-तांदूळ-गहू यांनीं पिकाऊ जमीनीचा भाग दरसाल व्यापतो व बाकीच्या ३/५ भागांत पड-जमिनी वजा जातां इतर पिकें होतात. जिल्ह्याच्या तीनही भागांत सर्व-साधारण अशीं पिकें आढळतात:—

| पश्चिमपट्टी | मध्यपट्टी | पूर्वपट्टी |
|---|---|---|
| तांदूळ (मुख्य पीक) सावा, राळा, वरी, नाचणी, वाटाणा-वाल, बटाटा, घेवडा, पावटा, भुईमूग, (थोडयाप्रमाणांत) कांदा, तीळ, कारळा, करडी, ताग. | शाळू-जोंधळा (मुख्य पीक). ( आषाढ ते भाद्रपद या खरीप हंगामांत विशेष ) डुकरी, भुईमूग, जोंधळा. (वळिवाच्या रब्बी हंगामांत विशेष)शाळू,तंबाखू. सामान्यतः कापूस, तूर, मूग, मटकी, हरबरा, गहू, आलें, मका, बटाटा, ऊंस, हळद, नागवेलीचीं पानें, बाजरी, डुकरी, अरगडी, मिरची, कांदा, लसूण. | बाजरी (मुख्य पीक) मटकी, शाळू, गहू, हरबरा, भुईमूग, तूर, मूग, उडीद, मका, जोंधळा, करडी, खपली, हुंडी,रताळी. |

जिल्ह्याच्या पश्चिमभागांत उत्पन्न कमी, लोकवस्तीही कमी. मध्यभागांत लोकवस्ती दाट, लोक खाऊन पिऊन राहणोरे. पूर्वभागांत वस्ती दाट, उत्पन्न कमी. ह्मणजे पहिल्यांत हाता-तोंडाशीं गांठ पडत नाहीं, दुसऱ्यांत कशीबशी बसते तर तिसऱ्यांत बसवावयाची तर ‘ ततः शंखाश्च भेर्यश्च ’ ! म्हणून प्रमुख पिकें नि त्यांचीं माहेरघरें पाहून ठेवणें जरूर आहे.

| पिकें | माहेरघरें |
|---|---|
| १ तांदूळः– | (जिल्ह्याच्या पश्चिमभागच्या डोंगराळ प्रदेशांत जमीन तांबूस व पाऊस पुष्कळ ह्मणून खूप पिकतो. रायभोग–कुडाळ खोऱ्यांत नि पांचगणीचे ईशान्येस तर तामसाळ तारळे भागांत व खटाव तालुक्यांतील जांबजाखणगांव भागांत उत्तम) १ वाईचा पश्चिमभाग, २ सातारच्या पश्चिमभाग, ३ जावली, ४ पाटण, ५ शिराळेपेटा. |

| पिकें | माहेरघरें |
|---|---|
| २ शाळू:– | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ सातारा, ३ कोरेगांव, ४ खटाव, ५ तासगांव, ६ जावली, ७ पाटण. |
| ३ हरबरा:– | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ सातारा, ३ कोरेगांव, ४ खटाव, ५ खानापूर. |
| ४ बाजरी:– | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ सातारा, ३ कोरेगांव, ४ खटाव, ५ माणपेटा; ६ खानापूर, ७ तासगांव. |
| ५ गहूं:— | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ सातारा, ३ खटाव, ४ माण, ५ आटपाडीमहाल, ६ खानापूर ( पूर्व भागांत विहीरीओढयांवर ). |
| ६ बटाटे:– | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ कोरेगांव (वाठार भाग) ३ खटाव (पाटाचे पाण्यावर), ४ जावली (महाबळेश्वरभाग) |
| ७ कांदे:– | १ वाईचा पूर्वभाग व कृष्णाकांठ, २ (लिंबंद भाग)कोरेगांव. |
| ८ वरी:— | १ वाई, २ सातारा (पश्चिमभाग), ३ जावली. |
| ९ नाचणी:– | ,, ,, ,, |
| १० सावा:– | ,, |
| ११ घेवडा:— | ,, |
| १२ अरगड:— | १ सातारा, २ माण. |
| १३ आलें:– | १ सातारा (नागठाणें-बोरगांव भाग, विशेषतां सासपडें भाग.) |
| १४ भुईमूग:– | १ कोरेगांव, २ खटाव, ३ खानापूर, ४ पाटण, ५ कऱ्हाड, ६ वाळवें. |

| पिकें | माहेरघरें |
|---|---|
| १५ विडयाचीं (नागवेलीचीं) पानें:— | १ कऱ्हाड, २ कोरेगांव, ३ वाळवें, ४ [नान्नी नदीचा कांठ] खानापूर. |
| १६ गिडगापः— | १ खटाव, २ खानापूर, ३ तासगांव, ४ वाळवें. |
| १७ ऊंसः— | १ कृष्णाकांठ, २ नीराकांठ, ३ वारणाकांठ, ४ सर्व धरणांवर, ५ खटाव (विहीरींचे पाण्यावर). |
| १८ हुंडीः— | माणपेटा. |
| १९ तंबाखूः— | १ तासगांव, २ वाळवें, ३ कऱ्हाड. |
| २० कापूसः— | १ तासगांव-पश्चिमभाग, २ वाळवें-पूर्वभाग. |
| २१ डाळिंबेंः— | माणपेटा [राणंदभाग]. |
| २२ रताळीः— | ,, |
| २३ डुकरीः— | १ खानापूर, २ तासगांव, ३ वाळवें. |
| २४ उडीदः— | ,, |
| २५ हळदः— | १ कृष्णाकांठ, २ वारणाकांठ, ३ नीराकांठ, ४ विहिरींवरील बागाईत जमिनींत व विशेषतां ५ वाळवे तालुका. |

सातारा जिल्ह्याचें असें हें पोट पिकावयास केवळ नद्यांच्या रूपानें वा पावसाच्या निमित्तानें वाहणारी देवाची दयाच कारण नाहीं. मानवी प्रयत्नांनीं धरलेल्या धरणा-कालव्यांचाही हात-भार त्या पोटपिकांत आहे. पहा:—

| तालुका | धरण-तलाव-कालवा | उपयोग | इतिहास |
|---|---|---|---|
| १ जावली | १ वेण्णातलाव | | १ मालकमपेठेच्या पूर्वेस १ मैलावर आहे. |
| | २ कासचा तलाव | २ पावणेतीन चौरस मैलांच्या क्षेत्रफळाच्या या तलावाचें १५ मैल पसरणारें पाणी त्याच्या डाव्या बाजूनें काढलेल्या ३-४ फूट रुंद पाटांतून नळानें सातारा शहरास नेलें आहे. त्याचा उपयोग पिण्यास व वीज करण्यास होतो. | २ सन १८८४ सालीं २६०९८२ रु. खर्चून बांधला. |
| २ कोरेगांव | १ रेवडी येथील वसनेचें धरण. | १ सहा मैल लांबीच्या टापूंतील ८९०-९०० एकर क्षेत्रांस पाणी पुरवतें. | १ सन १७८१ मध्यें नारो अप्पाजी कुलकर्णी यांनीं बांधलें. तें १८६३ मध्यें इंग्रजांनीं दुरुस्त केलें. |
| ३ खटाव | १ धोंडेवाडीचा तलाव. | | १ अथणीजवळ धोंडेवाडीचा ओढा अडवून बनवला आहे. |
| | २ वाकेश्वर कालवा. | | २ वडूजजवळ येरळा नदीला वाकेश्वर येथें बंधारा घालून बनवला आहे. |

| तालुका | धरण-तलाव-कालवा | उपयोग | इतिहास |
| --- | --- | --- | --- |
| | ३ नेरचा तलाव<br>४ खातगूणचें धरण | ३ } १८मैल लांबीच्या टापूंतील२९१२<br>४ } ते ३००० एकर क्षेत्र भिजतें. | ३ उजवा फांटा ९ मैल लांब व ५-६ फूट रुंद तर डावा ८॥। मैल लांब, रुंद ५-६ फूट. |
| | ५ मायणी कालवा | ५ आठ मैलपर्यंत १२२७ एकरांस पाणी पुरतें. | ५ वांगना नदी अडवून ३८० एकर क्षेत्रफळाचा सन १८७६ सालीं मायणी तलाव मातीचा बंधारा घालून बांधला. या बंधाऱ्याचे मागें दाट झाडी असून एका टोकास मारुतीचें देऊळ आहे. |
| ४ माणपेटा | १ गोंदवलें कालवा | १ पिंगळी तलावापासून ४-५ फूट रुंदीच्या फाटयानें ७ मैल लांबपर्यंत ७११ एकर रान भिजवतो. | १ पिंगळीचा ओढा अडवून व माण-नदीस बंधारा घालून पिंगळींचा तलाव केला आहे. |
| | २ राजेवाडी कालवा | २ मूळ १७ मैल लांबपर्यंत २४० एकर जमीन भिजे. पण५-७फूट रुंदीच्या या पाटाबरोबरीनें सोलापूर जिल्ह्यांत अनेक फाटयांनीं३०हजार एकर जमीन भिजते. | २ सन १८८२ सालीं ७३६४८० रु. खर्चून ह्सवडतलावाच्या पाणी—पुरवठयास आटपाडीमहालांत राजेवाडीच्या तलावाची जोड दिली. |

| तालुका | धरण-तलाव-कालवा | उपयोग | इतिहास |
|---|---|---|---|
| ५ खानापूर | १ चिखली धरण | १ चिखली तलावाचें पाणी ६ मैल-पर्यंत ५ फूट रुंदीच्या पाटानें २५० एकरांस पाणी पाजतें. | १ नान्नीनदीस बंधारा घालून बनवला. |
| ६ कऱ्हाड | १ खोडशीचें धरण | १ कऱ्हाड तालुक्यांतून १७ मैल, वाळवें तालुक्यांत १० मैल व तासगांव तालुक्यांत ८ मैल अशा ३५ मैल टापूंतील ४०६२ एकर जमीनींत ऊंस-हळद-खपली उत्पन्न करण्यास प्रामुख्यानें उपयोग. | १ कृष्णानदीस खोडशी येथें तट बांधून केलें आहे त्यास आतां ७० वर्षें झालीं. |
| ७ सं. फलटण | नीरा (दक्षिणकांठ) राईट बँक कॅनाल् | १ फलटण संस्थानास आणि आंदोरी-पाडेगांव (ता. कोरेगांव) येथील जमीनीस फार उपयोग होतो. एरवीं, फांटा सांठ मैल आहे. | १ भाटघर येथें वळवंडी नदीस अडवून तें पाणी नीरा नदींत सोडलें आहे; व तेथें दोन बैलगाडया जाण्याइतकी रुंद अशी एक मैलभर भिंत घालून भाटघर तलाव केला आहे. |

या पाणलोटांची मिजासदेखील मुख्यतः १ जून ते ३० सप्टेंबर पर्यंतच्या पावसावर. कारण जिल्ह्याचा खरा पावसाळा तोच. पुढें मुळीं १५ नोव्हेंबरपर्यंत उकाडयाचा हंगाम, ३१ जानेवारीअखेर हिवाळा, फेब्रुआरी–मार्चांत कोरडी उष्णता नि एप्रिल मे हे महिने कडक उन्हाळ्याचे. जिल्ह्यांतील या ऋतुमानाचे तसेंच हवामानाचेही परिणाम मानवी-जीवनावर झाले आहेत. पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत समुद्रसपाटीपासून बराच उंच म्हणून हवा थंड, घाटाखालील प्रदेशांत समशीतोष्ण, घाटावरील प्रदेशांत व माणदेशांत उष्णच उष्ण. अगदीं पूर्वेकडील भागाचा तर अनुभव असा कीं हिवाळ्यांत थंडी जास्त, उन्हाळ्यांत उष्णता जास्त. तथापि हवेंत ओलावा कमी म्हणून ती निरोगी. हें सर्व लक्षांत घेऊन जिल्ह्याच्या जीवनाचें छुपें किरणचित्र काढावयाचें तर तें असें:—

| बाबत | पश्चिमपट्टी | मध्यपट्टी | पूर्वपट्टी |
|---|---|---|---|
| १ हवा | ज्येष्ठ ते अश्विन अखेर रोगट, पण कार्तिक ते वैशाख निरोगी | निरोगी | उष्ण पण आरोग्य-कारक |
| २ धंदा | शेती-हमाली | शेती-देवघेव | शेती-मजुरी |
| ३ खाणें | तांदूळ | शाळू-जोंधळा व क्वचित् दूध-दुभतें | बाजरी |
| ४ शरीर | बावळें पण कमालीचें काटक | मध्यमपणें सुदृढ | काटक, कष्टाळू, धिप्पाड |
| ५ स्वभाव | भोळा पण कमालीचा विश्वासू व पापभीरु. | मिजासखोर, चळवळ्या व हमरीतुमरीचा. | भोळसर व तुसड |
| ६ राहणी | रासवट | 'बरें खावें बरें ल्यावें' | सीधी |
| ७ संपत्ति | बासनाफजीत | हातचलाऊ | चिंधीधांदोटीची |
| ८ शिक्षण | निनांवी | नांव घेण्यासारखें | नांवापुरतें |
| ९ घरें | कौलारू लहान छपरें | पत्र्या मंगलोरी कौलांची ठाकठीक. | माळवदी |

## ठोकताळा ५ :

# ही जिल्ह्याची शेती ! !

सातारा जिल्ह्याच्या ११७९७१२ जीवांचा ' चरु ' कसा चालतो हें सामान्यतः व तेंही किंचित् पाहिलें. खोल जाऊन सांगावयाचें तर येवढया लोकसंख्येपैकीं २४०००० लोक खुशाल बेकार आहेत असें धरून चालावयास हरकत नाहीं. ह्मणजे एक तर वाजवीहून दुप्पट लोक शेतीवर गर्दी करून आहेत व बाकीचे धंदा ' लिहिण्याचा, घरकामाचा, घरचें बघून असण्याचा ' असा कांहीं तरी लावतात अगर ६५००माणसें 'भिक्षा मागणें हाच आमचा धंदा ' असें खुशाल सांगतात. तथापि लोकसंख्येंतील मिळवत्या माणसांचें प्रमाण भूमितीच्या बिनचूकपणानें काढावयाचें ठरविलें तर असें आढळून येईल कीं, दर हजारीं ३४६ मिळवते, ३९ अंशतः परावलंबी व ६१५ पूर्ण परावलंबी जीव सातारा जिल्ह्यांत आहेत. फार काय, मिळवत्या माणसांच्या दर हजारापाठीमागें ६९३ शेती ( यांतील $\frac{2}{3}$ लोकांना ६महिने शेतीवरही काम नसतें !), १०५ उद्योगधंदे, ७४व्यापार, ४४ नोकरी व ८४ इतर धंदे करीत असतात. जिल्ह्याचा मुख्य धंदा जो शेती, त्यांतलाही अघळपघळ अंदाज असा कीं, २१ एकर जमीन लागवड करून राबणाऱ्या ५ माणसांच्या कुटुंबाचें वार्षिक उत्पन्न ५४१ रु. भरतें. आणि कितीही अट्टाहासानें चढ उत्पन्न दाखविण्याचा कोणी प्रयत्न केला, तरी ६ शहरांच्या, १३३६ खेडयांचा व २४८७५१ घरांच्या सातारा जिल्ह्यांत १९४० सालीं १३४८२५० इतकी लोकसंख्या धरून चाल-

त्यास शंभर मिळवत्या माणसांचें खालीं दिलेलें प्रमाण बहुशः पडेल—

| | | | |
|---|---|---|---|
| १ते २५रु. वा. उ. चें | २·५ | १७५ते २२५ रु. वा. उ.चें | ७·४ |
| २५ते ५० ,, ,, ,, | १६·३ | २२५ते २७५ ,, ,, | ४·० |
| ५०ते ७५ ,, ,, ,, | २३·७ | २७५ते ३२५ ,, ,, | २·२ |
| ७५ते १२५ ,, ,, ,, | २५·१ | ३२५ते ३७५ ,, ,, | १·६ |
| १२५ते १७५ ,, ,, ,, | ११·१ | अधिक ,, ,, | ५·७ |

एवढें उत्पन्न पडूनही कोंबडीं, कोंबडयांचीं अंडीं, कृष्णा-कोयना-येरळा यांत सांपडणारे मासे आणि हरणें-ससे-मेंढया-शेळ्या यांचें मांस लोकांना खावें लागतेंच. कारणें अनेकविध आहेत. पण मुख्यतः शेतींतीलही कारण आहे. तें असें कीं, ४० इंचापेक्षां जास्त पाऊस पडत नाहीं अशा काळ्या जमिनींत ज्वारी पेरतात आणि जेथें ती होत नाहीं तेथें बाजरी करावी लागते. तांबड जमिनींत आयर्न पॅरा ऑक्साइडच्या सान्निध्यानें शाडूचा अंश निर्माण होतो असें लेदर साहेबांचें मत आहे. सर्वांत सुपीक गणलेली काळी जमीनसुद्धां कॅल्शियम कार्बोनेट्स व मॅग्नेशियम कार्बोनेट्स यांचें जास्त प्रमाण तींत असेल तरच सुपीक असते. पावसाचें पाणी सांठवून ठेवण्याची शक्ति असलेली दुपिकी काळी जमीन वरील तऱ्हेचीच होय. अशी वीस फूट सरासरीनें खोली असणारी जमीन पहिल्या प्रतीची मानण्यांत येते. अशा पहिल्या प्रतीच्या जमिनींत एकरीं उत्पन्न पडतें तें असें कीं, भुईमूग ८६४पौंड; ऊस २५४४पौंड; गहू ६६२पौंड; तांदूळ ७०१पौंड; जोंधळा ७६८पौंड वगैरे. या इयत्तेनें शेतीचा कस धरीत गेल्यास जिल्ह्याचें चित्र कसें दिसतें तें खरोखरीच अभ्यसनीय आहे. निरनिराळ्या वेळचे तालुक-

बार दर रुपयास बाजारभाव नुसत्या ज्वारीपुरतें सरासरीनें लक्षांत घेऊं. ते असें–

| तालुका | १८९१ते १९२१ | | १९१७ते १९२१ | | १९२८ते १९३७ | | १९३०ते १९३४ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेर | छटाक | शेर | छटाक | शेर | छटाक | शेर | छटाक |
| माण | १३ | ८ | ६ | ९ | १९ | ० | २२ | ० |
| खटाव | १३ | १० | ६ | १३ | १८ | ० | २१ | ० |
| कोरेगांव | १३ | ७ | ६ | १४ | १८ | ० | २० | ० |
| खानापूर | १४ | ८ | ६ | १४ | १९ | ० | २१ | ० |
| जावली | १३ | ६ | ६ | ८ | १८ | ० | २० | ० |
| पाटण | १२ | १० | ६ | ६ | १८ | ० | २० | ० |
| वाळवें | १४ | ० | ६ | १२ | १९ | ० | २१ | ० |
| वाई | १२ | १५ | ६ | १० | १८ | ० | २० | ० |
| सातारा | १३ | ७ | ६ | ६ | १८ | ० | २० | ० |
| कराड | १३ | ७ | ६ | १२ | १८ | ० | २० | ० |
| तासगांव | १७ | ० | ७ | ४ | २१ | ११ | २१ | ० |

अशा ज्वारीच्या ताळमेळांत एकरीं उत्पन्न बसवूं लागलों तर सरासरीनें पीकवार थोडेसें असें बसेल–

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ज्वारी | १३-१०-० रु. | हरबरा | ४-१२-६ रु. | एकरीं सरासरी |
| कापूस | ११- ९-९ , | मिरची | ८- ०-० , | उत्पन्न |
| तंबाकू | १०-१५-० ; | हळद | १६- ८-० ; | १३-२-० रु. |
| ऊंस | ३४-११-३ ; | बाजरी | ४- ०-० ; | |
| भुइमूग | ९-१२-६ ; | गहू | १३- ६-० ; | |

शेतीची वस्तुस्थितीच त्यासाठीं थोडी माडू. जिल्ह्यांत शेती धारण करणाऱ्यांत ९१·१ टक्के खातेदार ' छोटे खातेदार ' असून शेती धारण करणारांचें लोकसंख्येशीं प्रमाण २९·७ टक्के आहे. खातेदारांपैकीं ७५·१ टक्के खातेदार स्वतांची जमीन स्वतां करतात; १५ टक्के जमीन भाग-वाटयानें देतात. आणि राहिलेले ९·९ टक्के खातेदार आपली जमीन खंडानें लावतात. या शेवटच्या २४·९ टक्के खातेदारांचे व त्यांच्या कर्ध्यांचे संबंध असे—

| | वाटा(बा) | वाटा(जि) | खंड(बा) | खंड(जि) |
|---|---|---|---|---|
| १ मालक; खातेदार ऊर्फ वरिष्ठ धारण करणार | १/२ | ३/५ | कमाल सरकारी साऱ्याचे ६ पट. | कमाल सरकारी साऱ्याच्या ४·४३ पट |
| २ कूळ, रयत, कर्दा ऊर्फ कनिष्ट धारण करणार | १/२ | २/५ | — | — |

खंडाची जिल्ह्यांतील सरासरी पट सरकारी साऱ्याचे २·३२ पटच पडते. १ सामान्यतः देखरेख करणें २ सरकारी सारा भरणें ३ बांध-ताली वगैरेंनीं जमिनींची निगा राखणें व ४ आपल्या वाटयाप्रमाणें बी-बियाणें-खतपाणी यांचा खर्च करणें या जबाबदाऱ्या मालकावर असतात तर १ जमिनींची मेहनत-मशागत-पेरणी व २ वाटयाप्रमाणें बीं-बियाणें-खत घालणें या जबाबदाऱ्या कर्ध्यावर असतात. भाग-वाटयापेक्षां खंडानें लावलेल्या जमिनीबाबत फरक इतकाच असतो कीं बी-बियाणें-खतपाण्याची जबाबदारी सर्वस्वी कर्ध्यावर राहते. स्वतः जमीन कसणारे आणि कर्दे साधारणतः पुढीलप्रमाणें मुख्य मुख्य पिकांची पेरणी-कापणी साधीत असतात.

| पीक | पेरणी | कापणी |
|---|---|---|
| १ ऊस | फेब्रुवारी | मार्च |
| २ भात | जून | आक्टोबर-डिसेंबर |
| ३ गहू | आक्टोबर-नोव्हेंबर | फेब्रुवारी-मार्च |
| ४ ज्वारी | जून-ऑगस्ट | नोव्हेंबर-जानेवारी |
| ५ बाजरी | जून | आक्टोबर-नोव्हेंबर |
| ६ मूग-उडीद | जून-जुलै | डिसेंबर-जानेवारी |
| ७ तूर | जून-आक्टोबर | फेब्रुवारी-एप्रिल |
| ८ हरबरा | आक्टोबर | फेब्रुवारी-मार्च |
| ९ कापूस | जून-जुलै | डिसेंबर |
| १० भुईमूग | जून-जुलै | आक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर |

शेतीची कांहींशी डोळस कल्पना पान २७अ व २८वरील तक्त्यांवरून येईल.

याउप्पर शेतीच्या मागें बारा पापग्रह असतात ते असे—
(१) ऊंस व भुईमूग यांच्या लागवडीचे ठिकाणीं रानडुकरांची वसती होते. डोंगरी भागांत व जंगलांत लाखों रुपयांचें नुकसान तीं करतात. वाघ, बिबळे, लांडगे, कोल्हे, तरस जनावरांचा फडशा नि हरीण, सांबर, टोळ शेतीची दुर्दशा करतात. कारण शेतकऱ्याजवळ परिहाराचें शस्त्र काय आहे ? (२) गांवगुंड (३) मांत्रिक (४) तमाशे (५) दारू (६) बुवासोदे (७) गंजड (८) मांगगारुडी, चित्रकत, गोपाळ, कंजार, वैदू व चोरटे, देऊळवाले, जंगम, धोपे, वडार (९) बाजारपेठेंतील धर्मादाय (१०) कुशल शेतकी शिक्षणाचा अभाव (११) व्यापाऱ्यांचें जमीनभाडें, दलाली, भिकार, बाजारपट्टी, गोरक्षण, कडतन, घसारा, नमुना यांचा अतिरेक (१२) शिक्षणाचा अभाव. इतक्यांना तोंड देऊन मग शेतकऱ्याच्या संसाराचा बाजार पुढें पान २९वर दिल्याप्रमाणें होतो.

| तालुका | पेरणीखालील जमीन एकर | दर शंभर एकरीं सारा देण्यास अपात्र जमीन | ऊंस जमीन एकर | नाचणी-वरी जमीन एकर | सरकारी पड एकर | मोटस्थळ एकर | पाटस्थळ एकर | लहान नांगर | मोठे नांगर | पाट | मोटांच्या विहिरी | नांगरटीचे बैल | नांगरटीचे रेडे | वळू बैल | वळू रेडे | दुभत्या गाई | दुभत्या म्हशी | शेळ्या-मेंढ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ माण | ४२१६९ | २८ | २३८ | ४ | ८२८७ | ६७९२ | १९६८ | १७०२ | १०९१ | २६० | ६०१+२२९९ | १५४५८ | ६२ | १० | १७ | ९६५९ | १८८६ | ७१७९० |
| २ खटाव | ४०५७८ | २७ | ९५६ | ३ | ४४३६ | ४३८४ | ३७६७ | ७०३ | १३९७ | ५६७ | १२६०+ ९९० | १४४७९ | ९९ | ६३ | १९ | ८६१८ | ३६११ | ३५५२७ |
| ३ कोरेगांव | ३५९६७ | २४ | २६९ | ११ | २८०२ | ३३५२ | ३१५५ | १२० | ९७३ | ३२५ | ११३०+ ७१० | १०५३७ | १९ | ३२ | १८ | ७५०७ | ३७५० | १५६२१ |
| ४ जावली | ५७४२ | ५९ | ११६ | ६७५९ | ५२३८४ | १२४ | ३००९ | ४६४३ | ४०२ | ८७५ | १७६+ ७६ | ६५१८ | १२३० | २४ | १२ | ६५५२ | ५७७४ | ३६०३ |
| ५ वाई | ९५७० | ३६.५ | ३३० | २२५४ | ३६५१४ | ४१०१ | २८८८ | १९२० | ७६८ | २७६ | ११९८+ ३३५ | ८५२७ | ६४ | २३ | १९ | ४१९८ | ३११४ | ३०३३ |
| ६ सातारा | १६८१७ | ३३ | ५७३ | १२९३ | १७८६० | २१२७ | ७९७१ | १४५९ | ९०० | १३३७ | ८८६+ ४३६ | १२६२० | २०७ | १३४ | ५७ | ७९३९ | ६९४३ | ११५२६ |
| ७ कराड | ३०८५६ | २८ | २२३७ | २०७१ | ८३३४ | ६४१२ | ५२८९ | १५९४ | १२०० | ४०९ | १७४०+११२६ | १९१०७ | १२९ | ५३ | ३४ | ९३९९ | ८८९४ | ३०८५० |
| ८ वाळवें | २९५२५ | ३१ | २२५४ | ५१०४ | ३१६१७ | १०१६८ | ८०३ | २३८२ | १७५९ | १७४ | ८९३+२३७१ | ९५२३ | १९४५ | ३३ | ४६ | १०६४२ | १११७८ | ३८८५९ |
| ९ तासगांव | २५७२९ | २९ | १५९४ | ४३ | ६५९५ | २०१२ | ३८८९ | ८३८ | ६०९ | २२६ | ५६९+ ४४२ | ७३१३ | १७५ | २८ | १२ | २७२१७ | २६२७ | ५७७४ |
| १० खानापूर | ४६६६० | २८ | ५७८ | १९ | ११६६३ | ८९११ | ४६४३ | ७०१ | १४८४ | ५९० | ११३७+२९३१ | १५७२३ | ३०६ | ५३ | १९ | ८६४४ | ४०९६ | ३४६५४ |
| ११ पाटण | १०२६६ | ६५ | ५८१ | १२८०७ | ६६०१९ | ६२९ | ३९३१ | ५४२० | ११९४ | ८१९ | २७५+ २१९ | १२९३५ | १०६९ | २१ | ६ | ९०१३ | ६०४५ | ५९३८ |

| तालुका | वास्तविक उत्पन्नी जमीन एकर | आकारी जमीन एकर | खातेदारांचें लोक सं. प्रमाण | खातेदारांशीं खंडानें देणारांचें प्रमाण | खातेदारांशीं जमीन वाट्यानें देणारांचें प्रमाण | खातेदारांशीं स्वतः जमीन कसणारांचें प्रमाण | खातेदारांशीं छोटया खातेदारांचें प्रमाण | उंची पिकाखालील जमीन एकर | उंची ज. चे आकारी जमीनीशीं शेकडा प्रमाण | उंची ज. चे पिकाखालील जमीनीशीं शेकडा प्रमाण | बिनउत्पन्नी ज. चें आकारी जमीनीशीं शेकडा प्रमाण | उत्पन्नी ज. चें आकारी जमीनीशीं शेकडा प्रमाण | बिनउत्पन्नाची आकारी जमीन एकर | दुपिकी जमीन एकर | भात जमीन एकर | गहू जमीन एकर | कापूस जमीन एकर | गळिताचीं धान्यें जमीन एकर | पिकाची जमीन एकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ माण | १७७१४२ | २२७५४९ | २७ | ९ | २३ | ६८ | ८५ | ४५२२ | २·० | २·५५ | २२·२ | ७७·८ | ५०४०० | ९२६७ | ४६७ | २९३७ | १९ | ६६१ | २१९३१५ |
| २ खटाव | १३०५६३ | १५११४१ | ३० | १४ | २७ | ५९ | ९४ | १०३२७ | ६·६ | ९·३ | २५·१ | ७४·९ | ४४३२७ | ११७५० | २४५ | ५२२३ | १ | ३९०२ | १४६७०५ |
| ३ कोरेगांव | ७२७०५ | १०८७५२ | ३४ | ८ | २३ | ६९ | ८८ | १३५९८ | १३·० | १९·० | २२·७ | ७७·३ | ५२२३४ | २३२२ | २६४ | २८०७ | १ | १०२५७ | १०५९५० |
| ४ जावली | ३५००७ | १०१८९२ | ३३ | ५ | १२ | ८३ | ९४ | १०८९२ | १०·० | ३१·० | ५९·४ | ४०·६ | ६४८८५ | ९४६६ | ५७१९ | २४८५ | ० | २५७२ | ४७५०८ |
| ५ वाई | ८१९६३ | १३०३०१ | ३० | ९ | १२ | ७९ | ९५ | १३१७३ | ९·९ | १७·१ | ३६·६ | ६३·४ | ४८२३८ | ११६४३ | ३३२५ | ३०५८ | ० | ६४३० | ९३७८७ |
| ६ सातारा | ७०२५४ | ११५००७ | ३० | १२ | ११ | ७७ | ९४ | १५०७८ | १३·० | २१·४ | ३०·८ | ६९·२ | ३५९७० | १०७६३ | ३२७० | २७८३ | ० | ८४५२ | ९९१६४ |
| ७ कराड | १०५७५८ | १४७०४९ | ३३ | ९ | १० | ८१ | ९१ | १८३१९ | १२·१ | १७·४ | २८·३ | ७१·७ | ४१२६१ | १०६१५ | १८९४ | १६७३ | ८७ | १२९२८ | १३८७१५ |
| ८ वाळवें | १४३०७१ | २१६३१७ | २४ | १० | ८ | ८२ | ९१ | ३२३६३ | १५·९ | २२·४ | ३१·२ | ५८·८ | ६६२४६ | १२४१७ | १०५३३ | ५२१८ | ५६७५ | ९१८३ | १७७७०० |
| ९ तासगांव | ८२२२३ | १२३३३३ | २६ | १४ | ९ | ७७ | ८९ | २१४८४ | १०·३ | १४·६ | ३१·६ | ७८·४ | ५१३१४ | २९४८ | ८६७ | ३२१४ | ४०५ | ४०१३ | ११९००७ |
| १० खानापूर | १४१२८७ | २०९६२९ | २७ | ९ | १५ | ७६ | ९० | १०४९० | ५·० | ७·४ | २८·० | ७२·० | ५८३४२ | ६४०९ | ४४१ | ५३५१ | १४४ | ३९७६ | १९७९६६ |
| ११ पाटण | ४७६५० | १३६७४२ | ३५ | १० | १५ | ७५ | ९२ | २०४७७ | १५·० | ४१·० | ६५·२ | ३४·८ | ८९०९२ | १३०८३ | ८३३८ | १२५७ | १ | १०४०० | ७०७२३ |

## पान २७ अ मधील तक्त्यांतील शेतीवर सरकारी आकार असे भरावे लागतात –

| तालुका | कमाल जिराईत दरएकरी सारा रु. | किमान जिराईत दरएकरी सारा रु. | सरासरी दरएकरी सारा रु. | कमाल बागाईत दरएकरी सारा रु. | किमान बागाईत दरएकरी सारा रु. | सरासरी बागाईत दरएकरी सारा रु. | कमाल तरीचा दरएकरी सारा रु. | सरासरी तरीचा दरएकरी सारा रु. | एकंदर साऱ्याची सरासरी एकरी रु. | वास्तविक पिकाऊ जमि सरासरी एकरी रु. | भात जमिनींचा कमाल एकरी दर रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ माण | २-४-० | १-८-० | ०-५-८ | ३-२-५ | १-१२-१ | १-१५-८ | ८-०-० | १-१२-६ | ०-६-८ | ०-८-७ | ८-०-० |
| २ खटाव | २-१०-० | १-१४-० | ०-१०-३ | ४-९-० | २-७-३ | ३-८-२ | ८-०-० | २-८-३ | ०-१२-३ | १-१-५ | ८-०-० |
| ३ कोरेगांव | ४-१०-३ | ४-७-० | १-१५-६ | ७-७-१० | ६-९-२ | ७-१-२ | १२-०-० | ४-११-१० | २-४-५ | ३-१२-० | १२-०-० |
| ४ जावली | ४-४-० | १-८-० | ०-८-६ | ७-२-० | ४-९-१ | ५-१३-२ | १३-४-० | ५-१-१० | १-०-० | ३-२-२ | १३-४-० |
| ५ वाई | ४-४-० | १-०-० | १-७-० | ७-४-९ | ४-९-१ | ६-१५-११ | १३-४-० | ४-१२-९ | १-१५-६ | २-६-८ | १३-४-० |
| ६ सातारा | ४-१०-० | १-१०-० | १-९-३ | १०-१०-० | ८-०-० | ५-६-११ | १३-०-० | ६-३-० | २-४-८ | ३-१३-१ | १३-४-० |
| ७ कराड | ४-१०-० | ४-०-० | २-११-१० | १२-०-० | १०-०-० | ६-७-७ | १३-५-० | ५-६-११ | २-१४-१० | ४-१-१ | १३-५-० |
| ८ वाळवें | ४-५-० | १-४-० | २-११-३ | ११-५-० | ६-८-० | ३-१३-९ | ११-५-० | ४-१२-० | २-१४-२ | ४-३-६ | ११-५-० |
| ९ तासगांव | ४-४-० | १-४-० | २-५-६ | १०-३-० | ६-८-० | ३-१२-० | ११-०-० | ८-१०-० | २-९-६ | ३-९-१ | १०-८-० |
| १० खानापूर | २-१०-० | १-१४-० | ०-११-६ | ३-१५-६ | ३-६-६ | ३-९-६ | १२-०-० | ४-८-९ | ०-१४-४ | १-५-३ | १२-०-१० |
| ११ पाटण | ४-०-० | १-२-० | ०-६-१० | १०-१०-० | ६-०-० | ३-१४-१० | ११-४-० | ४-२-११ | १-१-४ | ३-१-५ | ११-४-० |

| तालुका | मोटस्थळ आकार एकंदर रु. | पाटस्थळ आकार ऐकंदर रु. | पाणस्थळ शेतसारा एकंदर रु. |
|---|---|---|---|
| १ माण | ७५७५ | ६६०८ | २८७४ |
| २ खटाव | ७१६२ | १३७४२ | ७६९४ |
| ३ कोरेगांव | २०८ | २८ | २५२०० |
| ४ जावली | १०३ | ४५ | ७९५७ |
| ५ वाई | १६२ | ४१ | १८३३१ |
| ६ सातारा | २७ | ३४७ | ३५४१५ |
| ७ कराड | २० | ५०२ | ५५२२९ |
| ८ वाळवें | ३१ | ३६ | ४८८७८ |
| ९ तासगांव | | | |
| १० खानापूर | २४२ | १२ | |
| ११ पाटण | २४७१ | १२४२७ | १०६८२ |

## जिल्ह्यांतील बाजार.

सोमवार– विटें, शिराळें, मेढें, कोरेगांव, तारगांव, बुध, वाई, उंब्रज, वडगांव हवेली, पाटण, परळी.

मंगळवार– देवराष्टें, नेर्लें, देऊर, कलेढोण, खटाव, ढेबेवाडी, काले.

बुधवार– कासेगांव, तडसर, बागणी, मांगलें, पेठ, कोकरूड, रेठरें हरणाक्ष, कुडाळ, पाडळी स्टेशन, पुसेसावळी, कुरोळी, डिस्कळ, मसूर, कोळें, बेलवडे बु।।, हेळवाक.

गुरुवार– वांगी, अष्टें, लोणंद, रहिमतपूर, चितळी, कऱ्हाड, येळगांव, सातारा, इसलामपूर, चरण, चाफळ.

शुक्रवार– खानापूर, कडेगांव, बोरगांव, कामेरी, वाळवें, चिकुर्डे, आनेवाडी, राजापूर [खटाव], नांदगांव, पेटलोंड, शिरवडें.

शनिवार— लेंगरें, तोंडोली, येळूर, किन्हई, वडूज, भुईंज, चरेगांव, शेणोली, तारळें, तांबवें, कोरेगांव, अरळें.

रविवार—शाळगांव, इसलामपूर, सागांव, बामणोली, किरोली, वाठार, पिंपोडे, कुमठें, कातरखटाव, मायणी, पुसेगांव, सुरूर, कऱ्हाड, पाल, सातारा, बिळाशी, लिंब, मानेवाडी.

## गुरांचे बाजार.

सोमवार— विटें, वाई.

मंगळवार— पळूस, खरसुंडी.

बुधवार— म्हसवड, कालें, मांगलें, बेलवडे बु॥.

गुरुवार— गोंदवलें, इसलामपूर, रहिमतपूर, लोणंद, चरण.

शुक्रवार— शिरवडें, मसूर.

शनिवार— चरेगांव ( शेळ्यामेंढ्या ).

रविवार— मानेवाडी, कुमठें, इसलामपूर.

याशिवाय म्हसवड येथील नागोबाचा मार्गशीर्ष शु. १ चा, तांदूळवाडी ( कोरेगांव ) येथील महाशिवरात्रीचा; ब्रह्मपुरी येथील पौष ब. ३० चा आणि किन्हई व औंध येथील पौष शु.१५चे बाजार विशेष होत.

तेव्हां सातारा जिल्ह्यांतील मध्यम पट्टींतील १४७ कुटुंबांच्या पाहणी वरून ' शेतकरी मरत नाहीं म्हणून जगतो ' याचें प्रत्यंतर कसें येतें पहा—

| | | |
|---|---|---|
| कुटुंबें १४७ | बागाईत एकर ८२८१३ | मजुरी रु.१०७७ |
| माणसें ७४१ | शेतीसाठीं कर्ज रु.१३५५० | |

शेतींच्या उपयोगी माणसें ३५८ वार्षिक व्याज रु.२२६९॰८ जनावरजोपासना रु. १९९१

सरकारी सारा रु.२३५८॰१४॰११ एकूण उत्पन्न रु. १६६७४॰४

घरचीं जनावरें ४६० लोकलफंड रु. २९७॰१५॰२

शेतीचीं जनावरें १६० पाणीपट्टी रु. १८६॰१२

जमीन एकर १२६२॰८ बीं-बियाणें १५५०

पानमळा खर्च रु. ११८९

खतपाणी रु. १८३१

म्हणजे एकंदरीनें निरनिराळ्या खात्यांची मुंबई इलाख्यापुरती सरासरीनें ६॥ रु. पण हिंदुस्थानचा विचार करतां १० रु. डोईपट्टी, खासगी कर्ज २० रु. व ५० रु. सार्वजनिक सरकारी शिक्क्याचें कर्ज हेंच प्रत्येकाचें सातारा जिल्ह्यांत ' प्रारब्ध ' असतें.

## ठोकताळा ६ :

# हा जिल्ह्याचा व्यापार-व्यवहार.

इंग्लंडातील इंग्रजाच्या मानानें फक्त ⅙ ह्मणजे ३५० शेरच अन्न वर्षाचे सरासरीनें प्रत्येक माणसास सातारा जिल्ह्यांत खावयास मिळतें. मागें सांगितलेल्या " अंतरींच्या खुणे " सारखीच ही देखील परिचयाची पत समजावयास हरकत नाहीं. साधारणपणें ३१०६६० इतके जमिनीचे मालक नि ५११२५ इतके शेतमजूर यांच्या दैनंदिन खर्चाचा विचार केल्यास शंभर पैशापैकीं ४६·६अन्नासाठीं,१२·८१ घरगोठयासाठीं, ७·५५ कपडालत्त्यासाठीं, ७·११ वैरणकाडीपायीं आणि २५·७३ किरकोळ चैन-चहापाण्या-व्यसानापायीं खर्च होतात असें दिसेल. अशा तऱ्हेच्या जीवनांत दर दहा हजारीं वयोमान खालीलप्रमाणें आढळलें तर नवल कसलें ?

( सर्व जिल्ह्यांत १०० वर्षे उलटून गेलेले अवघे १९८ लोक. ते वजा जातां, सामान्यतः )

| वय | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| ० ते १० | २८०२ | २८८९ |
| १० ते २० | २०८६ | २०६२ |
| २० ते ३० | १७६८ | १८५६ |
| ३० ते ४० | १४३१ | १३५१ |
| ४० ते ५० | ९६८ | ८९१ |
| ५० ते ६० | ५६१ | ५४५ |
| ६० ते ७० | २६९ | २८१ |
| ७० चे वर | ११५ | १२५ |

हजारीं बालमृत्यूचें प्रमाणही पुरुषांत १८८ व स्त्रियांत १७० आहे. साधारणतः ८४४१७६ हिंदु, २२२८४५ मुसलमान, ६४५७ रानवट, ५८५२ ख्रिस्ती, अशा सर्व तऱ्हेच्या लोकांत हें प्रमाण निर-पवाद आहे. एकंदरींनें हजारीं ३९ जन्म व २६ मृत्यू असें प्रमाण आढ-ळतें. ९९८१ इतकी जन्मनोंद झाली तर ५१८५ मुलगे, ४७९६ मुली असें प्रमाण दिसतें. मृत्यूमध्यें

६३९ हागओकीनें, ५२ प्लेगनें, ४१६ देवींनीं, १४३७४ तापसराईनें, ११२७ अमांशादि रोगांनीं, १९७४ ' दमा ' वगैरेंनीं झालेले १८५७२ नोंदीप्रमाणें आढळतात. जिल्ह्यांत सरसालास नारूपीडीत ६२१४० लोक व महारोगी ३५२५ आहेत हेंही येथें विसरून चालणार नाहीं.

शास्त्रशुध्द शेती झाली आणि आज शेतकऱ्यांच्या पदरांत त्यांच्या मालाची किंमत २५ ते ४० टक्के पडते, हा अन्याय दूर व्यवहारतः झाला, व पाऊस नियमित पडला तर सातारा जिल्हा १७६०००० लोकांनाही वेळप्रसंगीं पोसूं शकेल. पण म्हणून सगळ्या लोकांना काम देऊं शकणार नाहीं. आजची स्थिति पाहिली तर ७३·८७ लोक शेतीवर, ७·१३ व्यापार उदीम-उद्योगधंद्यावर, १·४६ राज्ययंत्रावर, ७·५१ घरगुतीकामकाजावर, ·१६ केवळ सावकारीवर व ९·८७ टक्के लोक इतर व्यवसायावर आपल्या पोटाची गुजराण करतात असें सांगण्याची चाल आहे. तथापि दर ४० लोकांमागें फार तर १७ लोक ' श्रमानें मिळवते ' सांपडतील व त्यांतही १·६ कारखान्यांत गुंतलेले आढळतील. म्हणजे कारखान्यांतील लोकांचें एकंदर कामकऱ्यांशीं ९·४ टक्के व एकंदर लोकसंख्येशीं ४·० टक्केच प्रमाण पडेल. स्त्रियांपैकीं पुष्कळ त्या घरकामाबरोबर शेतमजूरीही करतात. पण श्रमाच्या मानानें पोषण नसल्यानें १० टक्के बायका " मुलें होण्याचे बंद होण्यापूर्वींच बाळंत होतांना २० ते ३० वयाचे दरम्यान मरतात. " जन्मलेल्या १००० मुलींपैकीं ४८३ मुली १५ वर्षेपर्यंत आणि २३८ मुली ४५ वयापर्यंत तग धरतात. उत्पादनक्षम मुलींपैकीं १६ टक्के विधवा आहेत. १००० पुरुषांमागें ९४० स्त्रिया हें सर्व जगांतील किमान प्रमाण आपल्या वाटयास आलें असून १५ ते २० वयाचे स्त्रीपुरुष साधारणतः समसमान आहेत तर १५ ते ४५ वयाच्या स्त्रिया २० ते ५० वयाच्या पुरुषांच्या मानानें अधिक आहेत. सरासरीनें एक हजार जन्मामागें मातांचे मृत्यू २४·५ होतात आणि प्रत्येक विवाहित स्त्रीस ४ मुलें सरळ होतात व

त्यांपैकीं २·९ टिकतात. २२४ मुलांपैकीं १७८ वयांत आलेले " बापे-बाप्या " दिसतात तर बाकीचीं बापडीं मृत्यूस मिठी मारतात. १५ ते ४० वर्षांच्या विवाहित स्त्रीस १० वर्षांखालील मुलें पाहिलीं तर हिंदूंत १·६४, मुसलमानांत १·७८ या प्रमाणांत बसतील असें वाटतें. असें असून ३७७ माणसांना खायला जें अन्न मिळतें तें फक्त २९१ माणसांना कसें तरी पुरण्यासारखें असतें. कारण दरमाणशीं मि० ईस्टच्या मतें जिथें कमींत कमी २॥एकर जमीन हवी तेथें फक्त १·६१एकर पडते. लागवडीखालील १०० एकरांस फक्त ३६जनावरें पडतात. पण खरें पाहिलें तर ६७ जनावरें व ८० माणसें यांचा भार त्या १०० एकरांवर प्रत्यक्ष व्यवहारांत पडतो. कारण जनावरामागें फक्त ०·७८ एकरच चराऊ जमीन लाभते. आणि वर्षास ४००००० रुपयांचें तूप होत असूनही रोज ७ औंस दूध सरासरीनें दर माणसास मिळतें न मिळतें. व माणशीं दरसाल १५ वारसुद्धां कापड मिळत नाहीं. अशा तऱ्हेचें जीवन सातारा जिल्ह्याबाहेर महाराष्ट्रांत जन्मलेले २३८०, हिंदुस्थानांत जन्मलेले ४७२, आशियांत जन्मलेले ५६, युरोपांत जन्मलेले १४ व इतरत्र जन्मलेले २ पण सातारा जिल्ह्यांत राहणारे लोक सातारा जिल्ह्यांतच जन्मून राहणाऱ्या लोकांप्रमाणें काढीत आहेत असें सरासरीवरून ह्मणण्यास जागा आहे. पण याचाच अर्थ असाही आहे कीं सातारा जिल्ह्यांतील लोक जिल्हा सोडून परठिकाणीं गेले आहेत पोटासाठीं. शेतीवर काम नसेल त्यावेळीं अगर कायमचे ह्मणून जवळ जवळ२६४०० लोक मजुरीसाठीं सातारा जिल्ह्याला रामराम ठोकून आहेत. वेजेगांवचे 'सुवर्ण-पारखी' लोक तर हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व सोनखाणींत नि टांकसाळींत कामें करीत आहेत. फार काय, दक्षिणआफ्रिकेंत ६६२ लोक असून त्यांपैकीं एकट्या नाताळांत ५७२ आहेत; केनियांत १७, मॉरिशसमध्यें १०७५, ट्रिनिदादमध्यें ५५५; ब्रिटिशगिनीमध्यें ५२२ व फिजीमध्यें२०१ लोक सातारकर असावेत.

या साऱ्याचें कारण यांत्रिकयुगानें व साम्राज्यशाही स्वार्थानें खेड्याखेड्यांची स्वयंपूर्णता आणि ह्मणूनच परस्परसहकाराचे धंदे साफ बुडाले, हें उघड आहे. याचें एकच प्रत्यंतर असें कीं जिल्ह्यांतील आयात टक्केवारीनें पुढीलप्रमाणें देतां येतेः— मुख्य पेठा कऱ्हाड व कोरेगांव. त्याखालोखाल इसलामपूर, सातारा व वाई. यांतून जिल्ह्यांत १०० रु. चा माल आला तर—कापूस नि कापसाचें कापड १५·९२, तेलें १०·७६, यंत्रसामुग्री ९·८७, निरनिराळे धातु ७·७१, धान्य-डाळी वगैरे ७, वाहनें ५·१३, चाकू कातऱ्या वगैरे ३·५३, कृत्रिम रेशीम २·८०, लोकर व लोकरीचें कापड २·३८, कागद २·२७, डांबर १·९२, लोखंडी सामान २·९१, इमारतीचें लाकूड २·७२, रेशमी कापड १·६४, औषधें १·२५, मादक द्रव्यें १·३३, रबर १·०९, मसाल्याचे पदार्थ १·०५, फळफळावळ ·९१, कांच ·८६, शिकारीचीं हत्यारें ·३४, रंग ·७०, तंबाकू ·४९, स्टेशनरी ·५९, खतें ·५८, चहा ·५३, इमारत सामान ·५२, सौंदर्य प्रसाधनें ·५१, गुलजार पोशाख ·३८, पुस्तकें ·४८, फिती सुया ·३७, यंत्राचे पट्टे ·३५, मीठ ·५२, घड्याळें ·३०, चिनीमाती ·२८, पशु ·२७, छत्र्या ·२५, साबण ·१४, पादत्राणें (बूट वगैरे) ·१३, शोभेचें सामान ·१२, काड्याच्या पेट्या ·१२, साखर ·१३, दगडी कोळसा ·१०, मासळी ·०४, जूट ·०४, जवाहीर ·०२, इतर ·२०. धान्यांपैकीं नुसतें तांदूळच कमींत कमी ५४०० टन येत असतात हें हिशेबी घेऊन बाकीचें गणीत फुरसतीनें करावें म्हणजे झालें !

जिल्ह्यांत आजही विणकाम करणारे साळी-कोष्टी, चांभार, शिंपी, सुतार, गवंडी, लोहार, कुंभार, तांबट, सोनार, कासार, ओतारी, दलाल, मोटारमालक-एजंट-ड्रायव्हर असे लोक नांवापुरते व थोडें नांव कमवूनही आहेत. ५५० इतक्या पिठाच्या गिरण्या बहुतेक सर्व शहराळलेल्या वस्ती-पर्यंत पोंचल्या आहेत, आणि १९२० तेलघाणे ऊर्फ तेलाच्या गिरण्या

त्यांच्याच बहिणी होऊं पहात आहेत. मेढयासारख्या ठिकाणीं भात सडयाची गिरणी झाली आहे. मग कऱ्हाड, ताकारी, इसलामपूर, तासगांव, रहिमतपूर अशा ठिकाणीं हळद चोळण्याच्या गिरण्या आणि ताकारी, इसलामपूर, कऱ्हाड, मसूर, रहिमतपूर, कोरेगांव, तासगांव इत्यादि ठिकाणीं शेंगा फोडण्याच्या गिरण्या झाल्या असल्यास नवल काय ? शिवाय २१६० लोखंडी नांगर आणि ६०० चरक जिल्ह्यांत चालतात. ते व शेतीकारखान्यास नि घरगुती उपयोगास लागणारे लोखंडी सामान तयार करणारे किर्लोस्कर बंधु (किर्लोस्करवाडी), कूपर एंजिनिआरिंग वर्क्स (सातारा रोड) व फडके इंडस्ट्रिअल वर्क्स कराड; ओगलेवाडीचा कांच कारखाना; सांगलीच्या गजानन-सरस्वती मिल्स व कऱ्हाडची सरय्या मिल; औषधी द्रव्यांचा नि देवीच्या लशीचा किन्हई येथील कारखाना; वरकूट-चोरे येथील बांगडयांचे उद्योग; साताराचे पेंडसे मेटल वर्क्स नि लांजेकरांचा सॅल्युलाईडचा कारखाना; कवठें-बावधन (ता. वाई), म्हसवड (माण), तडसर-कडेगांव (खानापूर) व पलूस (तासगांव) येथील लुगडीं— खटाव तालुका, म्हसवड-दहिवडी-महिमानगड (माण), आटपाडी महाल व अहिरें (वाई) येथील घोंगडी—म्हसवड (माण), कडेगांव (खानापूर) येथील पासोडया वगैरे ७२० हातमागांवर होणारे जिन्नस, पलूसचीं सुताचीं पोतीं; कृष्णाकांठच व विशेषतां भिलवडीचें तूप; उंब्रजच्या राष्ट्रीय कलाभुवनांतील निळी-काळी-तांबडी शाई व पॉलिश पेपर, औंध सोप वर्क्स (ओगलेवाडी) नि माणिक सोप वर्क्स (कऱ्हाड) यांचें साबण; सातारा येथील तांब्यापितळेचीं भांडीं; चिंचणी (तासगांव) चा चुना; कृष्णाकॅनॉल नि वारणाकांठ भागांतील गूळ, लिंबचे पेरू, गोटयाचीं वांगीं आणि साताराचे कंदी पेढे हे सर्व व्यापारांत सातारा जिल्ह्याचें नांव करतात यांत शंकाच नाहीं. याशिवाय सातारा जिल्ह्याची सगळीकडे गाजलेली तालुकावार निर्यात अशीः—

सर्वच तालुक्यांतून— कोंबडीं, अंडीं, शिंगें, हाडें, कच्चीं कातडीं.

सातारा— रेशीम, जर्दा, पेढे, आलें, शाळू, पेरू, मिरची, तांब्या-
पितळेचीं भांडीं.

जावली— फणस, हिरडा, शिकेकाई.

वाई— तांदूळ, बटाटे, आंबे.

कोरेगांव— कांदे, बटाटे, लोखंडी नांगर, शेंगदाणा, नागवेली.

खटाव — आंबे, घोंगडीं, वाख, पेरू

खानापूर— शेंगदाणा, घोंगडीं, पासोडया.

तासगांव— लोणी, नांगर, हळद, चुना, कडबा, नागवेली, शेंगदाणा,
कापूस, तंबाखू, लुगडीं, मिरची, गूळ.

वाळवें— लोणी, कापूस, तंबाखू, शेंगदाणा, नागवेली, गूळ, कडबा.

कऱ्हाड— कांच सामान, शेंगदाणा, नागवेली, गूळ, साबण, तंबाखू,
हळद, शाई, तेल.

पाटण— फणस, सागवान, तांदूळ, आंबे, हिरडे, शिकेकाई.

माण— डाळिंबें, घोंगडीं.

सं. फलटण — साखर, शाळू.

सं. औंध— घोंगडया.

अशा तऱ्हेनें ३४९१५६ टन माल रेल्वेनें व बाकीचा बैलगाडीनें-मोटारनें मिळून ७ लक्ष टन माल तरी बाहेर जात असावा.

पण या आयात-निर्यातींचा विचार करतां दुःख होतें. कारण स्वतांच्या मालाची किंमत गिऱ्हाइकाच्या मर्जीवर राहते आणि स्वतां गिऱ्हाइक असतांना " गरजवंताला अक्कल नाहीं " असा अनुभव जिल्ह्याला येतो.

## ठोकताळा ७ :

# उत्सव नि उत्साह.

सातारा जिल्ह्याच्या परिचयाच्या गोष्टींत ही एक ठळक गोष्ट सांगितली पाहिजे कीं जिल्हा समुद्र सपाटीपासून साधारणतः १५९० फूट उंचीवर असला तरी त्यांत

| ठिकाण | उंच फूट | ठिकाण | उंच फूट | ठिकाण | उंच फूट |
|---|---|---|---|---|---|
| कमळगड | ४५५१ | महाबळेश्वर | ४५०० | पांचगणी | ४३७८ |
| पांडवगड | ४१७७ | चंदनवंदन | ३८४१ | कऱ्हाड ता. माण पेटा | १६०० |
| थोरोबा | २९३६ | प्रतापगड वैराटगड | ३५४३ | नांदगिरी | ३५३७ |
| सातारा स्टे. | २३५१ | सातारा शहर | २२०० | ब्रम्हनाळ | १५०० |
| समनामीर | ३२६० | कोरेगांव स्टे. | २१७६ | रहिमतपूर स्टे. | २०५८ |
| तारगांव स्टे. | २०२४ | जावली, पाटण शिराळें | २००० | कराड स्टे. | १९४४ |
| विंध्यवास | ३५७१ | वसंतगड | २९५० | लोणंद स्टे. | १९३९ |
| कोरेगांव ता. | १९०० | खटाव ता. | १८०० | | |

अशा संस्मरणीय उंचीही आहेत. या उंचीच्या मानानें निसर्गाची कृपा कितपत उंचीची आहे, हें पारखण्यासाठीं माहेवार उष्णतामान व पाऊस पाहून ठेवण्यासारखा आहे.

| महिना | कमाल उष्णता अं. | किमान उष्णता अं. | पाऊस अं. |
|---|---|---|---|
| जानेवारी | ८७·४ | ५९·१ | ·१५ |
| फेब्रुवारी | ९२·९ | ६२·५ | ·०६ |
| मार्च | ९९·६ | ६९·१ | ·१९ |
| एप्रिल | १०४·१ | ७५·३ | ·४४ |
| मे | १०४·५ | ७६·७ | १·०३ |
| जून | ९५ | ७३·६ | ४·६८ |
| जुलै | ८९·४ | ७२ | ४·३२ |
| आगस्ट | ८८·८ | ७०·९ | ४·८७ |
| सप्टेंबर | ८८·६ | ७०·८ | ७·९८ |
| आक्टोबर | ९०·६ | ६८·७ | ३·२३ |
| नोव्हेंबर | ८७·७ | ६२·८ | १·६५ |
| डिसेंबर | ८५·५ | ५८·३ | ·४५ |

म्हणजे जिल्ह्याचें वार्षिक कमाल उष्णतामान ९.२·८, किमान उष्णतामान ६८·३ व पाऊस २८·४५ इतका असतो. अशा स्थितींत (पिण्याचें) पाणी नसलेली १२ व नांवापुरतें पाणी असलेलीं २५० गांवें असलेल्या जिल्ह्यांत चालेलेल्या जीवनाचा स्थूल विचार केल्यास, गांवांतील घटकांना व्यक्तिस्वातंत्र्याच्या भलत्या कल्पनांनीं पछाडून एकाजिनसीपणा कसा नाहींसा केला आहे, त्याचाही पुरावा मिळतो. जिल्ह्यांत १० रु. खालील ५१९, ५० रु. खालील २६४८, १०० रु. खालील १८७८, ५०० रु. खालील २९९३, १००० रु. खालील ४७६, ५००० रु. खालील ३०८, ५००० रु. वरचे ३६ आणि इतर १९९ असे ९०६७ दिवाणी दावे सुमारें २५८४३२१ रु. किंमतीचे (१० वर्षांच्या) सरासरीनें गुदरले जातात.

फौजदारी फिर्यादीपैकीं पूर्वीच्या वर्षीचे अनिर्णीत खटले ३०२, दाखल खटले ७७८६, खटला भरलेल्या व्यक्ति ७८४९, शिक्षा होणाऱ्या व्यक्ति ७१३२, निर्दोषी सुटणाऱ्या व्यक्ति ७१७ आणि खटला सुरू व्हावयाचा म्हणून अगर शोध नीट व्हावा म्हणून तुरुंगांत असलेल्या अगर जामीनावर खुल्या असलेल्या व्यक्ति ४५३ अशी वर्षाची सरासरी सांपडेल. गुन्ह्यांची चिकित्सा थोडी अशी—

| स्वरूप ( गुन्ह्याचें ) | होणारे गुन्हे | शाबित गुन्हे |
|---|---|---|
| राज्ययंत्राविरुद्ध अगर सार्वजनिक शांततेस बाधक | ३५ | १४ |
| खून | १९·९ | ६·३५ |
| व्यक्तिविरुद्ध भयंकर स्वरूपाचे | १७७·२ | ८०·९ |
| दरोडा | ८·२५ | २·१ |
| गुरे चोऱ्या | ३२·६ | १९·४५ |
| चोऱ्या | ३४६·२ | १५१·१ |
| घरावर अतिक्रमण | ३७१·४ | ८२·१ |

जमिनींचे एकेक गुंठ्यापर्यंत पडलेले तुकडेच तुकडे आणि पोटाची उपासमार आणि जोड धंद्यांचा अभाव व अज्ञानाच्या जोडीला सुधारणा-प्रगतींचा पारखेपणा ह्या गोष्टी जशा गुन्हे घडवितात तशी व्यक्तिस्वातंत्र्याची मिजासही नाश करते. पहा कीं जिल्ह्यांत साधारणपणें २०४००० गाई व १६८०००० म्हशी आहेत; पण १४२ गाईपैकीं ११४ दूध न देणाऱ्या, २१ अर्धा शेर दूध देणाऱ्या, ५ एक शेर दूध देणाऱ्या व फक्त २ एक शेराच्यावर दूध देणाऱ्या सांपडतात. अर्थात् सरासरीनें ५ टक्के गाईच काय त्या दूध देणाऱ्या असें जगाच्या बाजारांत म्हणावयाचें. म्हशीला तोच कस लावला तर २६·५ टक्केच म्हशी दूध देतात असें म्हणावें लागेल.

५४ म्हशी घेतल्या तर १० बिनदुधी, ३० एक शेरपर्यंत, ४ दोन शेर-पर्यंत, ९ दोन ते तीन शेरपर्यंत व फक्त १ तीन शेर रोज दूध देते. वास्तविक म्हशीमागें ४ शेर व गाईमागें ३ शेर दूध नेमस्त मिळावयास हवें. पण दरसाल जिल्ह्याच्या कमींत कमी गाई मुंबईस व इतरत्र १४००० मारल्या जातात. इतर जनावरेंही तितकींच. जनावरांच्या व म्हणूनच माणसांच्या पोषणाची दैना वरीलप्रमाणें होते. बैल पोसण्यासाठीं शेतकरी धडपडतो, असें म्हणतात. खरें आहे. पण तेंही ५६ गाईमागें एक बैल पडावयास हवा, तो २६३ गाईमागें एक बैल पडतो. या ' दाखवावया 'च्या बैलाशिवाय जिल्ह्यांत शेतीसाठीं जी ढोरमेहनत होते ती सुमार १६०००००० रुपयांची होते असा जसा एक अंदाज आहे, तसा शेणखत १ कोटी ८ लक्ष रुपयांचें पडतें असाही अंदाज आहे. या वार्षिक अंदाजाबरोबर एक कोट रुपयांच्या अंदाजाचें वार्षिक दूध पोषणास किती थोडें जातें याची खास कल्पना यावयास दोन गोष्टी सांगितल्या म्हणजे पुरतील. एक अशी कीं तीन हजार वस्तीच्या गांवांत " चहा-पाण्या " वारी सरसालास पांच हजार रुपये सरतात. व दुसरी अशी कीं निरोगी माणसाचें सरासरी वजन १५४ पौंड असावयाचें तें जिल्ह्यांत १२४ पौंड सरासरीनें सांपडतें. असे हे १३७५ आखाडे–तालमींतून तुरळक तुरळक वावरणारे वळकटी-बळकटींचे लोक यात्राजत्रांचे मोठे चहाते असून ' देवाच्या दयेवर ' भिस्त ठेवणारे फार; त्यामुळें उत्सवयात्रांची गर्दीच गर्दी जिल्ह्यांत उसळते. अर्ध्या हिवाळ्यापासून उन्हाळा संपेतों चालणाऱ्या श्रीकृष्णाबाईच्या उत्सव यात्राशिवाय खालील उत्सव मोठ्या उत्साहानें जिल्ह्यांत होतात.

चैत्र शु॥ १ ते ९— फलटण, चाफळ, लेंगरें ( उरूस शु॥ ९ )
„ ५ — बनपुरी ( नाईकबा )
„ ५ ते १५— शिंगणापूर.
„ १५— पुसेसावळी, जरंडा, कऱ्हाड, येराड,
व॥ ११— मच्छिंद्रगड, शिराळें.

वैशाख शु॥ १४— नरसिंहपूर, धोम.

श्रावण शेवटचा सोमवार— बहुतेक नदीकांठ, विशेषतां कृष्णाकांठ, देवराष्ट्रे, मल्लिकार्जुन, कुरोली.

व॥ १ ते ८— जयरामस्वामींचें वडगांव, बाटेगांव.

भाद्रपद शु॥ ५— सुपनें, तासगांव (गणपत्युत्सव).

„ १४— औंध प्रतिनिधिउत्सव.

„ ४ ते १४— चिमणगांव गणपत्युत्सव.

आश्विन शु॥ १ ते ९— सोनजाई, ब्रह्मनाळ.

कार्तिक शु॥ १५— उरूण-पिराचा उरूस.

मार्गशीर्ष शु॥ १ — म्हसवडसिद्धाचा उत्सव.

„ १५— म्हसवड-नागोबा.

पौष शु॥१३— ( मृग नक्षत्रीं ) पालीचा खंडोबा.

„ १५— औंध यमाई यात्रा.

माघ व॥ १४— रेणावी, शिंगणापूर, कुरोली, क्षेत्र महाबळेश्वर, दुधगांव, गोवें.

व॥ ३०— बहें.

शु॥ ५ कोळें ( घाटगेबुवा )

व॥ ५ औदुंबर.

व॥ १ ते ९— परळी सज्जनगड.

फाल्गुन शु॥ १— दुधगांव ( पीर खाजा हैदरसाहेब यांचा उत्सव ).

व॥ ११— खातगूण ( पीर राजेवलींचा उरूस ).

जमादिलावल महिन्याच्या १९ तारखेस— रोझा बागणी येथील पीर अबदुल कादर बादशहा यांचा उरूस.

वरील उत्सवाप्रमाणेंच लोकांचीं प्रिय देवस्थानें जिल्ह्यांत आहेत तीं अशीं—

ता. वाई—१ वाई–श्रीविष्णु, श्रीगजानन. २ धोम–श्रीनरसिंह.

ता. सातारा—३ परळी–रामदासस्वामींची समाधि, ४ यवतेश्वर–यवतेश्वर; ५ धावडशी–ब्रह्मेंद्रस्वामींची समाधि, भार्गवराम, उत्तरेकडील डोंगरावर मेरुलिंग. ६ गोवें-कोटेश्वर.

ता. कोरेगांव—७ किन्हई–( साखरगंडवासिनी ) यमाईदेवी, ८ जरंडा डोंगर–बजरंग, ९ निगडी–रंगनाथस्वामींची समाधि.

ता. खटाव—१० ललगुण–नागनाथ, ११ खातगूण–पीर, १२ कुरोली–सिद्धेश्वर, १३ वडगांव–जयरामस्वामींची समाधि, १४ कातरखटाव–कात्रेश्वर, १५ औंध–यमाई ( मूळपीठ ).

पेटा माण–१६ शिंगणापूर–शंभुमहादेव, १७ मलवडी–खंडोबा, १८ म्हसवड–म्हसवडसिद्ध, १९ गोंदवलें बु॥ गणूबुवांची समाधि.

ता. खानापूर—२० रेणावी–रेवणसिद्ध, २१ पळशीडोंगर–शुकाचार्य, २२ लेंगरें–पीर, २३ देवराष्ट्रें–सागरेश्वर.

ता. तासगांव—२४ औदुंबर–श्रीदत्त.

ता. पाटण–२५ चाफळ–श्रीराम, २६ येराड–येडोबा.

ता. कऱ्हाड—२७ पाल—खंडोबा, २८ कोळें—घाटगेबुवांची समाधि, २९ कऱ्हाड-कृष्णाबाई, ३० पाल डोंगर-इंजाई.

ता. वाळवें—३१ मच्छिंद्रगड—मच्छिंद्रनाथ, ३२ शिराळें—गोरखनाथ, ३३ बहें—कृष्णानदींतील बेटावरील रामलिंग, ३४ येडेनिपाणी—मल्लिकार्जुन. ३५ नरसिंहपूर—नरसिंह, ३६ उरूण—पीर.

ता. जावली—३७ मोळेश्वर—मोळेश्वर, ३८ कुसुंबी—काळुबाई, ३९ प्रतापगड—श्रीभवानी.

नरसोबावाडीचा दत्त, कोल्हापूरची अंबाबाई आणि विशेषतां पंढरपूरचा श्रीविठ्ठल हीं दैवतें जिल्ह्यांतील वरील एकुणचाळीस देवस्थानांपेक्षांही लोकांना प्रिय आहेत. असे हे देवभक्त कितपत पापभीरु आहेत हें एकपरी मागें दिलेल्या खटल्याखोकल्यावरून जसें उमगेल तसेंच मादक पदार्थांच्या खपानेंही अजमावतां येईल. जिल्ह्यांत—

| | शहरीं | खेडयांत |
|---|---|---|
| क्षेत्र | १७ चौ. मै. | ४८९१ चौ मै. |
| लोक | ११२००० | १०६७००० |
| देशी दारूचें दुकान | ३·४ चौ. मै. त | १६०·६ चौ. मै. त |
| अफूचें ,, | ५·८ ,, ,, | ९५·७ ,, ,, |
| गांजाचें ,, | ५·८ ,, ,, | १३२.३ ,, ,, |
| दर १०००० लोकांमागें | | |
| देशी दारूचें दुकान | १·३४ | ·३६ |
| अफूचें ,, | १·०७ | ·३७ |
| गांजाचें ,, | १·०७ | ·३३ |

दर १०० लोकांमागें

| | |
|---|---|
| देशी दारूचा खप | ·९७ गॅलन |
| अफूचा ,, | ·०८ शेर |
| गांजाचा ,, | ·१८ ,, |
| भांगेचा ,, | ·००४ शेर |

प्रत्येक माणसामागें अबकारी वसूल ·४३ रुपये

प्रत्येक लंडनप्रुफ गॅलन दारूला रु. १८१३८४

अफू प्रत्येक शेरास रु. ७५

गांजा ,, ,, रु. ३०

भांग ,, ,, रु. ४

| सरासरी वार्षिक देशी दारूचा खप | | ब्रिटिशहद्दींत | संस्थानांत |
|---|---|---|---|
| जालीम | २५ यू. पी. | ८३० गॅलन | ३०० गॅलन |
| ,, | ३० ,, | ३४२९ ,, | ३२१० ,, |
| ,, | ४० ,, | ११६९१ ,, | १३१७ ,, |
| ,, | ६० ,, | ४५४० ,, | |

| सरासरी वार्षिक | ब्रिटिशहद्द | संस्थान |
|---|---|---|
| अफूचा खप | ९५० शेर | १०७३ शेर |
| गांजाचा ,, | २०६५ ,, | ८४० ,, |
| भांगेचा ,, | ४५ ,, | ५० ,, |

तालुकानिहाय यांची विक्री पुढील ठिकाणीं पुढीलप्रमाणें परवाना फी धरून साधारणतः होते—

| तालुका | गांजा शे. | प. फी रु. | अफू शे. | प. फी रु. | दारू गॅ. | प. फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| सातारा-सातारा शहर | २०० | ३००० | ७० | ५५०० | १८११ | १९०५१ |
| सदर बाजार | ४५ | ५०० | १२ | ६०० | १४० | २००० |
| नागठाणा | ७५ | ६०३ | २७ | ११०५ | – | – |
| शिवथर | – | – | ४ | १५० | – | – |
| परळी | – | – | ८ | ४०० | – | – |
| वाई— वाई | – | – | ३५ | १८०० | ७४८ | ८००० |
| सुरूल बाजार | १२० | २२५० | ११ | ५०० | – | – |
| भुईंज | – | – | १५ | ८०० | – | – |
| खंडाळा | – | – | १२ | ५०० | – | – |
| कोरेगांव-लोणंद | ९८ | १६०० | ५२ | २९०० | ३२४ | ३५०० |
| कोरेगांव | ११० | ८०० | ४५ | २००० | ४८३ | ४८०० |
| रहिमतपूर | ४० | २०० | १५ | ७०० | ५६ | ३४० |
| तारगांव | ३० | २५० | १० | ४५० | ७५ | १००० |
| पिंपोडे बु॥ | ३५ | ३६० | ९ | ५०० | ९० | १००० |
| देऊर | २७ | ३०० | १० | ५०० | ८७ | ७५० |
| भाडळी | — | — | १८ | ७०० | — | – |
| जावली-मेढें | २३ | ६०० | ५ | ३०० | १४३ | १४०० |
| कुडाळ ( अनेवाडी बाजार ) | ४० | ६०० | १९ | ७०० | ८७ | ३५० |
| म.महाबळेश्वर महाबळेश्वर | ५० | ७०० | ८ | ४०० | ९९९ | १२५५१ |
| पांचगणी | ३० | ५०० | ९ | ६०० | ५७९ | ८५०० |
| कऱ्हाड-कऱ्हाड | १७० | २५०० | ४० | १६०० | ९०० | १०००० |
| मसूर | ४६ | ५०० | १५ | ४५० | २४० | २००० |
| शेणोली | ६१ | ६०० | ७ | ३०० | १६५ | १००० |
| चरेगांव | — | – | ९ | ३५० | – | – |
| कालें | – | – | ५ | २०० | – | – |
| पाल | – | – | १० | ४०० | – | – |
| कोळें | – | – | – | – | ७६ | ४५० |
| नांदगांव | – | – | – | – | ६१ | ३०० |
| येळगांव | – | – | – | – | ६३ | २०० |

| तालुका | गांजा शे. | प. फी रु. | अफू शे. | प. फी रु. | दारु गॅ. | प. फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| वाळवें- इसलामपूर | ८० | १५०० | २० | १५०० | २८३ | ४०५१ |
| अष्टें | २० | ३०० | ३ | १५० | २०५ | ११०० |
| येलूर | – | – | – | – | ८० | २५० |
| चिकुर्डे | १६ | २०० | – | – | ३२ | १५० |
| काणेगांव | – | – | २ | ५० | ११६ | २०० |
| शिगांव | – | – | – | – | ५६ | १२५ |
| म.शिराळें-शिराळें | ६३ | ५९० | ४ | १०० | १३९ | ५८० |
| कोकरूड | २३ | २५० | – | – | १०४ | ३१० |
| आरळें | १७ | १०० | १ | २० | ६५ | २०० |
| पुनवाल | – | – | – | – | ८ | ५० |
| सांगाव | – | – | – | – | ५९ | २८० |
| भोगलें | – | – | – | – | १०४ | २४० |
| चरण | – | – | – | – | ५६ | १८० |
| पाटण—पाटण | | | | | | |
| ( हेळवाक बा. ) | ७२ | १००० | १२ | ६०० | १७९ | १००० |
| तारळें | ३९ | ४०० | १२ | ६०० | १०५ | ८०० |
| ढेबेवाडी | ७१ | ७०० | ३ | १२५ | १०७ | ६०० |
| मल्हारपेठ | २५ | २५० | १ | ५० | ५३ | ४२५ |
| मोरगिरी | – | – | – | – | ६७ | ३०० |
| तासगांव-तासगांव | ५० | ८०० | १३ | ६६० | ३४५ | १६०६ |
| सावळज | १२ | २०० | ३ | २०० | ३३ | १०० |
| पलूस | ४५ | ५०० | ९ | ३०० | २३३ | १५१० |
| सोनी | २० | १७० | ७ | २१० | – | – |
| भिलवडी | – | – | २ | १०० | ९० | ३०० |
| विसापूर | – | – | – | – | ८० | १६० |
| नागेवाडी | – | – | – | – | ७३ | ५०० |
| तोंडोली | – | – | – | – | ७१ | ७५ |
| बलवडी | – | – | – | – | ७१ | ७५ |
| खानापूर-विटें | ६५ | ८०० | १२ | १००० | ३४० | २४०० |
| कडेगांव | २५ | ४०० | ११ | ४६५ | ९३ | ९०० |
| वांगी | १२ | १०० | ३ | १०० | ४७ | ३०० |

| तालुका | गांजा शे. | प. फी रु. | अफू शे. | प. फी रु. | दारू गॅ. | प. फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| खानापूर | – | – | १२ | २८० | ५७ | १७५ |
| खटाव–वडूज | ५३ | ७०० | २० | ११०० | १९९ | १२०० |
| पुसेगांव | ३० | ५०० | २० | ८०० | — | — |
| मायणी | २० | २५० | ७ | ४४० | २७५ | १५०० |
| बुध | — | — | १५ | ६०० | ७९ | ५०० |
| खटाव | — | — | १३ | ६०० | — | — |
| पुसेसावळी | — | — | १२ | ५०० | १०१ | ६०० |
| म. माण–दहिवडी | ६० | १००० | ३९ | २४१० | ४५ | ६२५ |
| म्हसवड | ४३ | ८५० | २५ | २००० | ७६ | ७२५ |
| शिंगणापूर | ४० | ४०० | २३ | १००० | — | — |
| गिरवी | १० | २५० | १२ | ६५० | – | — |
| सं. औंध-सं.माहुली | ३७ | ३७५ | – | – | – | – |
| मनु | ७० | ५५० | – | – | – | – |
| कापील | ३६ | ३०० | – | – | – | – |
| सैदापूर | ४० | ४०० | – | – | – | – |
| कोर्टी | ४० | ५०० | – | – | – | – |
| कुंडल | ५५ | ३०० | – | – | २०५ | ९५० |
| किन्हई | २७ | ३०० | – | – | ५० | ५०० |
| दिगंची | १२ | २०० | – | – | ३६ | २०५ |
| आटपाडी | २० | ३०० | – | – | ६७ | ७०५ |
| खरसुंडी | २० | ३०० | – | – | — | — |
| औंध | ३५ | ४०० | – | – | १०३ | ११०० |
| सं.फलटण–फलटण | ६८ | २००० | – | – | २७२ | २८०५ |
| सं.मिरज (मोठी पाती) | | | | | | |
| मिरज | ९० | २००० | – | – | ९१५ | ११५०० |
| मालगांव | २० | १५० | – | – | १५० | ८०० |
| मोळ | १५ | १०० | – | – | ६० | १५० |
| ढाळेगांव | १० | १०० | – | – | ६३ | २४० |
| पाटगांव | — | — | – | – | २७ | ८५ |
| कवठे पिराण | — | — | – | – | २३ | ७५ |
| सं.सांगली–सांगली | ६५ | २००० | – | – | १०५० | ११५०० |

| तालुका | गांजा शे. प. | फी रु. | अफू शे. प. | फी रु. | दारू गॅ. प. | फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| महांकाळ कवठें | ३३ | ४०० | – | – | १५० | ४०० |
| भाडकिंबें | २० | १०० | – | – | ६० | २०० |
| डिग्रज | १० | १५० | – | – | ४८ | ६०० |
| कौलापूर | १५ | १२५ | – | – | १०३ | ६०० |
| हौसाळ | — | — | – | – | ६८ | ४५० |
| घोगांव | — | — | – | – | १५० | ७५० |
| सं.जमखिंडी-वाठार | ३० | ३०० | – | – | — | — |
| सं.मिरज (धाकटी पाती) | | | | | | |
| बुधगांव | ३२ | ३३० | – | – | — | — |
| बिराडसिद्ध कवठें | १५ | १२५ | – | – | ३१ | १०० |
| हरिपूर | २१ | २०० | – | – | — | — |
| देशिंग | — | — | – | – | ५० | ६० |

जिल्ह्यांत साधारणतः तेरा हजार गांजेकस आहेत. याचा विचार मनांत आणून, आपलें दारिद्र्य विसरावयास आणि संसाराच्या तापत्रयांतून जीवाला थोडें ' हायसें ' वाटावें म्हणून मादक पदार्थांप्रमाणेंच फोनोग्राफच्या प्लेटींनीं आकर्षणाऱ्या अगर चहाभज्यांच्या चवींनीं जीभ लालचावणाऱ्या उपहारगृहांचा आश्रयही सातारा जिल्ह्यांत खेडूत करतात. या गोष्टीकडे विचारवंतांनीं पहावें. सरकत वाटणीच केली तर या ' होटेलांची ' संख्या सातारा जिल्ह्यांतील गांवांइतकी तरी खास भरेल. कज्जेखटल्यांतील साक्षीदारांपासून वकीलापर्यंत आणि भेटलेल्या आप्तांचें स्वागत करण्यापासून फुरसतीचा वेळ घालवायचे साधनापर्यंत होटेलांचा उपयोग हरहमेश होतो. त्यांचा मुख्य उपयोग प्रवासी-परस्थांची स्वावलंबी सोय. तो फार तर

७/८ टक्केच होत असेल. फिरती नि स्थाईक बोलपटगृहें, नाटकें आणि तमाशे यांतही जिल्ह्याचा पैसा लग्नकार्यांपेक्षां चौपटीनें तरी खलास होतो. यात्राजत्रांच्या ठिकाणीं जसा संसाराचा तसाच मनाचा व शरीराचा बाजारही वरील तऱ्हेनें होतो. तेथें नित्याच्या बाजारपेठांतून तसा अनुभव येत असल्यास आश्चर्य काय? रजिस्टर कचेऱ्यांतून ५ कोटी ५० लक्षांचे कागद वर्षास करणारा जिल्ह्यांतील हा असा दरिद्रीनारायणाचा उत्सव उत्साहानें चालू असतो, तो "राजा कालस्य कारणम्" या न्यायानेंच असेल काय?



## ठोकताळा ८ :

# सोयी-बिनसोयी.

प्रजेला शहाणे करण्याच्या प्रयत्नांत इंग्रजी राजवटीला जें यश लाभलें आहे त्याचा विचार केला तर जिल्ह्यांतील ७·८५ लोक अक्षरमित्र आहेत. पुरुषांत हें प्रमाण १४·१ टक्के तर स्त्रियांत १·९ टक्के पडतें. प्राथमिक शाळा जिल्ह्यांत ११४९ असून त्यांत मराठी शाळाच १०७५ आहेत. त्यांपैकीं ८९२ मुलांच्या, ८३ मुलींच्या व १०० मुलामुलींच्या आहेत. ५७·५ टक्के शाळांतून ५२ विद्यार्थ्यांस एक शिक्षक वाटणीस येतो. त्याचा परिणाम ह्मणूनच कीं काय ७४ टक्के विद्यार्थी ४ थीची मजलही मारूं शकत नाहींत. याशिवाय उर्दू वर्ग–शाळा ७० असून ६१ मुलां-करितां नि ९ मुलींकरितां आहेत. यांपैकीं कऱ्हाड–पांचगणी या शाळाच परिपूर्ण शिक्षणक्रमाच्या आहेत. मराठी–शाळांचें वर्णन उर्दू शाळांसही लागू आहे. शेतकीशाळा जिल्ह्यांत फक्त पेठ, काले, भुइंज, भिलवडी, येथेंच आहेत. या सर्वांत मिळून एक लक्ष १५ हजार विद्यार्थी पढत अस-तात. शिक्षणखर्चापैकीं ४१·४ टक्के सरकार, १८·७ टक्के स्थानिकस्वराज्यें, २५·५ टक्के फींतून व १४·४टक्के इतर मार्गानें खर्च होत असतो. राजभाषा ह्मणून, फासन ह्मणून, नौकरीचें साधन ह्मणून व क्वाचित् ज्ञाननिधीची गुरुकिल्ली ह्मणून ६३९० विद्यार्थी इंग्रजी शिकतात. त्यांची सोय कोरेगांव, रहिमतपूर, विटें, मालकमपेठ येथील " तीन इयतांचे वर्ग " आणि वाईचे द्रविड हायस्कूल, पांचगणीची हिंदु–मुस्लिम–युरोपियन हायस्कूलें, साताराचें न्यूस्कूल, पॉप्युलर इंग्लिश स्कूल व सरकारी हायस्कूल, कऱ्हाडचें टिळक हायस्कूल नि महाराष्ट्र ए. व्ही. स्कूल, शिराळ्याचें व अष्टयाचें मिडल स्कूल, आणि तासगांव-इसलामपूर येथील हायस्कूलें यांतून होत असते. मुलींच्या इंग्रजी शिक्षणाची सोय वरील सर्व शाळांशिवाय सातारा-वाईच्या

कन्याशाळांतूनही होतें. यामुळें जिल्ह्यांत " आर्ट्स कॉलेज " चे विद्यार्थी ४९३ खालीं कधींच नसतात. धंदेवाईक विद्यालयांचे ( प्रोफेशनल कॉलेजचे ) विद्यार्थीही १६७ आढळतात. प्रत्यक्ष जिल्ह्यांत सातारा येथें लोकलबोर्डाचा एक धंदेशिक्षणवर्ग असून पोलीस-शाळा, वैद्यकशाळा, संस्कृतशाळा, फार काय ट्रेनिंग कॉलेज आणि शास्त्रशुद्ध संगीतशाळा हीं एकट्या सातारा शहराचींच शिक्षणक्षेत्रांतील वैशिष्ट्यें आहेत.

लोकशिक्षणाचें अधुनिक साधन जें नियतकालिकें तीं ( निरनिराळ्या शाळांतील विद्यार्थी—मासिकांव्यतिरिक्त ) जिल्ह्यांत अशीं आहेत.—

सातारा— शुभसूचक, श्रीशाहू, समर्थ, ऐक्य, ग्रामोद्धार, हीं साप्ताहिकें; अलंकार, विणकरसेवक हीं मासिकें, आयुर्मीमांसा हें त्रैमासिक

लिंब— हितचिंतक (पाक्षिक).

कऱ्हाड— अभ्युदय (पाक्षिक).

इसलामपूर—भारतमाता, अंजन (साप्ताहिकें), भारतवृत्त (पाक्षिक).

औंध- विनय (त्रैमासिक), पुरुषार्थ, भगवद्गीता (मासिकें).

किर्लोस्करवाडी—किर्लोस्कर—स्त्री—मनोहर (मासिकें).

सांगली—विश्वास, विजय, दक्षिणमहाराष्ट्र (साप्ताहिकें).

कोरेगांवचे कादंबरीकार श्री. नारायण हरी आपटे आणि मिरजेचे वे. महादेवशास्त्री दिवेकर यांचे ग्रंथही लोकशिक्षणाचें काम अनलस करीत असतात. जिल्ह्याचा व्यापार व ग्रंथनियतकालिकांचा व्यवहार आणि त्याचप्रमाणें घरगुती समाचार दरसाल किती होतो हें टपालखात्याच्या व्यवसायावरून अंदाजण्यास मदत होईल. पहा कीं—

| तालुका | पोस्टाचीं गांवें | तार ऑफिसें |
|---|---|---|
| वाई — | वाई, बावधन, भुइंज, ओझर्डे, उडतरें, पांचवड, चिंधवली, सुरूर, कवठें, शिरगांव, किकली, पांचगणी, पसरणी, खंडाळें. | वाई. |
| सातारा — | सातारा, लिंब, वडूथ, क्षेत्रमाहुली, परळी, जिहें, अंगापूर, तासगांव, अतीत, नागठाणें, निनाम पाडळी. | सातारा. |
| कोरेगांव — | कोरेगांव, लोणंद, करंजखोप, सोनकें, पिंपोडें बु॥ वाघोली, देऊर, रेवडी, स्टे.पाडळी, चिमणगांव, शिरढोण, रहिमतपूर, आर्वी, किरोली, तारगांव, वाठाररोड, किन्हई, कुमठें, वाठार, भांडळें. | वाठाररोड, साताररोड, कोरेगांव, रहिमतपूर. |
| खटाव — | डिसकळ, बूध, पुसेगांव, खातगुण, खटाव, कुरोली, वडूज, कातरखटाव, कलेढोण, मायणी, चितळी, पुसेसावळी, वडगांव, वरूड, पळसगांव. | वडूज. |
| माण — | दहिवडी, गिरवी, शिंगणापूर, मलवडी, गोंदवले बु॥, म्हसवड, महिमानगड. | दहिवडी. |
| खानापूर — | कडेगांव, तडसर, वांगी, देवराष्ट्रे, विटें, पोरें, खानापूर, भाळवणी, चिंचणी (अंबक), लेंगरें. | विटें. |
| तासगांव — | तासगांव, पलुस, भिलवडी, अक्कलखोप, चिंचणी, सोनी, भोसें, सावळज, येळावी, बुरली, एरंडोली, विसापूर. | |
| जावली — | कुडाळ, मेढें, सायगांव, बामणोली, तांबी, मालकमपेठ, पांचगणी. | पांचगणी, मेढें, मालकमपेठ. |
| पाटण — | तारळें, पाटण, चाफळ, मल्हारपेठ, मारूल, बहुलें, विहें, मरळी, कुंभारगांव, हेळवाक, ढेबेवाडी. | पाटण. |

| तालुका | पोस्टाचीं गांवें | तार ऑफिसें |
| --- | --- | --- |
| कऱ्हाड-- | पाल, उंब्रज, चरेगांव, मसूर, कऱ्हाड, कार्वे, कोळें, कालें, ओंड, वडगांव हवेली, शेणोली, रेठरे बु॥, शिरगांव, कोळेवाडी, इंदोली, सुपनें. | उंब्रज, मसूर, कऱ्हाड. |
| वाळवें--- | कासेगांव, नेर्ले, रेठरेंहरणाक्ष, बोरगांव, इसलामपूर, पेठ, रेठरें (धरणाचें), वाळवें, कामेरी, येलूर, चिकुर्डे, अष्टें, बागणी, ऐतवडें बु॥, ऐतवडें खुर्द, दुधगांव, ताकारी, येडेमच्छिंद्र, गोटखिंडी, शिगांव, बहादरवाडी. | अष्टें इसलामपूर |
| शिराळपेटा- | शिराळें, मांगलें, बिळाशी, कोकरूड, अरळें. | शिराळें |
| सं.फलटण- | फलटण, तरडगांव, वाठार, बिडती. | फलटण |
| सं. औंध- | औंध, आटपाडी, दिगंची, किन्हई, कुंडल, किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी. | औंध, किर्लोस्कर-वाडी, ओगलेवाडी. |

यांतून पत्रें, पाकिटें, मनीऑर्डरी ४०७२४९२ यांचा बटवडा होतो. नियतकालिकें-ग्रंथ ३११६०० इतक्या संख्येनें हातबदल करतात. बंग्या ४७४९६ आणि बुकपोस्टें ४८८६६८ एवढ्यांची देवघेव होते. जिल्ह्यांत मुंबईहून चार लाखांच्या आणि इतर ठिकाणांहून सहा लाखांच्या मनीऑर्डरी वर्षास येतात व सुमारें ३ लाखांच्या बाहेर जातात. असा ओबडधोबड अंदाज आहे. चुकीच्या अगर अपुऱ्या पत्त्यांचीं पत्रें व तिकिटें न लावलेलीं २०००० पत्रें असतात. पैकीं १२ टक्के वाया जातात.

समाचारसाधनाप्रमाणेंच प्रवासवाहतुकीच्या सोयी हें लोकस्थिती अजमावण्याचें एक गमक मानतात. त्या दृष्टीनें पाहिलें तर अगोदर डोळ्या-पुढें डोंगरच डोंगर दिसतात. " या जिल्ह्यांतील सह्यपर्वताची दक्षिणोत्तर

लांबी ६० मैल असून त्याचे मुख्य पांच फाटे उत्तरेकडील वळकी नदी व दक्षिणेकडील वारणा नदी यांच्यामध्यें पूर्वेकडे व अग्नेयीकडे पसरले आहेत. (१) महाबळेश्वर--वैराटगड हा फाटा कृष्णा व कुडाळी या नद्यांच्यामध्यें असून २० मैल लांब आहे. याच्या पुढच्या भागास ' पांचगणीचा डोंगर ' ह्मणतात. कारण पांचगणी हें तेथें मुख्य ठिकाण आहे. (२) महाबळेश्वर-अरळें [ हातघर-अरळें -वा- मालकमपेठ-अरळें ] हा फाटा ३० मैल लांब असून मेरुलिंगाचा समावेश यांतच होतो. यांच्या उत्तरेस कुडाळी व दक्षिणेस वेण्णा वाहतात. (३) महाबळेश्वर-दातेगड [ बामणोली-दातेगड ] हा वेण्णा-कोयनांच्यामध्यें दक्षिणोत्तर ४० मैल पसरलेला असून त्याला पूर्वेकडे तीन रांगा फुटल्या आहेत. [अ] उरमोडी-तारळी यांमधील केळघर-अजिमतारा रांग. हींत यवतेश्वराच्या डोंगरांत साताराचा किल्ला आहे. [आ] वेण्णा-उरमोडी यांमधील बामणोली-सज्जनगड रांग. हींत परळीच्या डोंगरांत रामदासांचा किल्ला आहे. [इ] तारळी-केरा यांमधील पाटण-वसंतगड रांग. हींतील गड मेंढोशीच्या डोंगरांत आहे. (४) बहिरवगड-गोटाखिंडी फाटा ३६ मैलांचा असून यास भैरवगड-कणदूर फाटाही म्हणतात. ईशान्येकडे व पूर्वेकडे ह्मणजे पाटण तालुका व शिराळेपेटा यांमध्यें यांच्या लहानलहान शाखा आहेत. कोयना-मोरणामधील वसंतगड शाखा, वांग-मोरणामधील कहीर-किरपा-शाखा व वांग-मांडमधील काळगांव-जखीनवाडी शाखा या विशेष होत. (५) वळकी-कृष्णामधील कमळगड फाटा. याच्या जंगलांतून विषारी साप हिंडतात. ' महाबळेश्वराच्या उत्तरेकडून सुमारें १०मैलांपासून जिल्ह्याचे उत्तरसीमेवर ६० मैल लांब पसरणारा शंभूमहादेवाचा डोंगर सह्याद्रीच्या पूर्वेकडील फाटयांपैकीं फार मोठा असून हाळीचा डोंगर, ह्मसकोबाचा डोंगर, सीताबाईचा डोंगर अशींही त्यास नांवें आहेत. याला तीन रांगा फुटून दक्षिणेकडे गेल्या आहेत त्या अशा— १ पश्चिमेकडील कृष्णा-वसनांमधील २० मैल लांबीचा उत्तरदक्षिण फाटा ' चंदनवंदन रांग ' ह्मणून प्रसिद्ध असून जरंडयाच्या डोंगरापर्यंत जातो. २ मधली, कृष्णा—

वेरळामधील ' घाट ' म्हणतात. तो ६० मैल लांबीची म्हसकोबाच्या डोंगरापासून कुंडलपर्यंत गेलेली वर्धनगड–सदाशिवगड रांग. हींत खानापूर तालुक्याच्या पश्चिमहद्दीवर झाडी व पाऊस जास्त नि भूषणगड व वाळवे–तालुक्याच्या ईशान्यहद्दीवरील कमलभैरी व मच्छिद्रगड हे प्रसिद्ध. ३ येरळामाणमधील वायव्येकडून अग्नेयीकडे जाणारी ६५ मैल लांबीची ह्मसकोबापासून नागजपर्यंत गेलेली थातवडा-महिमानगड रांग. हींत वारूगड, भोपाळगड, जुना पन्हाळा [सोनांच्या डोंगराचें टोंक] हें प्रसिद्ध किल्ले आहेत.

जिल्ह्यांतील ह्या डोंगरपसारा खालीलप्रमाणें तालुकवार निरखितां येतो-

| तालुका | डोंगर | वैशिष्टय. |
|---|---|---|
| वाई | १ सोनजाईचा; | पसरणीच्या घाटाचे पूर्वेस. सोनजाई देवी. |
| | २ मांढरदेवाचा; ३ पांचगणीचा. | |
| सातारा | १ यवतेश्वराचा; | जावली ता. च्या अग्नेयीस. कासतलाव. यवतेश्वरमंदिर. |
| | २ मेरुलिंगाचा, ३ परळीचा. | |
| कोरेगांव | १ जरंडयाचा | औषधीवनस्पति. सातारा रोडपासून २-२॥ मैलावर उंच व खडा डोंगर. -मारुती- पाण्याचें [टाकें. |
| | २ हरळीचा ३ नांदगिरीचा | |
| | ४ वर्धनगडचा | |
| | ५ वाघोशीचा | इमारतीचे काळे दगड विपुल. |
| खटाव | १ ह्मसकोबाचा | तालुक्याच्या उत्तरेस. येरळेचा [उगम. |
| | २ वर्धनगडचा ३ महिमानगडचा. | |

| तालुका | डोंगर | वैशिष्ट्य. |
| --- | --- | --- |
| माण | १ सीतेचा २ महिमानगडचा ३ शिंगणापूरचा. | |
| खानापूर | १ सागरोबाचा | सागरेश्वर, देवराष्ट्रेजवळ; रोगहारक पाण्याचें टाकें. |
| | २ सुळकाईचा | |
| | ३ शुक्राचार्याचा. | पळशीजवळ, दाट झाडी व पाचक पाण्यामुळें आकर्षक. |
| तासगांव | १ दंडोबाचा २ सावळजचा ३ जरंडीचा. | |
| वाळवें | १ मल्लिकार्जुनाचा | इसलामपुराहून दक्षिणेस ८ मैलांवर. माथ्यावर पीर चांद बुखारी यांचा दर्गा. |
| | २ पेटलोंडचा ३ कमळभैरीचा | |
| | ४ मच्छिंद्रनाथाचा | |
| | ५ वाकुडर्याचा | मोरणानदीचा उगम. |
| | ६ रेडचा | रेड गांवाजवळ. शिराळा पेट्याची सीमा. यांत पावट्याची खिंड. |
| कराड | १ विंध्यवासचा | पालीजवळ. इंजाई देवी. |
| | २ समनामीरचा ३ चंदोबाचा | |
| | ४ थोरोबाचा ५ चोरोबाचा | |
| | ६ आगाशिवाचा | श्रावणी तिसरे सोमवारीं जत्रा. लेणीं ४०-५० कर्‍हाडचे नैऋत्येस २॥ मैल. भैरवाचें देऊळ. |

| तालुका | डोंगर | वैशिष्टय. |
|---|---|---|
| पाटण | १ नाईकबाचा | —नाईकबाचें स्थान. |
| | २ मेंढोशीचा ३ वाघापुरचा | |
| | ४ रामबळचा ५ मोरगिरीचा | |
| | ६ वाल्मिकीचा ७ गोकुळचा. | |
| जावली | १ वासोटयाचा | तांबीजवळ. ताई तेलिणीचा वासोटा किल्ला. |
| | २ पांचगणीचा. | तालुक्याच्या ईशान्य सीमेवर. कुडाळ नदीचा उगम. वैराटगड याच डोंगरांत. हवेचें ठिकाण पांचगणी. |

अशा स्थितींत समाचारसाधनें टपालखात्यासारखीं भाडोत्री किती पुरी पडणार ? तथापि व्यापारी दृष्टीनें इंग्रजी कंपनीनें जिल्ह्याच्या मधोमध मद्रास सदर्न मराठा रेल्वेचा आफाट रुंदीचा फाटा जिल्ह्यांतून ११० मैल नेला असून त्याचा जिल्ह्याला उपयोग टपालाच्या दृष्टीनें तर होतोच, पण आणखीही असा होतो. सदर्न मराठा रेल्वेसारख्या बार्शीलाईट रेल्वेचा तासगांव तालुक्यांतून जाणाऱ्या फाटयाचा उपयोग करणारे पंढरपूरचे निश्चित यात्रेकरू वीस हजार आषाढी कार्तिकीला सांपडतील व नुसत्या तिकीटांवरच हिशेब केल्यास सालीना ५२१२८३ पासिंदार प्रवास करतात असें म्हणावें लागेल. १७४५७८ टन मालाची वाहतूक होत असून कंपनीचा खर्चवेच वजा जातां मूळ भांडवलावर ४·९.४ टक्के तरी फायदा सातारा जिल्ह्यांतून पडत असावा.

इतका व्यवहार करणारीं सदर्न मराठा रेल्वेचीं स्टेशनें अशीं:—

| स्टेशन | तालुका | महत्व |
|---|---|---|
| १ लोणंद | कोरेगांव | रहदारीचें [फलटणच्या]व व्यापाराचें. ज्वारी [कांदे, बटाटे रवाना |
| २ सालपें | सं.फलटण | — |

| स्टेशन | तालुका | महत्व |
|---|---|---|
| ३ आदर्की | कोरेगांव | — |
| ४ वाठार | ,, | रहदारीचें [वाई - महाबळेश्वर - पांचगणीच्या] |
| ५ पळशी | ,, | — [ बटाटे रवाना. |
| ६ सातारारोड | ,, | कूपर वर्क्सचे लोखंडी नांगर वगैरे रवाना. |
| ७ कोरेगांव | ,, | रहदारीचें [सातारा, खटाव-माण पेटा यांतील] शेंगदाणे, विडयाचीं पानें, धान्यें, मिरची रवाना. |
| ८ रहिमतपूर | ,, | कोरेगांवप्रमाणेंच माल रवाना. |
| ९ तारगांव | ,, | विडयाचीं पानें, शेंगदाणा रवाना. |
| १० मसूर | कऱ्हाड | शेंगदाणा रवाना. |
| ११ शिरवडें | सं.जमाखिंडी | — |
| १२ कऱ्हाड | कऱ्हाड | रहदारीचें, शेंगदाणा, कांचसामान, गूळ, हळद, |
| १३ शेणोली | ,, | शेंगदाणा, गूळ रवाना. [मिरची रवाना |
| १४ बिचूद | सं.औंध | — |
| १५ ताकारी | वाळवें | रहदारीचें, विडयाचीं पानें, शेंगदाणा, गूळ, हळद, तंबाखू रवाना. |
| १६ किर्लोस्करवाडी | सं.औंध | लोखंडीसामान, नांगर, पंप वगैरे. |
| १७ भिलवडी | तासगांव | लोणी, तूप; मिरची; हळद; गूळ, कापूस; |
| १८ नांद्रें | ,, | [धान्य रवाना. |
| १९ बुधगांव | मिरज [धा.पा.] | — |

आगगाडीशिवाय मोटारीची वाहतूकही जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणांत असून १७५००० टन मालाची वाहतूक नि ( तिकिटांप्रमाणें मोजलेले ) पांसिदर १५६३८५० वर्षास प्रवास करीत असावे. खानापूर—तासगांव — मायणी यांचे संबंध राखणारा विटें येथील, पुणें—महाबळेश्वर—सातारा

यांचे संबंध साधणारा वाई येथील, पुणें-कोल्हापूर-सांगली-म्हसवडपर्यंत संबंध साधणारे सातारा-कोरेगांव-कऱ्हाड-इसलामपूर येथील आणि चिपळूणपर्यंत वाहतुकीला उपयोगी पडणारे उंब्रज-कऱ्हाडचे व शिराळे पेट्यांत जाण्यास उपयोगी पडणारा पेठचा असे मोटारीचे थांबे जिल्ह्यांत महत्वाचे असून मोटारभांडवलावर खर्चवेंच वजा जाऊनही ६८टक्के निव्वळ निखालस नफा पडण्यासारखा आहे. पण अनियमितपणा अडेलपणा व अवखळपणा यांनीं या धंद्याची खराबी केली आहे. बैलगाड्याप्रमाणेंच मोटारींनाही वाहतुकीची किती थोडी सोय आहे, पहा—

पक्क्या सडकांचे केंद्र सातारा आहे. कोरेगांव हें खटाव व माण तालुक्यांतून येणाऱ्या सडकांच्या मुखाशीं आहे. कऱ्हाड हें तासगांव, सातारा, कोल्हापूर, चिपळूण, विटें यांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर असल्यामुळें तेथें रह-दारी फार आहे. जावली-पाटण-शिराळेपेटा येथें बहुतेक सीधे रस्तेच आहेत. परळीखोरें, कोयनाखोरें, वारणाखोरें, येथें बहुतेक प्रवास पाय-वाटेनें, घोड्यावरून आणि पराकाष्टा बैलगाडीनेंच होतो. आतां—

| | | |
|---|---|---|
| १ सातारा—महाड | ९ कऱ्हाड—तासगांव | १७ इसलामपूर-शिराळें |
| २ ,, पुणें (जुनी) | १० मल्हारपेठ—पंढरपूर | १८ पेठ—शिराळें |
| ३ ,, ,, (नवी) | ११ विटें—कुंडल | १९ पेठ—सांगली |
| ४ ,, तासगांव | १२ तासगांव—शिंगणापुर | २० वडूज—पुसेगांव |
| ५ ,, कोल्हापूर | १३ ,, सांगली | २१ ,, दहिवडी |
| ६ ,, पंढरपूर | १४ ,, भिलवडी | २२ ,, कातरखटाव |
| ७ कऱ्हाड—विजापूर | १५ ,, सावळज | २३ ,, पुसेसावळी |
| ८ ,, चिपळूण | १६ इसलामपूर—ताकारी | |

अशा पक्क्या सडका सांगण्यासारख्या असून लक्षांत ठेवण्यासारख्या मुख्य मुख्य सडका अशाः— (१) सातारा-उंब्रज-कऱ्हाड-पेठ-वारणापूल

अशी जाणारी पुणें–कोल्हापूर (२) माहुली-त्रिपुटीखिंड-कोरेगांव-वर्धनगड-पुसेगांव-महिमानगड-पिंगळी-म्हसवड अशी जाणारी सातारा–पंढरपूर (३) शिरगांवघाट-वाई-पसरणीघाट-पांचगणी-अशी जाणारी वाठार-महाबळेश्वर (४) शिरवळ-लोणंद-फलटण-अशी जाणारी वर्धाघाट–पंढरपूर (६) ओगलेवाडी-सुरलीघाट-कडेगांव-विटें-रेणावी-खानापूर-अशी जाणारी कऱ्हाड–विजापूर (६) मल्हारपेठ-पाटण-हेळवाक-कुंभारलीघाट-अशी जाणारी कऱ्हाड–चिपळूण (७) विटें-माहुली-मायणी-कातरखटाव-पिंगळी अशी जाणारी तासगांव–पिंगळी. याशिवाय छोटया पण महत्वाच्या अशा (८) लोणंद-खंडाळें (९) लोणंद-पुणें (१०) लोणंद-भोर (११) लोणंद-सातारा (१२) लोणंद-फलटण (१३) सातारा-पुणें (कोल्हापूर-पुणें) रस्त्यास ओझरडयाच्यापुढें छेदणारी वाई-वाठार-स्टेशन. ( या सर्व रस्त्यांवरून ३६८५० गाडेगाडया व २७५० सायकलीही चालतात. )

जगाचें तारीखतागायत ज्ञान, बाजारपेठेचा विनासायास फायदा आणि पुरवठयाचा जोड-धंदा अभावानें अगर अपुरेपणानें जिल्ह्यांतील जनतेला नाडतात. जिल्ह्यांत शिंपीकाम करणारे १२५२२, इमारत काम करणारे २२९०, ओतकाम करणारे २६१२, कातडयाचा व्यवसाय करणारे १२३१, फराळदुकानें व खानावळी चालविणारे १८०००, पेढयांतून काम करणारे १२१५, धार्मिक व्यवसायी ३९०४, शिक्षकी शिकवण्या करणारे ३९५६, वैद्यकी करणारे १५०० आणि कायद्यावर जगणारे व वकील ७३२ आहेत. असें जरी अट्टाहासानें सांगण्यांत येत असलें, तरी एकटया मुंबई इलाख्याच्या वार्षिक आयव्ययाव्यवसायाचा वाटा सातारा जिल्ह्याला साधारणतः खालीलप्रमाणें उचलावाच लागतो —

‘ जिल्ह्यांतील सरकारी जमाबंदी —— रजिस्ट्रेशन वगैरे फी १॥लक्ष रु; जंगल खातें २॥। ल. रु; स्टँप ७॥।ल. रु., अबकारी खातें १७ लाख रु. [कमींत कमी] आणि सूटसांड तहकुबी घालूनही शेतसारा २४ल. रु.,

' जिल्ह्यासाठीं सरकारला खर्च साधारणतः असा येतो—राज्यव्यवस्था २०॥लाख रुपये, इमारत खातें ९। लक्ष रु., शिक्षण ९ लक्ष रु., पाटबंधारे ५ लक्ष रु., दवाखाने ३॥। लक्ष रु., न्याय ३॥ लक्ष रु., जंगल १॥। लक्ष रु., शेतकी १॥ लक्ष रु., पोलीस खातें ९ लक्ष रुपये. '

असला बोजा सांभाळतांना होणारी जिकीर कमी करण्यासाठीं लिंब येथील लोकसेवा वीव्हिंग मिलनें सातारा तालुक्यांत, अरळें येथें रा. म. जोशी, बिळाशी येथें ने. अ. कत्ते यांनीं बिळाशी पेटयांत आणि गोटखिंडी येथें रा. ना. जोशी व नागठाणें येथें श्री. ह. कुलकर्णी यांनीं अनुक्रमें वाळवें नि तासगांव तालुक्यांत प्रयत्न चालविले आहेत. खादीची पैदास मूलतः करून स्वावलंबन साधावयाचें आणि गांवांतील माणसांच्या श्रमानें होणारे पदार्थ पुरस्कारून नि वापरून गांव स्वावलंबी व स्वाभिमानी ठेवावयाचें, अशी त्यांच्या प्रयत्नांची दिशा आहे. याशिवाय अहिरें (ता. वाई) येथील उद्योगयुक्त शिक्षणासाठीं चाललेल्या प्रयत्नांत जीवन नि शिक्षण यांचा बरोबर मेळ घालण्याकरतां स्त्रिया व पुरूष यांच्यामधील जबाबदारींची विभागणी अशी आढळते—

" स्त्रिया— खतें तयार करणें, खाद्यपेयें तयार करणें, कापूस वेचणें, सरकी काढणें, पेळू करणें, सूत काढणें, शिंपी काम, कोंबडयांची जोपासना, कोठार व व्यवहार, दवाखाना-रुग्णशुश्रुषा, मुलांची जोपासना व शिक्षण, संस्कृतिसंरक्षण.

' पुरूष— शेती, मोठया जनावरांची-शेळयामेंढयांची जोपासना, पिंजणकाम, विणकाम, लोंकर कापणें, सुतारकाम व इतर अंगमेहनतीचे धंदे, जनावरांचा औषधोपचार, उच्च-प्रौढ-समाज-शिक्षण. "

या नि असल्या प्रयत्नांनीं केव्हां यश मिळावयाचें तें मिळेल. या अलिकडील प्रयत्नांपूर्वींच १९०४च्या सहकारी कायद्याचा फायदा जिल्ह्याच्या जीवनास देण्याचे दृष्टीनें जे प्रयत्न झाले त्यांचा परिपाक आढळतो तो असा

कीं, जिल्ह्यांत एकंदर सहकारी मंडळ्या ४०९ प्रस्थापित आहेत. त्यांपैकीं देखरेखसंघाचें जिल्हामंडळ १, देखरेख संघ ११, शेतकरी पतपेढया ३२५, खतसाधनपेढया ५, खरेदीविक्रीपेढया ३, बींपुरवठा पेढी १, दुभतें पेढी १, नागरीपतपेढया ३०, पीकसंरक्षण पेढया ३, तालुका विकाससंघ १२, बागाईतदारसंघ १, वीणकरसंघ २; शेतीसुधारणा संघ १३, स्त्रीशिक्षण-मंडळ १, अशी विभागणी आहे. आजपर्यंतच्या अनुभवावरून वर्षास ३·२५ सहकारी संस्था रजिस्टर होतात, २·१ व्यवहार गुंडाळतात, चोख काम कागदोपत्रीं तरी करणाऱ्या २५४·६ आढळतात, बुडणाऱ्या शेतपेढया १·४ असतात. काँग्रेसमंत्रिमंडळाचे ना. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या शेतकरीस्वाव-लंबन योजनेनुसार सहकारी चळवळीचा प्रसार खालीलप्रमाणें होईल असा अंदाज आहे —

| तालुका | बहुविधपतपेढी | खरेदीविक्रीपेढी | शेती सुधारणापेढी |
|---|---|---|---|
| वाई | ५ | १ | — |
| जावली | १ | — | २ |
| मालकमपेठ [फळभाजीपाला] | १ | — | — |
| सातारा | ३ | — | २ |
| खटाव | ३ | १ | १ |
| माण | ४ | १ | — |
| कराड | ६ | १ | — |
| खानापूर | ६ | १ | — |
| वाळवें | १० | — | — |
| पाटण | ४ | १ | — |
| तासगांव | ५ | १ | १ |
| शिराळा | ५ | — | — |
| कोरेगांव | ३ | — | १ |

## ठोकताळा ९ :

# लालन-पालन.

सातारा जिल्ह्याचा परिचय पटविण्यासाठीं आतांपर्यंत सांगितलेल्या गोष्टी या खास खुणेच्या होणार नाहींत काय ? तथापि आणखी थोडें खोल जावयाचें तर सह्याद्रींत लोखंडाची माती सांपडते, इमारतीच्या उपयोगी असे काळे व पांढरे दगड, माती, वाळू व चुना जिल्ह्यांत सर्वत्र आहेत, फार काय, पूर्वपट्टींत मुरमासारखीच मीठ करण्यासारखी खारी मातीही आहे. या निसर्गाच्या वरदहस्ताशिवाय झाडांवनस्पतींच्या रूपानेंही जिल्ह्यावर निसर्गाची कृपा आहे, ती अशी— ' जिल्ह्यांत ७१० चौ. मैल जंगल असावें, व त्यांपैकी, राखीव जंगल ६६५ चौ. मैल व संरक्षित जंगल ४५ चौ. मै. असेल. ह्मणजे जिल्हा क्षेत्राच्या १७·१ टक्के ठिकठिकाणच्या सरकारी जंगलांतून बोर, उंबर, वड, करंज, चिंच, जांभूळ, धावडा इत्यादीपासून सर्पण नि कोळसा मिळतो. कुरणें, जंगलें व डोंगराळभाग यांत येणाऱ्या गवताचेंही उत्पन्न होतें. तरवड व बाभुळ यांच्या साली हजारों रुपये देतात. बाभळींचा डिंक, चंदनाचीं खोडें, महाबळेश्वर-शिराळें भागांतील दगडांस व झाडांस लागणाऱ्या मोहांचा मध आणि टेंभुर्णी, वड, पळस यांचीं पानें हीं देखील जिल्ह्यांत जीवनसाधनें आहेत. चिंचेचीं नि अमसुलाचीं बोटुकें हजारों रुपये उभारतात. पेरू, लिंबें, रामफळें, संत्रीं, केळीं व आंबे जिल्ह्यांत आहेत. तरी आंबा जिल्ह्याच्या उत्तरभागांत, द्राक्षें, डाळिंबें, सीताफळें, रामफळें घाटाखालच्या प्रदेशांत, कलिंगडें तासगांव तालुक्यांतील कृष्णा नदीच्या वाळूंत, नारळीचीं झाडें तासगांव तालुक्यांतच नि पानमळे कऱ्हाड, वाळवें, कोरेगांव तालुक्यांत किफायतीचे आहेत. याशिवाय स्थलमानानें बोलावयाचें तर

| झाडें | पश्चिमपट्टींत | मध्यपट्टींत | पूर्वपट्टींत |
| --- | --- | --- | --- |
| इमारतीच्या उपयोगी | सागवान, शिसव, जांभूळ, कळक, ऐन, किंजळ, साग | बाभूळ, जांभूळ, लिंब, कळक. | लिंब, जांभूळ, बाभूळ, खैर. |
| औषधोपयोगी | हिरडा, शिकेकाई, | | |
| फळझाडें | फणस. | | डाळिंबें |

विपुलतेनें होतात. '

मानवेतर प्राण्यांचाही जिल्ह्यांत जीवनास उपयोग होतो. रानटी जनावरांपैकीं वाघ, ससा, कोल्हा, रानडुक्कर हे प्राणी पिकांची फार नासाडी करतात म्हणून शिकारी कुत्र्यांच्या मदतीनें त्यांना मारतात. खानापूरच्या पूर्व भागांतील शिकारी कुत्र्यांची जात फार चांगली आहे. तथापि या सर्व जनावरांना आपल्या काबूंत राखून घोडे, गाढवें, बैलाप्रमाणें त्यांचेकडून हुकमी खेळ करवून सर्कशीचा धंदा करण्याचाही शोक तासगांवच्या लोकांना फार आहे. साप, विंचू, इंगळी, मांडूक, अजगर वगैरे विषारी प्राणी पकडून त्यांच्याकडून लोकांचें मनरंजन करूनही पुष्कळ लोक पोट भरणारे आहेत. जलचर प्राण्यांपैकीं माशांचा प्रश्न अगदींच पोटापाण्याचा आहे, हें कोण नाकबूल करील ? खेकडे आणि कासव व त्यापेक्षांही कृष्णा-कोयना-वारणा यांच्या डोहांत सांपडणाऱ्या सुसरी यांचा उपयोग ' जीवनाशीं ' आहे, हें तितकेंच खरें नाहीं काय ? पाळीव जनावरांपैकीं बैल, गाई, म्हशी व घोडीं हीं कृष्णाकाठीं सशक्त, देखणीं नि धिप्पाड आढळतात. खिलारी बैलांची जात आटपाडी-म्हसवडभागांत देखत राहण्यासारखीं. घोडीं पूर्व नि पश्चिमभागांत अधिक. शिराळेपेटयांतील रेडे शेतकीही कसतात. रानटी नि पाळीव जनावरांची भागवार पैदास अशी —

| | पश्चिमपट्टी | मध्यमपट्टी | पूर्वपट्टी |
| --- | --- | --- | --- |
| रानटी जनावरें— | वाघ, चित्ता, रानडुक्कर, अस्वल, कोल्हा, तरस, खोकड, गवा, सांबर. | कोल्हा, खोकड, ससा, हरीण, वाघ. | हरीण, लांडगा, तरस, कोल्हा, ससा, खोकड, वाघ |

| | पश्चिमपट्टी | मध्यमपट्टी | पूर्वपट्टी |
|---|---|---|---|
| पाळीव जनावरें– | गाई, म्हशी, शेळ्या, [ दुभत्यासाठीं ] घोडें, गाढवें, कुत्रें, रेडे, मांजरें, डुकरें. | गाई, म्हशी, शेळ्या [ दुभत्यासाठीं ] रेडे, घोडें, गाढवें डुकरें, माजरें. | गाई, म्हशी, शेळ्या बैल, घोडे, गाढवें, कुत्रें, डुकरें मेंढरें |

पक्ष्यांचा विचार करतां, मोर-पोपट-भारद्वाज इत्यादि सुंदर पिसाऱ्याचे, घार-कावळा-गिधाड इत्यादि घाण नाहींशी करणारे नि चिमणी-साळुंखी-पारवा इत्यादि बागडणारे पक्षी सर्वत्र आढळतात. कोंबडयांची जोपासना तर केवळ जीवनासाठींच होते नि पोपट, कबूतरें, मोर, बदक यांची जीवनानंदासाठीं होते. जिल्ह्यांतील मानवेतर मुख्य मुख्य प्राण्यांची अंदाजीं खानेसुमारी एका रिकामटेकडया गणित्यानें करमणुकीसाठीं केली आहे ती अशी—

घोडीं ५०००, गाईबैल ४०००००, मेंढया ३८२७१६, बोकड ५३३२९, डुकरें १६३२४५, खेचरें-गाढवें १८६६७, उंट २४, कोंबडया ४८०००, हत्ती १०, वाघ १६७, पाखरें ४००००००.

आकडयांच्या या कसरतींत कांहीं तथ्य असो-नसो, सातारा जिल्ह्यांत व्यवहाराच्या उघडयावर बोलावयाची भाषा सरसहा मराठी असली तरी घरगुती-खास-राखीव भाषा ज्याच्या त्याच्याच आहेत. त्याची गम्मत अशी—

| लोक | घरगुती भाषा | लोक | घरगुती भाषा |
|---|---|---|---|
| हिंदु | मराठी | मारवाडी | मारवाडी |
| गुजराथी | गुजराथी | जैन | कानडी |
| मुसलमान | उर्दू | पारशी | गुजराथी |
| हिंदी ख्रिश्चन | इंग्रजी-मराठी | ख्रिश्चन | इंग्रजी |
| सरकारी दप्तर | (खास) इंग्रजी. | | |

**अशा मंडळींचें सार्वजनिक लालन-पालन कसें होतें पहा—**

| तालुका | वैशिष्टय | सरकारी माणसांचे दवाखाने | सरकारी जनावरांचे दवाखाने | मिशनरी दवाखाने | म्युनिसि-पॅलिटया | सब्‌रजिस्ट्रार कचेऱ्या | मामलेदार कचेऱ्या | मुन्सफ कचेऱ्या | फौजदार कचेऱ्या | देवी डॉक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वाई | — | वाई | वाई | वाई | वाई | वाई | वाई | वाई | वाई, खंडाळे | वाई |
| २ सातारा | लोकसंख्या | सातारा | सातारा | — | सातारा, सबर्बन् | सातारा | सातारा | सातारा, (मेढयासह अधिकार) | सातारा, बोरगांव | सातारा |
| ३ कोरेगांव | दळणवळण | कोरेगांव, रहिमतपूर | रहिमतपूर | — | रहिमतपूर | कोरेगांव | कोरेगांव | कोरेगांव | कोरेगांव, रहिमतपूर | कोरेगांव |
| ४ खटाव | — | वडूज, पुसेसावळी | वडूज | — | — | वडूज | वडूज | दहिवडीकडे | वडूज | वडूज |
| ५ पेटा माण | क्षेत्रफळ | दहिवडी, म्हसवड | — | — | म्हसवड, दहिवडी | — | दहिवडी | दहिवडी, (कोरेगांव कोर्ट) | दहिवडी, म्हसवड | दहिवडी |
| ६ खानापूर | — | विटें | विटें | तडसर, विटे | विटें | विटें | विटें | विटें | कडेगांव, विटें | विटें |
| ७ तासगांव | — | तासगांव, सावळज | तासगांव | — | तासगांव | तासगांव | तासगांव | तासगांव | तासगांव | तासगांव |
| ८ वाळवें | लोकसंख्या | इसलामपूर, अष्टे | इसलामपूर | इसलामपूर, अष्टें | इसलामपूर, अष्टें | इसलामपूर, अष्टें | इसलामपूर | इसलामपूर | इसलामपूर, अष्टें | इसलामपूर |
| ९ पेटा शिराळें | — | कोडोली, शिराळें | — | — | — | शिराळें | शिराळें | — | शिराळें | शिराळें |
| १० कऱ्हाड | लोकसंख्या कारखाने | कऱ्हाड | कऱ्हाड | — | कऱ्हाड | कऱ्हाड, मसूर | कऱ्हाड | कऱ्हाड | कऱ्हाड, उंब्रज | कऱ्हाड |
| ११ पाटण | — | पाटण | — | — | — | पाटण | पाटण | पाटण (कऱ्हाड म. मु. कोर्ट) | पाटण | पाटण |
| १२ जावली | सृष्टिसौंदर्य | मेढें (शेलाराचे) | — | — | महाबळेश्वर, पांचगणी | मेढें | मेढें | — | मेढें | मेढें |
| १३ माळकमपेठ | — | माळकमपेठ | — | — | माळकमपेठ | — | माळकमपेठ | — | माळकमपेठ | माळकमपेठ |
| १४ सं. औंध | लोकराज्य | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १५ सं, फलटण | — | फलटण | फलटण | — | फलटण | — | — | — | — | — |

सोबतच्या तक्त्यांत दिलेल्या बहुजनसमाजाशीं वारंवार संबंध येणाऱ्या अधिकाऱ्यांशिवाय गांवोगांव वसूल करून सर्व व्यवस्था राखण्यासाठीं मुलकी पाटील, पो. पाटील, तलाठी वा कुलकर्णी आणि वेसकर-चौगुले-रखवालदार वगैरे अधिकारी असतातच. कांहीं गांवीं ग्रामपंचायती असून त्यांचें व ठिक-ठिकाणच्या म्युनिसिपालिटयांचें मोठें भावंड ह्मणून ५२ लोकनियुक्त सभासदांचें जिल्हाबोर्ड प्राथमिक शिक्षण, रस्ते, धर्मशाळा, पाणीपुरवठा, आरोग्य यांच्याकडे लक्ष देण्याकरतां आहे. लोकांचें राज्य लोकांनीं चालवावें, त्यासाठीं हें ' खराटयाचें स्वराज्य ' सर्वस्वी लोकराज्य आहे. शिवाय, सरकारी डॉक्टरांच्यावर सॅनिटरी इन्स्पेक्टर व सातारचे सिव्हिल सर्जन हे जिल्ह्याच्या निरोगीपणाची काळजी घेतातच. टपाल खात्याचे इन्स्पेक्टर नि सुपरिंटेंडंट हे जिल्ह्याची ' समाचारव्यवस्था ' नीट राखीत असतात. नद्यांना पूल नि पाटबंधारे बांधून, तलाव-धरणें धरून नि सरकारी इमारतींची निगा राखून राहणारे इंजनेर खात्याचे ओव्हरसिअर, सुपरवायझर, सब्‌एंजीनिअर, असिस्टंट इंजनेर, एक्झिक्यूटिव्ह इंजनेर असे किती तरी अधिकारी जिल्ह्यांत आहेत. शिक्षण खात्याचेही असि. डे. इन्स्पेक्टर, सिनिअर डे. इन्स्पेक्टर, लोकलबोर्डाचे अॅड्‌मिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर वगैरे जिल्ह्याच्या ज्ञानवाढीबद्दल खटपट करतात. सहकारी खात्याचे अधिकारी, मार्केटिंग ऑफीसर, वजनमापांचे इन्स्पेक्टर, अबकारी इन्स्पेक्टर, इन्‌कमटॅक्स कलेक्टर, शेतकी खात्याचे ओव्हरसीअर, डिस्ट्रिक्ट ओव्हरसीअर, जंगल-खात्याचे राऊंड गार्ड -रेंज ऑफीसर- डिस्ट्रिक्ट ऑफीसर, संरक्षक खात्याच्या फौजदाराशिवाय इन्स्पेक्टर्स, डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडंट, असि. पो. सुपरिं., पोलिस सुपरिंटेंडंट, न्यायखात्यांतील सब्‌जज्जांवरील डिस्ट्रिक्ट नि सेशन्स जज्ज, असि. जज्ज असे अधिकारी आपआपल्या क्षेत्रापुरती जिल्ह्याच्या निकोपपणाबद्दल काळजी वहात असतात. पण या सर्वांपेक्षां जिल्ह्याची कारभारी जबाबदारी खरी ती कलेक्टरावरच आहे. नोंदणी

खात्याच्या सब्‌रजिस्टरांच्यावर देखरेख रजिस्ट्रेशन इन्स्पेक्टर्स ठेवतातच, पण कलेक्टर हीच सर्वांत नोंदणी खात्याचीदेखील अधिष्टात्री देवता आहे. मुलकीसंबंधांत तर कलेक्टर जिल्ह्याचा राजाच म्हणावयाचा ! वसुलाचें नि सरकारी खजिना ताब्यांत ठेवण्याचें काम करणाऱ्या मामलेदार (व पेटयाचे महालकरी) यांच्यावर तीन ' प्रांत ' ऊर्फ असि. कलेक्टर नि एक हुजूर डेप्युटी असतात. हुजूर डेप्युटीकडे जिल्ह्याच्या खजिन्याचे कामाबरोबर सातारा शहर व सबर्ब्स (विस्तार) यांतील, मध्यभागच्या प्रांताकडे कलेक्टरचा ' पर्सनल असिस्टंट ' म्हणून काम असून शिवाय सातारा, कोरेगांव या तालुक्यांतील, उत्तर भागच्या प्रांताकडे वाई, खटाव, जावली, मालकमपेठ व माण यांतील आणि दक्षिणभागचे प्रांताकडे खानापूर, तासगांव, कऱ्हाड, पाटण, वाळवें, शिराळा पेटा यांतील ' कलेक्टरचें काम ' उरकण्याची जबाबदारी असते. या सर्वांचा मुगुटमणि कलेक्टर असून पहिला वर्ग जिल्हा मॅजिस्ट्रेट व डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार म्हणूनही तो ओळखला जातो. जमीनसारा नि इतर कर वसूल करणें, जमीनीचे तंटयांचा निर्णय ठरविणें, वतनदार लोकांचे हक्क राखणें, फौजदारी गुन्ह्यांचा निकाल देणें असलीं कामें तर कलेक्टर करतोच; पण शिवाय संस्थानांशीं संबंध येतांना तो व्हाइसरॉयतर्फे राजप्रतिनिधीचेंही काम पहातो.

जिल्ह्याचे एवढे अधिकृत व मातबर पालक असूनही जिल्ह्याची भरभराट मनासारखी नाहीं. याचें कारण जिल्ह्यांत जो व्यापार होतो तो पुष्कळसा ' बाहेरच्या मालाच्या दलालीचाच होतो. ' तेव्हां जिल्ह्यांतील पैसा जिल्ह्यांतच रहात नसला तरी परदेशांत तरी जाऊं नये म्हणून ज्याप्रमाणें महाराष्ट्र चरखा-संघाचीं खादी भांडारें कऱ्हाड, सातारा, विटें वगैरे ठिकाणीं आटोकाट प्रयत्न करीत आहेत, त्या प्रमाणेंच महाराष्ट्र इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह एजन्सीची एक शाखाही सातारा जिल्ह्यांत खटपटत आहे. पण जिल्ह्यांतील प्रमुख धंदा जो शेती त्याची सुधारणा किफायतशीर व्हावी नि

ग्रामोद्योग स्वावलंबी व्हावेत म्हणून इसलामपूर, कऱ्हाड, तासगांव, सातारा, किर्लोस्करवाडी, शिराळें, कोरेगांव, पांचगणी व वाई येथील शाखांतून बॉंबे प्रॉव्हिंशिअल को-ऑपरेटिव्ह बँक अनेक परींनीं मदत करीत असते. तथापि सातारा जिल्ह्याची कीर्ती अखिल भारतांत करून जिल्ह्याचें वैशिष्टय दाखविणारा आणि अभिमानस्थान होऊन राहिलेला जिल्ह्यांतील एक व्यवसाय म्हणजे १९१३ सालीं स्थापन झालेली साताराची वेस्टर्न इंडिया विमा कंपनी. ही कंपनी आज हिंदुस्थानांत आदर्श विमा संस्था मानली जाते, इतकेंच नव्हे तर विमा-व्यवसायाबद्दल महाराष्ट्रांत या कंपनीनें आत्मविश्वास निर्माण केला. याच कंपनीची युनायटेड वेस्टर्न बँक १९३७पासून सुरू झाली असून दक्षिण-महाराष्ट्राची मुंबईस तिच्यायोगें व्यापारी सोय झाली आहे. मात्र रा. महादेव दत्तात्रय वाघ यांनीं आपल्या 'शेतकरी ऋणविमोचन' या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें जिल्ह्यांतील खास उद्योगांची उभारणी, वाढविकास नि प्रसार होण्यास धनवन्त गृहस्थांचा नि संस्थांचा उपयोग मोठया प्रमाणावर होईल तेव्हांच सातारा जिल्हा सर्व बाजूंनीं वर येईल. या उद्योगांतील पहिलें लक्ष मात्र जिल्ह्यांतील बेकारी नाहींशी करून, नियमित पण भरपूर काम नि कामाचा कसदार मोबदला श्रमी लोकांना मिळून त्यांचें जीवन रम्य करण्याकडे आणि त्यांना तारीखतागायत समानता मिळण्याकडेच अवश्य हवें.

असो. अशा तऱ्हेनें सातारा जिल्ह्याच्या परिचयाची खूण पटवावयास 'अंतरीच्या गोष्टी' सांगितल्यावर तरी सातारा जिल्हा माझा व मी सातारा जिल्ह्याचा असें कोणी म्हणूं लागला तर त्याला तसें म्हणण्याचा कांहीं अधिकार आहेच आहे, हें कबूलच करावें लागेल. ओळख पटविणारा ओळखीच्या ज्या गोष्टी सांगतो त्या सूक्ष्मदर्शक यंत्रानें अगर भूमितीच्या व्याख्यांच्या काटेकोरपणानें सर्वच वेळीं पाहून चालत नाहीं.

## ठोकताळा १० :

# इतिहासाचा अभिमान व अभिमानाचा इतिहास.

जिल्हा माझा व मी जिल्ह्याचा ह्मणतांना, गत व चालू इतिहासाबद्दलही बोलणारांच्या मनांत अभिमान, आदर निदान तिरस्काराचा अभाव तरी आहे कीं नाहीं हें पहावें लागतें. त्या दृष्टीनें मोजतांना कोणी असें ह्मणेल कीं हो, सातारा जिल्ह्याच्या इतिहासांपैकीं स्वप्नांतसुद्धां ज्या गोष्टी मी घडघडा सांगेन व ज्यांचा बरावाईट काय असेल तो वारसा स्वीकारून नवीन अभिमानास्पद इतिहास निर्माण करण्याचा हिय्या धरीन, त्या गोष्टी अशा—

### तालुकावार किल्ले.

वाई— १ पांडवगड, २ केंजळगड(रुद्रगड), ३ वैराटगड, ४ कमळगड.

सातारा— १ अजिमतारा, २ सज्जनगड.

कोरेगांव—१ चंदन, २ वंदन, ३ नांदगिरी.

खटाव—१ वर्धनगड, २ भूषणगड.

खानापूर—१ भोपाळगड.

माण— १ ताथवडा, २ वारूगड, ३ संतोषगड, ४ महिमानगड.

तासगांव—१ (जुना) पन्हाळा.

वाळवें—१ मच्छिंद्रगड, २ प्रचीतगड.

कऱ्हाड—१ वसंतगड, २ सदाशिवगड.

पाटण—१ बहिरवगड, २ गुणवंतगड, ३ दातेगड, ४ जंगली जयगड.

जावली– १ वासोटा, २ प्रतापगड, ३ मकरंदगड.

## ऐतिहासिक माणसें.

वाई–– १ तात्या टोपे, २ कृष्णाजी भास्कर, ३ सूर्याजी पिसाळ, ४ शेख मिरा, ५ भास्करराम ६ कोन्हेरराम कोल्हटकर, ७ मुरार जगदेव, ८ नाना फडणीस ९ खंडूजी खाबडे, १० लखजी जाधव.

सातारा– १ ताराबाई राणी. २ रामशास्त्री प्रभुणे, ३ झांशीवाली लक्ष्मीबाई, ४ सुभानजी लावघरे, ५ ब्रह्मेंद्रस्वामी.

कोरेगांव–१ बाजी घोरपडे, २ रघोजी भोसले, ३ महादजी शिंदे, ४ मानाजी फाकडे, ५ कंठाजी कदम बांडे, ६ इंद्रोजी कदम, ७ फत्तेसिंग माने, ८ परशराम त्रिंबक प्रतिनिधी, ९ शामराजपंत रांझेकर, १० मल्हारराव होळकर, ११ निंबाजीराव निंबाळकर.

खटाव––१ प्रतापराव गुजर, २ कृष्णराव खटावकर.

खानापूर–१ पंताजी गोपीनाथ.

माण–– १ माने, २ घाटगे.

तासगांव–१ शिदनाक महार, २ परशरामभाऊ पटवर्धन.

वाळवें––१ खंडो बल्लाळ व २ गुंडो बल्लाळ चिटणीस, ३ नामोराम शेणवी, ४ थोरात, ५ हिरोजी फर्जंद, ६ मंत्री, ७ पीरजादे.

कऱ्हाड–१ हंबीरराव मोहिते, २ भीमराव रेठरेकर, ३ जगदाळे, ४ डुबल, ५ कल्याणस्वामी, ६ काजी, ७ खतीब, ८ रयनाक, ९ धनाजी जाधव.

पाटण––१ हरजीराजे महाडीक, २ शिरके, ३ पाटणकर सरदार ४ रामदास.

जावली– १ चंद्रराव मोरे, २ ताई तेलीण.

## जिल्ह्याचीं गेलीं १२१ वर्षें.

१८१९ सातारकर महाराजांशीं इंग्रजांचा 'चौदा पेटयांच्या संस्थानचा तह'.

१८३९ प्रतापसिंहमहाराज पदच्युत. (२) रंगो बापूजींचें विलायतेस शिष्ठाईसाठीं प्रयाण.

१८४८ औरससंततीच्या अभावीं सातारा खालसा.

१८६८ जिल्हा असोसिएशनमार्फत घराखालील जमीनमोजणी कायद्या-संबंधीं अर्ज.

१८७० सातारा लायब्ररींत शेतकरी वगैरे सर्व दर्जाच्या लोकांची ' सरकारास गाऱ्हाणीं कळवावी ' ह्मणून सभा.

१८७१ वाई, सातारा, कऱ्हाड वगैरे ठिकाणीं ' सार्वजनिक सभांची स्थापना. '

१८७४ ' सातारच्या राजघराण्यावरील प्रसंगाबद्दल ' दिवाणांच्या वाडयांत सभा.

१८७५ दिवाणांच्या वाडयांत ' मल्हारराव गायकवाडास गादीवर बसविणेची ' विनंति करणारी सभा.

१८७६ सार्वजनिक सभामार्फत अन्यायानें घेतलेला ' सातारा ' परत मिळावा अशी मागणी. (२) लवाद कोर्टाची स्थापना.

१८७७ सातारा म्युनिसिपालिटींत ' साखरेचा कारखाना काढण्याचा ठराव '

१८८१ न्यायमूर्ति रानडयांचें घाटे नाटकगृहांत ' सामाजिक शिक्षणाची साधनें ' यावर व्याख्यान.

१८८२ गंगाधर रामकृष्ण किराणे ' स्थानिक स्वराज्यासंबंधीं ' दौरा काढतात.

१८८३ दादासाहेब करंदीकर ' नेटिव्ह मॅजिस्ट्रेट ज्युरिडिक्शन बिलाबद्दल ' सभा करतात.

१८८५ वाई तालुक्यांतील १७ गांवांवर प्युनिटिव्ह पोलीस.

१८८६ मुनशी शेखव॥ शेखचांद यांचा ' दारूपाना 'विरुद्ध दौरा.

१८८८ राष्ट्रीय सभेच्या प्रचारार्थ बळवंतराव कोल्हटकरांचा दौरा.

१८८९ वाळवें तालुक्यांत लिमयेप्रभृती घरापाठीमागें एक पैसा वर्गणी राष्ट्रीयसभेसाठीं गोळा करतात.

१८९० शिराळ्याची छोटी कॉंग्रेस. (२) सातारा शहरास ज्यूरीचा हक्क व रेल्वेचा फाटा ' यांची गव्हर्नरसाहेबांचे मानपत्रांत मागणी.

१८९१ श्री. गोविंद धोंडदेव ऊर्फ रावसाहेब लिमये यांच्या अध्यक्षतेखालीं पुण्याची चवथी प्रांतिक परिषद. (२) कऱ्हाड, पाटण वगैरे तालुक्यांतून शेतकऱ्यांच्या झुंडी गायरानांच्या जप्तीबद्दल दाद मागण्यासाठीं कलेक्टरच्या बंगल्यावर.

१८९२ पांच पांच रुपयांचे शेअर काढून ६०० रुपयांचे भांडवलानिशीं वाई येथें देशी कापडाचें दुकान.

१८९३ ह्यूमसाहेब हजर असलेली वाळवें येथील छोटी कॉंग्रेस. (२) वाई तालुका कॉंग्रेस (दु.)

१८९४ नानासाहेब वैद्यप्रभृती तेरा प्रतिष्ठितांवरील वाई येथील 'द्वारांचा' खटला.

१८९५ ना. टिळकांचा दौरा व वाईसातारा येथें मानपत्रें.

१८९६ कऱ्हाड येथें दुष्काळामुळें पेठेची लूट.

१८९७ ' स्वतंत्र होण्याची तयारी ' या लेखाबद्दल प्रतोदकर्त्यांस शिक्षा. (२) मोदवृत्तकर्त्यास शिक्षा.

१८९९ डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमेटीतर्फें नेमलेले नारायण रामचंद्र घमंडे यांचा प्रचार.

१९०० साताराची प्रांतिक परिषद.

१९०१ लॅंडरेव्हेन्यूबद्दल चळवळ.

१९०४ शिवाजी क्लबातर्फे स्वदेशी प्रदर्शन.

१९०५ स्वदेशी चळवळीची हालचाल.

१९०६ ओगले यांची रेल्वेच्या आसपास स्वदेशीवर व्याख्यानें. (२) लोकमान्य, आण्णासाहेब परांजपे व केळकर यांचा स्वदेशीचा प्रचार. (३) औद्योगिक परिषदेची स्थापना.

१९०७ सातारा जिल्हा सभा स्थापना.

१९०८ लोकमान्यांचे अपीलासाठीं दादासाहेब करंदीकर विलायतेस रवाना.

१९०९ कऱ्हाड मॅच फॅक्टरी, (२) कोरेगांव तालुक्यांत पिकेटिंगचा खटला.

१९१० आठलेप्रभृतींचा बॉंब खटला.

१९१४ प्रांतिकसभा (२) गांव-तालुका-जिल्हा सभामार्फत कॉंग्रेसचें काम चालावें म्हणून अप्पासाहेब आळतेकर मद्रासेस रवाना.

१९१६ सहकारीसंस्थांची ज्युबिली.

१९१७ दादासाहेब करंदीकरांची ज्युबिली. (२) कॉंग्रेस स्कीमला पाठिंबा. (३) होमरूललीगची चळवळ.

१९१९ उडतरें प्रकरण.

१९२० असहकारितेच्या प्रचारासाठीं महात्मा गांधी व मौलाना शौकतअल्ली यांचा दौरा.

१९२१ देऊरप्रकरण. (२) मुळशी सत्याग्रह स्वयंसेवक रवाना. (३) टिळक राष्ट्रीय विद्यालयाची स्थापना. (४) असहकारितेचा प्रसार.

१९२२ कोयनाधरणासंबंधीं खटला. (२) युवराजबहिष्काराबद्दल काकाराव पंडितांचें इनाम जप्त. (३) पिकेटिंगचे खटले.

१९२३ कऱ्हाड येथें नेमस्तांची प्रांतिक परिषद.

१९२५ प्रांतिक परिषद.

१९२७ महात्मा गांधी व राष्ट्रसभापती श्रीनिवास अय्यंगार यांचे दौरे. (२) परचुरे यांच्या खेड्यांतील यात्रा. (३) कोयनाधरणासंबंधीं लोकसमजावणी. (४) वाई येथील राष्ट्रीय शिक्षण परिषद. (५) त्रिशतसांवत्सारिक शिवोत्सव.

१९२८ तुकडेपट्टी बिलाचा सार्वत्रिक निषेध, आमदार देशपांड्यांचा दौरा. (२) सायमन कमिशनवरील बहिष्काराचा रा. ब. काळे यांचा ठराव. (३) कोयनाखोऱ्यांतील प्रचार. (४) सातारा जिल्हा ब्राह्मणेतर परिषद. [५] कऱ्हाड तालुक्यांत खेडोपाडीं काँग्रेस प्रचार.

१९२९ सातारा तालुका खेठकरी परिषद. (२) कोयनाधरणासंबंधीं आमदार देशपांड्यांचे कौन्सिलांत प्रश्न. (३) सेवादलाच्या शाखा. (४) दे. श्रोत्रींचा गौरव.

१९३० त्रिशतसांवत्सारिक शिवोत्सव. (२) कायदेभंगाच्या चळवळींतील ना. गव्हर्नरसाहेबांचें काळ्या निशाणांनीं स्वागत. (३) बिळाचीचें बंड. (४) सोमणांना बेड्या आणि कोर्टांत गांधी टोपी. (५) शिबीर व काँग्रेस संस्थांची जप्ती.

१९३१ सेनापती बापटांचा दौरा व त्यांचें प्राणयज्ञदल. (२) पं. जवाहरलाल यांचा दौरा. (३) सुभाषचंद्र बोस यांचा दौरा. (४) एकसळास शेतकीसंघाची स्थापना.

१९३२ डेटेन्यू व बेकायदेशीर संस्था ठरण्याचा वरवंटा फिरला. (२) हजेरीच्या नोटीसा व त्यांचा भंग (३) हरिजनांस मंदिरप्रवेश. (४) येरवड्यास लक्ष्मण जोशीचा मृत्यू.

१९३४ मुंबईकौन्सिलच्या पोटनिवडणुकींत काँग्रेसचे उमेदवार भाऊसाहेब सोमण यशस्वी. (२) असेंब्लीच्या निवडणुकींत जेधेगाडगिळांना पहिल्या नंबरचीं मतें.

१९३५ काँग्रेसचे प्रचारक खेडोपाडीं (२) नाठवडे येथें ग्रामोन्नतिकार्यालय. (३) काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रबाबू यांचा यशस्वी दौरा. ४. लँड मॉर्टगेज बँकेची स्थापना. ५. पेठ येथील सुशिक्षित चर्मकार परिषद. ६. औंध संस्थानचे मंत्री श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर. ७. श्री. शं. द. जावडेकर मुंबईस ' नवशक्ति ' काढतात. ८ तासगांवचे थोरबोले १८ तास लाठी फिरवून रेकॉर्ड मोडतात. ९. सातारा विद्वत्परिषदेचा प्रयत्न फसला. १०. हिंदुस्थान सरकारच्या ग्रामोद्धाराचे एक कोटी रुपयांपैकीं जिल्ह्याला ११२०० रु. आले. ११. बिळाशी ग्रामसंघटनामंडळाची स्थापना. १२. वर्धा हरिजनसेवकसंघाकडून सातारा छत्रपती बोर्डिंगला ५०० रुपये तनखा. १३. गुच्चा अलीशा पठाणानें इसलामपूरची यमाई फोडली. १४. दे. नारायणराव पाटणकर वकील इसलामपूर यांचा मृत्यू. १५. काँग्रेस महोत्सव, तत्प्रीत्यर्थ समर्थाचा खास अंक नि ब्रिटिश रियासतींतील सातारा जिल्ह्याचा श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले यांनीं लिहिलेला राजकीय इतिहास " जागृत सातारा " याचें प्रसिद्धीकरण.

१९३६ इसलामपूर शारदामंडळ. ३. दळवी, साखवळकर, हळवे यांचे काँग्रेस पवाडे पहिल्या प्रतीचे ठरले. ३. रा. ब. काळे यांचा मृत्यू. ४. लोकसेवासंघाच्या योजनेची दे. सोमण यांनीं मांडणी केली. ५. जाळगेवाडी जळाली. ६. ऐक्यकार वाग्भट देशपांडे वारले. ७ दे. पांडुअण्णा शिराळकर यांची षष्ठ्यब्दि. ८ वाळवे तालुका शेतकरी परिषद. ९. ग्रामसुधारणेची सरकारी ढाल येलूरला. १० अर्बन बँक परिषद सातारा. ११ दे. सोमणांची षष्ठ्यब्दि.

१९३७ डॉ. हेडगेवार यांचा दौरा. २ पुराणसंशोधक विष्णुपंत करंदीकर यांचा मृत्यु. ३ दे. जवाहरलाल यांचा दौरा. ४. सोमण, महाजनी मुंबई कौन्सिलांत. ५. शिराळकर, आत्माराम पाटील, कल्याणी, मोहिते, कूपर, साठे, सावंत, आखाडकर मुंबई असेंब्लींत. ६. नव्या १९३५ कायदाघटनेचा धिक्कार. ७ शैवलिंगायत परिषद कऱ्हाड. ८. बुधची सातारा जिल्हा राजकीय परिषद. ९. बाळासाहेब खेरांचा दौरा. १० मुंबई असेंब्लींतील मोहित्यांचे ऐवजीं चंद्रोजी पाटील. ११ लोकसेवासंघाचें कार्य गोखले सुरू करतात. १२ काँग्रेसराज्यदिन. १३. लोकमान्यपुण्यतिथीस अधिकारस्वीकार दिन. १४. गोखले अर्थसंशोधनसंस्थेतर्फे वाई भागांतील शेतकऱ्यांची आर्थिक पहाणी सुरू. १५. दे. नरीमन यांचा दौरा. १६ स्वदेशी प्रदर्शन वाई नि ना. लक्ष्मणराव पाटील यांचा दौरा. १७ कऱ्हाड सातारा हायस्कुलांच्या संमेलनास ना. बाळासाहेब खेर. १८ शेणोली शेतकरी परिषद. १९ वारणा खोऱ्यांत अण्णासाहेब दास्ताने, दे. शंकरराव देवांचा दौरा.

१९३८ ना. मुरारजी देसाई दौरा. २. मसूर मातंग परिषद. ३. मुंबई प्रांतीय प्रागतिक परिषद सातारा. ४. कऱ्हाड वैद्य हकीम परिषद. ५. गाताडवाडी शेतकरी परिषद व मीठ तयार करण्याचे वाफे उघडले. ५. दे. आप्पासाहेब आळतेकर यांचा मृत्यू. ७ दे. नाथ घाणेकर यांची पन्नाशी साजरी.

८. अरळ्याची शिराळपेटा राजकीय परिषद. ९. जिल्हाबोर्ड काँग्रेसचें निवडून आलें. १०. सावरकर जयंति. ११ जमीनदार संघाचा शिराळकर-सोमणावर मोर्चा. १२. ना. नूरींचा दौरा व विटें राजकीय परिषद. १३. ५१००० रु. ची फलटण संस्थानें सारासूट दिली. १४ इसलामपूर येथें जमीन मालकांचा दे.

शि. ल. करंदीकर यांचे अध्यक्षतेखालीं टेनन्सीबिलविरोध. १५. जिल्हा शेतकऱ्यांचा कुळकायद्यास कऱ्हाड येथें पाठिंबा. १६. दे. जावडेकरांचें " आधुनिक भारत " प्रसिद्ध. १७. पंतप्रतिनिधींनी औन्धप्रजेस जबाबदार स्वराज्य दिलें. १८ मसूरचें स्वदेशी प्रदर्शन व ना. नूरी-मावळणकर यांचा दौरा. १९. तरुणमित्रमंडळ शिराळें. २०. कोल्हापूर व हैद्राबाद सत्याग्रहास पाठिंबा. २१ विणेखोल भस्मसात् व त्यास मदत.

१९३९ शिराळेपेटयांतील बुडख्यावरील पाणीपट्टी रद्द. २. दारू दुकानें उठवा व लोकलफंड कमी करा ह्मणून मागणी. ३. मिरजेचें पहिलें दक्षिणमहाराष्ट्रसाहित्य संमेलन. ४. साताऱ्यास रायफल क्लब. ५. कऱ्हाड कृष्णाघाटावरी ताबूत मिरवणूक वाद. ६. बुर्ली येथील कृष्णाकॅनाल बागाईतदार सभा. ७. युद्धविरोधी दिन. ८. कूपवाडची कोल्हापूर प्रजापारिषद—कूळकायदादिन. ९. ना. लठ्ठे यांचे अध्यक्षतेखालीं लोकसेवासंघाचा वाढदिवस व " राज्य इंग्रजांचें, कारभार कॉंग्रेसचा व अंमल गांवगुंडांचा " याचा सार्वत्रिक प्रतिध्वनि, औन्ध ग्रामपंचायतींना न्यायाधिकार. १०. महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद सातारा. ११ खानापूर, माण, कोरेगांव, शिराळापेटा यांत विशेष व इतरत्र सामान्यतः पिण्याच्या पाण्याचा नि वैरणीचा दुष्काळ.

## समाजसेवक गोखले कऱ्हाड

यांचीं

# सर्वमान्य प्रसिद्ध पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बोलबाला. | (व्याख्यानें) | ०८ |
| २ | जागृत सातारा. | (जिल्ह्याचा इतिहास) | १ |
| ३ | आगरकर. | (चारित्र) | ०४ |
| ४ | गो. ग. आगरकर. | (छोटें चारित्र) | ०१॥ |
| ५ | गोखले आणि— | (व्याख्यानें) | ००॥।- |
| ६ | संपादक आगरकर. | (निबंध) | ०४ |
| ७ | महाराष्ट्र कवि. | (व्याख्यान) | ०२ |
| ८ | भारतभाव. | (जगांत हिंदुस्थानचें महत्व) | ०३ |
| ९ | परिचित सातारा. | (सामाजिक व आर्थिक पाहणी) | ०५ |
| १० | गीताधर्म.— | — — — | — |
| ११ | आगरकरांशीं ओळख. | — — | — |

आमचीं

# लोकप्रिय पुस्तकें.



| | किंमत |
|---|---|
| अभ्युदयाचीं नवरत्नें ... ... ... | ०—५-६ |
| शारदासदन ... ... ... .... | ०—८-० |
| विवेकविहार ... ... ... ... | ०—८-० |
| ज्ञानकिरण ... ... ... ... | ०—८-० |
| रुक्मिणीस्वयंवर (श्री. नवागुळकृत) ... ... | ०—१२-० |
| फुलोरा (साहित्यसेवामंडळ) ... ... | ०—८-० |
| शिव—वात्सल्य (श्री. घाटेकृत) ... ... | ०—२-० |
| स्फूर्तिकिरण (राष्ट्रीयगीतें) ... ... .... | ०—१-० |

हा सर्व गट एकदम घेणारास दोन रुपयांत मिळतो.

व्यवस्थापक, श्रीलक्ष्मी प्रेस, कराड



---


मुद्रक, प्रकाशक: — डॉ. ना. पां. कोल्हापुरे, श्रीलक्ष्मी प्रेस, कऱ्हाड